म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ..... मा. वा.
दा. क्र. ७५९२

BVBK-0401592

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. 9482 दिनांक 31.7.87
विषय बा. पु क्र. .....

बा.वा.
१५९२
आपुलकी

अक्काचे अजब इच्छासत्र !

भा. रा. भागवत

म. पं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय 'ब' गट
दा. क्र. १५९२ दिनांक ३१/१/१
विषय बा.वा. क्र. .....

BVBK-0401592
BVBK-0401592

अक्काचे अजब इछासत्र !

इच्छासत्र ? –अहो, मृत्युपत्राला इच्छापत्र म्हणतात. इच्छासत्र नाही ! खरं ! पण चंद्रूआत्या ऊर्फ अक्काचं सारंच विचित्र. जन्मभर तिने आप्तेष्टांना तोडलन् आणि मरताना मात्र आठवणीने प्रत्येकासाठी एकेक पाकीट ठेवलन्. पण ते कुणालाही सहजासहजी मिळायचं नव्हतं. त्यासाठी प्रत्येकाला एक कोडं सोडवणं भाग होतं. या इच्छासत्रात बहुतेकांचा बळी पडेल असं या खोडसाळ अक्काला वाटलं असावं. पण तिलाही एकेक स्पर्धक असे खमक्ये भेटले की वा: !

क्षणोक्षणी उत्कंठा वाढवणारी बिपिन बुकलवारची ही मजेशीर कादंबरी 'रविवार सकाळ'मधून क्रमश: प्रसिद्ध होताना तिने बालवाचकांना एवढे वेड लावले होते की कादंबरी संपल्यावर भागवतकाकांनाही एक सत्र उघडावं लागलं– खजिना लुटीचं सत्र !

हा लुटीचा उपक्रम सर्वांनाच आवडला. पोरं तर त्यावर तुटून पडलीच, पण थोरांनीही त्याचं कौतुक केलं. प्राचार्य देवदत्त दाभोलकर आणि सकाळकार श्री. ग. मुणगेकर यांच्यासारखी मंडळी तर नुसत्या कौतुकावर थांबली नाहीत; त्यांनी खजिना लुटीच्या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला हे आम्हा बालसाहित्यकार मित्रांना आनंदाने नमूद करावंसं वाटतं !

– भा. रा. भागवत

प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
२७३, शनवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ :
राम वाईरकर

© भा. रा. भागवत
आनंदनगर, पुणे ४१.

प्रथम मुद्रण
२६ फेब्रुवारी १९८४

मूल्य बारा रुपये

9452 3145
वि. क. 891.461

बिपिनला कोरे पत्र येते

9

विजू-मोनांची दुक्कल बिपिनच्या खोलीत प्रविष्ट झाली तेव्हा बिपिनने नुकतीच एक उंच उडी मारली होती आणि तो आ वासून उभा होता. त्याच्या डाव्या हातात पोस्टाने आलेले पाकीट असून उजव्या हातातला कागद म्हणजे अर्थात त्यातले पत्र होते. त्याने ते खिडकीतल्या उन्हाकडे धरले होते. डोळे फाडफाडून तो त्या पत्राकडे पाहात होता.

"काय झालं रे बिपिनबाबू? तू एवढा चक्रावलास काय

म्हणून ?"

"हो ना–" मोना म्हणाली, "तुझ्या जागी तो फास्टर फेणे असता तर खोलीत शिरल्या शिरल्याच आम्हाला त्याचं ट्रॉक ऐकू आलं असतं."

"अग मोना–" विजू एव्हाना बिपिनजवळ गेला होता अन् त्या कागदाकडे जवळून पाहात होता, "हा बिपिनबाबू चकित झाला यात नवल नाही. त्याला कोरं पत्र आलंय !"

"कोरं पत्र ?"

"इथे नाही आलं. कॉलेजच्या पत्त्यावर. मधे आठ दिवस सुट्टी होती ना, त्यामुळे आज हातात पडलं !"

मोनानेही आता जवळ जाऊन पाहिले तर, बिपिनच्या हातात होता कोरा कागद !

"यह क्या लफडा है ?" विजू उद्गारला.

आणि मोनाने सुरू केले– "मेरा जीवन कोरा कागज..."

"आपला बिपिनबाबू अजून कॉलेज स्टुडन्ट आहे, मोना ! त्याचं लग्नसुद्धा झालेलं नाही, तर आत्तापासून कोरा कागजचे रडगाणं गायला नको. पण पण–" विजू बिपिनकडे वळून म्हणाला, "हे तुला पोस्टातून आलं, बिपिनबाबू ? एवढंच आलं ?"

"हो ना. एवढंच. मलाही याचा अर्थ कळत नाही. वर माझा पत्ता– तोही कॉलेजचा– होता एवढंच. फरॉमबीम कुछ नही !"

"ज्याला काही लिहायचं नव्हतं तो फ्रॉम तरी कशाला लिहील ?"

"पण अर्थ काय याचा ? कोरा कागद धाडणारा हा शहाणा कोण ?– की मला कुणी एप्रिल फूल केलंय ?"

"एप्रिलची एक तारीख केव्हाच होऊन गेली."

आणि प्राचीन पण नाही– चालू ! ...थांब हं–"

तो एकदम थबकला होता. आता आपल्या शेल्फाकडे जाऊन त्याने एक लहानसे पण सुबक पुस्तक काढले. गीतांजली ! त्याच्या पहिल्याच पानावर गुळगुळीत कागदावर छापलेले छायाचित्र होते आणि खाली कविसम्राटांची स्वाक्षरी होती–



ती अर्थात होती रवीन्द्रनाथ ठाकूर.

"तशीच वाटतात खरी ही अक्षरं !" मोना म्हणाली, "म्हणजे बंगाली लिपी आहे ही– तुझा कुणी बंगाली मित्र आहे का ?"

"नाही. माझं नाव बंगाली थाटाचं असलं तरी मला बंगाली मित्र कुणी नाही. पण मला बंगाली अक्षरं लावता येतील. आणि तरी– हे बेटं फारच स्पीडी पत्र आहे– आणि गिचमिडी ! थेट मोडीसारखं. भराभरा लिहिलेलं. अक्षराला अक्षर जोडलेलं. असलं मोडी पत्रसुद्धा एकदम वाचता येणार नाही."

"प्रयत्न तर कर. ते बघ– ते अक्षर रवींद्रमधल्या र सारखं वाटतं आणि तो क आहे– नक्कीच."

"थांब. मी बंगाली वर्णपरिचय काढतो. बघू तर खरं अक्षरं लावून. अगदी जमलं नाही तर आमच्या प्रोफेसर मुखर्जींना विचारीन."

'बंग वर्ण परिचय' ही चिमुकली पुस्तिका त्याने काढली,

तेव्हा मोनाने सुचवले, "अगोदर शेवटची ओळ लावू या.– पाठवणाराचं नाव."

"ओ. के."

आणि मग तिघांनी मिळून पत्राखालची सही वाचली. ती होती–

"काय बुवा लिहिलंय हे ? पहिलं अक्षर ठ, का रे ? ठक्कतुंड ?"

"दुसरं अक्षर क नाही, विजू. थेट रवीन्द्रनाथांच्या सहीतल्या 'न्द्र' सारखं आहे. आणि खालचा तो उकार असावा."

"म्हणजे न्द्रू. कुणी ठन्द्रू नावाचा बंगाली माहितीतला आहे तुझ्या ?"

"अरे वेडचा, ते पहिलं अक्षर– त्याचं पेकाट डावीकडे नाही, उजवीकडे आहे. म्हणजे तो ठ नाही, च आहे."

"चंद्रू ? कोण चंद्रू बंगाली हा ?"

"बंगाली नाही–" बिपिन एकाएकी विचारमग्न झाला होता. आपल्या मनात आलंय तसं तर नसेल ? पण– पण ती कशाला पत्र लिहील ? कित्ती वर्षांत काही संबंधसुद्धा आलेला नाही आपला तिचा !

आणि त्याने एकदम झटक्यात ती सही पुन्हा न्याहाळली. तेच –तेच नाव असणार हे !

"बंगाली नाही–" तो पुन्हा म्हणाला, "मराठीच बाई आहे ही."

"बाई ?" मोना किंचाळली. "कोण बुवा बाई ही ? आम्हाला वहिनी येतेय की काय ?"

"काही तरी वेडपटासारखं बोलू नकोस." बिपिनने डोळे वटारले. "चंद्रूआत्या असं नाव आहे ते. –माझी आत्या."

"तुझी आत्या ? मग कधी बोलला नव्हतास रे तात्या, या आत्याबद्दल ?" इति विजू.

"बोलण्यासारखं काही नव्हतंच. ही चंद्रूआत्या माझ्या बाबांची सख्खी चुलत बहीण. आजोबांशी म्हणजे माझ्या बाबांच्या काकांशी भांडून ती घराबाहेर पडली, एका बंगाल्याशी तिने लग्न केलंन् आणि कलकत्त्यात का कुठे स्थायिक झाली. पुढे तिचा आमचा संबंधच तुटला. आजी-आजोबा वारले तेव्हा एकदा तिचं पत्र आलं होतं. पुन्हा काही नाही. बाबा कधी कधी लिहीत, पण तिचं उत्तर नाही."

"मग आता हे पत्र कलकत्त्याहून आलंय ?"

"नाही." आणि बिपिनने चटकन पाकिटावरचा शिक्का पाहिला. "नागपूरजवळ सिंदुर्णी गाव आहे, तिथून. चंद्रूआत्याचे यजमान दहा वर्षांपूर्वी वारले तेव्हापासून ती सिंदुर्णीलाच राहात असे. तिथे तिने जमीन घेतली आहे. चिकार शेतीवाडी आहे तिची. खूप श्रीमंत आहे ही चंद्रूआत्या. मी मात्र कधी तिला काळी का गोरी पाहिलेलीसुद्धा नाही."

"का ? महाराष्ट्रात परत आल्यावरसुद्धा तिला तुमची आठवण झाली नाही ?"

"आठवण झाली नसेल असं मी कसं म्हणू ? बाबा नि ती लहानपणी खेळलेली आहेत. पण ती भेटत नाही, पत्र लिहीत नाही, काही नाही."

"आणि तुझे बाबाही कधी बहिणीची आठवण करीत नाहीत ? दोघंही चक्रमच."

"चक्रम खरीच." बिपिनच्या स्वरात विषण्णता उमटली होती. कारण तो माणसांचा भुकेला होता. "ज्यादा हुशार म्हणून चक्रम

की काय, कुणास ठाऊक ! ही चंद्रूआत्या भलती हुशार बाई आहे. बाबा सांगतात, लहानपणी हिला कोड्याचं नि उखाण्यांचं भलतं वेड. टाइम्समधली क्रॉसवर्ड कोडी ही इंग्रजी पाचवीत असताना सोडवायची म्हणे ! बंगाल्याशी लग्न करून तिने माहेरच्यांना जसं कोड्यात टाकलंन् तसं लग्नात एखादा विचित्र उखाणा घेऊन सासरच्यांना कोडं घातलं असणार– असं बाबा म्हणतात !"

"हं ! आणि म्हणून हे पत्रही तिने कोड्यासारखं धाडलंन्–" मोना.

"पण कधी नव्हे ती आत्ताच तिला तुझी आठवण व्हावी हेही एक कोडंच नाही का ?"

"हो ना." असे पुटपुटत बिपिनने पुन्हा त्या पत्राकडे दृष्टी वळवली. आणि मग विजू–मोना निघून गेली तरी किती तरी वेळ तो मोडीसारखे चितारलेले ते गौडबंगाल सोडवीत होता.



संध्याकाळी नेहमीप्रमाणे तो भटकायलासुद्धा गेला नाही. सहा वाजता मोना उडया मारीत त्याच्या खोलीत आली तेव्हाही तो पत्रातच गुरफटलेला होता. पण आता पत्राची त्याने घडी केलेली होती.

"अजून लागलं नाही पत्र ?"

"लागलं ! अर्थ लागला. आता फक्त विचार करतो आहे– पुढे काय करायचं ?"

"म्हणजे ? मजकुरानेही पुन्हा कोड्यात टाकलं का या चंद्रू-आत्याने ?"

"कोड्यात नाही– पेचात ! मोना, अग यातली अक्षरं जरी बंगाली आहेत ना ? तरी शब्द मराठीच आहेत. बंगाली लिपीत खरडलेलं मराठी पत्र आहे !"

"कमाल आहे !" तेवढ्यात तिथे टपकलेला विजू म्हणाला. "तो हमको उर्दू में बताव क्या लिखा है !"

त्याच्या चावटपणाकडे दुर्लक्ष करून बिपिन म्हणाला, "पत्र वाचले. मजकूर समजला. चंद्रू आत्याने मला ताबडतोब बोलावलं आहे ! – आपला ७ चा आकडा म्हणजे बंगाली त. आणि मोडी व– बाकी तुम्हाला कुठे मोडी येतंय म्हणा ! ते केव्हाच मोडीत निघालं ! पण आपल्या मोडी व सारखा त्यांचा ब असतो."

"मला माहीत आहे. व चा उच्चारच मुळी ते ब करतात. बन्दे मातरम्."

बिपिनने एका शब्दावर बोट ठेवीत म्हटले, "हा शब्द पाहिलात ? – ताबडतोब."

बिपिनला आता प्रश्न पडला होता : जिने जन्मात कधी आपलं तोंड पाहिलेलं नाही त्या आत्याकडे आपण ताबडतोब कशासाठी जायचं ?

२ चलो सिंदुर्णी !

"आम्ही पण येणार तुझ्याबरोबर." विजू हट्ट धरून बसला होता. "तुझी ही चक्रम आत्या आम्हाला बघितलीच पाहिजे !"

"येणार म्हणजे येणार." मोनाने दुजोरा दिला. "सुट्टीच आहे सध्या आईची. परवानगीसुद्धा काढली आम्ही. आता फक्त तिकिटं काढायची ! –एस्टी ना रे ?"

बिपिनला घेराव घालून दोघांनी पार आवळून टाकले. पण बिपिनला त्यांचा राग येण्याऐवजी तो सुखावला होता. त्याला

वाटत होतं– या चक्कर आत्याच्या चक्रव्यूहात जर आपण अडकणार असू तर बरोबर या दोन बारकुल्या काटक्या असलेल्या काही वाईट नाही. तेवढाच बुडत्याला काडीचा आधार ! बरं, आपण असे किती राहणार आहोत तिथे ? फार तर एक-दोन दिवस. हे दोन छोटे पाहुणे आपल्या पैसेवाल्या आत्याला जड जाणार नाहीत.

"अकोल्यापर्यंत रेल्वे, मग एस्टी." तो म्हणाला.

थोड्याच वेळाने ही त्रयी निघालीसुद्धा. आयत्या वेळचा प्रवास त्यामुळे गाडीत त्यांना खोचूनच बसावे लागले. पण अकोल्याहून पुढली मजल त्यांनी आरामात पार पाडली. एस्टीत त्यांना अगदी झकास जागा मिळाली होती.

सिंदुर्णी गाव तसा अगदीच लहान. तालुक्याचे ठिकाणसुद्धा नव्हते. पण कापूस अन् संत्री यांचे सतत पीक असल्यामुळे गावात समृद्धी होती. चंद्राबाई चक्रवर्ती यांची चांगली पन्नास एकर कापसाची नि तेवढीच मुसुंबीची बाग असल्याने त्यांचे नाव गावात सर्वांना परिचित होते. पिंपळाचा एक विराट वृक्ष नि त्याच्या तळचा ऐसपैस पार. तो ओलांडला की लगेच आत्याचे घर दिसे. उत्कृष्ट बगीच्याने वेढलेला तो टुमदार बंगला हुडकून काढणे त्यांना मुळीच जड गेले नाही. आणि तिथे पोचल्याबरोबर त्यांना दारातच कोण भेटले, माहीत आहे ?

"कोण– बाबा, तुम्ही ?"

आणि बिपिनने चकितपणे वाकून हात जोडलेले पाहून विजू–मोना आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागली. आणि मग साहजिकच कुतूहलाने त्यांनी बिपिनबाबूंच्या वडिलांकडे पाहिले. बिपिनसारखे ते बारीक नव्हते. स्थूलच. पण बाकी नाकाडोळ्यांची ढब

बिपिनसारखीच. फक्त बिपिनने मिशांना चाट दिलेली होती, तर बाबासाहेबांच्या मिशा वळणदार विंचरलेल्या होत्या.

"हूं. तूही आलास ? तुलाही कळलं वाटतं ?– एवढ्या तातडीने आलास तो ?– आणि ही बालचमूशी आणलीस बरोबर ?"

विजू-मोना दोघेही शहाणी मुले. ती लगेच बाबासाहेबांच्या पाया पडली.

"यांना सहज आणलंय–" बिपिन म्हणाला. "पण काय कळलं म्हणताय, बाबा ? मी आलो चंद्रूआत्याचं पत्र आलं म्हणून. चमत्कारिक पत्र." विजू-मोनांकडे त्याने हसून पाहिले.

"चमत्कारिक हे सांगायला नको रे ! तिचं सारंच चमत्कारिक. चंद्री म्हणजेच एक चमत्कार होता."

"होता... म्हणजे..."

"म्हणजे तुला कळलेलं नाही का अजून ! चंद्री वारली. आज पाचवा दिवस आहे."

"आँ ?" बिपिनचा चेहरा एकदम पांढरा पडला.

या ऐकीव आत्याला त्याने जन्मात कधी पाहिलेले नव्हते आणि तरी त्याला क्षणभर गलबलल्यासारखे झाले, "काय– झालं तरी काय ?"

"म्हातारपण अन् काय ? तशी आजारीच होती जरा. आधी कळलं असतं तर मी आलो नसतो का वेळेवर ? पण भलती हट्टी वहीण आमची ही चंद्री ! आणि आम्ही काही कमी नाही म्हणा. असो झालं ! शेवटचं दर्शनही घडायचं नव्हतं. अक्काचे फॅमिली फ्रेंड सबनीस– त्यांचा टेलिग्राम आला म्हणून आलो. पण दोन दिवस उशिराच पोचलो. तार आली तेव्हा मी नागपुरात

नव्हतो."

"आत्याला आपला मृत्यू आठवड्यापूर्वीच दिसायला लागला असावा, बाबा." बिपिनचा स्वर जरा गदगदलेला होता. न पाहिलेल्या आत्याच्या मरणाने त्याला चुटपुट लावली होती. रक्ताची ओढ म्हणतात ती तर नव्हे ना ही ?

"नाहीतर कधी नव्हेसं आत्ताच मला पत्र धाडण्याची बुद्धी तिला का झाली असती ? पत्र कॉलेजच्या पत्त्यावर धाडलंन्, त्यामुळे उशिरा मिळालं. नाहीतर कदाचित मी तरी वेळेवर आलो असतो."

विजूला नि मोनाला जास्तच विचित्र वाटत होते. मोना तर विजूच्या कानात पुटपुटलीही– "आपण उगीचच आलो नाही रे?"

विजू काही बोलला नाही. बिपिनकडे पाहात त्याने ओठ मुडपले.

सोमा गडचाने एव्हाना यांच्यासाठी पाण्याचे तांब्याभांडे नि बशीत संत्री आणून ठेवली होती.

प्रवासाचा शीण थोडा कमी झाल्यावर बाबासाहेब नि बिपिन खुर्च्यांवर गप्पा मारीत बसले. विजू-मोना बैठकीवर बसून शेजारच्या शेल्फातली पुस्तकं चाळू लागली.

गोष्टी ?– बालवाङमय ?– या आत्याकडे एकही मूल नसताना इतकी थोरली मुलांची पुस्तकं इथे काय करताहेत ? करमणूक– घरगुती खेळ– जादूच्या गमती... वा : ! आणि भूगोलाची नि प्रवासाची पुस्तकंही चिक्कार दिसताहेत. शिवाय सूर्यकुल, अवकाशभ्रमण...

बिपिनला बसल्या बसल्या माजघराचा अन्तर्भाग दिसत होता. एक रिकामी पडलेली लहान कॉट, तिच्यावर पसरलेली स्वच्छ

चादर, एका तिपाईवर जळणाऱ्या उदबत्त्या, कोपऱ्यात सारवलेल्या जागेवरची पणती– साऱ्या गोष्टी आत्याने नुकत्याच केलेल्या प्रयाणाची आठवण देत होत्या.

तिकडे बाबासाहेबांनी एक पातळ लाकडी बॉक्स उघडली आणि आतून एक चिरूट काढून तो शिलगावला.

"तुमचा नेहमीचा त्रिचनापल्ली ना बाबा ?"

"नाही." बाबासाहेब तोंडातला चिरूट काढून तो निरखीत म्हणाले, "मी माझे त्रिची आणलेत बरोबर. पण ही– ही चिरुटाची पेटी आत्याने माझ्यासाठी ठेवलीय खास भेट म्हणून."

"एक डझन उत्तम चिरुटांचा वारसा !"

"होय. नात्यागोत्यातल्या प्रत्येकाला चंद्रीने काही ना काही ठेवलंय. गब्बर बाई होती ती. आणि जब्बर ! तिच्याइतकी थट्टेखोर अन् बुद्धिमान बाई मी तरी पाहिलेली नाही."

"थट्टेखोर ! आणि तरी तिचं नि तुमचं भांडण झालं होतं, बाबा !" विपिनचा स्वर नाराजीचा होता.

"हं !" बाबासाहेब पेटत्या चिरुटाकडे पाहात खिन्न सुरात उद्‌गारले. "स्वभावो दुरतिक्रमः ! एकदा भांडलो ते भांडलो. पुन्हा भेट नाही, पत्र नाही. मला खंत वाटत नाही असं नाही. अलीकडे मला वाटायला लागलं होतं की येत्या भाऊबीजेला मुद्दाम तिच्याकडे जावं काही तरी भेट घेऊन. तर त्याच्या आधीच ती गेली."

पुन्हा त्यांनी चिरूट तोंडात घातला अन् फुंकला. दुसऱ्याच क्षणी 'फट्ट' होऊन त्यांच्या तोंडावर सगळ्याभर राख उडाली. त्यांनी घाई घाईने चिरूट काढून रक्षापात्रात ठेवला आणि डोळे वटारून ते त्याच्याकडे पाहू लागले.

विजू-मोनांच्या हातातली पुस्तके गळून पडली होती. त्यांचेही डोळे विस्फारले होते.

"काय झालं, बाबा ?" बिपिनने विचारले.

"तुला दिसलंच काय झालं ते." धोतराच्या सोग्याने आपले भस्मचर्चित तोंड पुशीत बाबासाहेब म्हणाले, "चंद्री थट्टेखोर होती म्हणून आताच सांगितलं ना तुला ? त्याचा एक मासला ! मेल्यावरही तिची रग जिरलेली नाही."

"कमाल केलीन् आत्याने !"

या प्रसंगानंतर आत्यासाठी हसावे की रडावे हाच बिपिनला प्रश्न पडला. मोना ओठावर ओठ दाबून विजूकडे पाहू लागली आणि विजूने एक डोळा वडील मंडळींचा आदर ठेवीत शक्य तेवढा बारीक केला.

बिपिनने रक्षापात्रातला तो चावट चिरूट उचलला. त्याचे जळते टोक विझवले आणि तो उलगडायला सुरुवात केली.

"बाबा, हे काय आहे, पाहिलंत ?"

"काय ?"

"चिरुटाच्या बाहेरच्या कागदात दिवाळीची दारूबिरू असावी. पण हा आतला कागद–"

"काय आहे त्या कागदाची भानगड ?"

कागद टीपॉयवर ठेवून बिपिन तो हाताने साफ करीत होता. विजू नि मोना उठून त्याच्याजवळ आली होती.

"नोट आहे ती !" विजू ओरडला.

"बाबा, ही नोटच आहे शंभराची !" बिपिन उद्‌गारला, "सुदैवाने तिच्यावरचा नंबर, रिझर्व बँक गव्हर्नरांची सही वगैरे जळालेली नाही. नोटेच्या कडेला शाईने लिहिलंय– प्रेमाची

अल्पशी भेट.''

''हूं !'' बाबासाहेबांच्या चेहऱ्यावर क्षणापूर्वी झळकलेले स्मित मावळून त्याची जागा आता खिन्नतेने घेतली होती. ''म्हणजे मी तिला ओवाळणी घालण्याआधी तिनेच मला–''

''धुवाळणी घातलीन् !'' मोना पुटपुटली.

''वा !'' बाबासाहेब प्रसन्नपणे म्हणाले, ''ही पोरगी हुशार दिसते !''

मोना मात्र गोरीमोरी होऊन जीभ चावत होती.

''आहेच मोना हुशार !'' बिपिनने हसत हवाला दिला. ''आणि हा विजू पण काही कमी नाही.''

''पुरे पुरे ! – बाबासाहेब, हा बिपिनबाबू–''

''बाबू ?''

''हो. आम्ही त्याला बाबू म्हणतो, दादा नाही. पण हा बाबू उगाच आम्हाला चढवतोय. त्यानेच आम्हाला... ए !'' तो एकदम बिपिनच्या कानाला लागून म्हणाला, ''बिपिनबाबू, तुझ्या बाबांची बघ कशी चुळबुळ चाललीय ! त्यांना झुरके मारायला मिळाले नाहीत. बॉक्समधला दुसरा चिरूट दे त्यांना.''

''कशाला ? प्रत्येक चिरुटाचं असंच फट्ट व्हायचं !''

''मला नाही वाटत.''

त्याचे हे बोलणे चालले असताना बाबासाहेब उठले होते आणि स्वत:ची पेटी घेऊन आले होते. त्यातला एक चिरुट उचलून तो ते तोंडात घालीत असताना इकडे बिपिनने आत्याच्या भेट-पेटीतला नंबर दोनचा चिरुट उचलला होता.

''सोलू ?'' त्याने वडिलांकडे पाहत विचारले.

"खुशाल" बाबासाहेब काडी ओढीत म्हणाले, "किंवा त्या पोरांना दे. त्यांनाच आवडतील असली खेळणी !– थट्टेला तरी काही सुमार ! आता मेली गेली म्हणून काही बोलायचं नाही एवढंच !"

दुसरा चिरूट उलगडल्यावर आतला कागद निघाला. त्यावर मजकूर खरडलेला होता– "प्रत्येक चिरुटात शंभराची नोट निघेल असं वाटलं काय तुला ? ओढला असतास तर स्वर्गात गेल्यासारखं वाटलं असतं, इतका उंची चिरूट आहे हा !"

"च्यॅः !" बाबासाहेब उद्‌गारले. "इथे असताना तोंड चुकवीत होती आणि आता मला स्वर्गात बोलावतेय ! पण इतकी उंची तंबाखू असेल तर काढून ठेव. माझ्या पाईपमध्ये घालून ओढीन."

नंबर तीनमध्ये पुन्हा शंभराची नोट निघाली. पण तिच्यावर सुभाषबाबूंचा फोटो होता. शंभर रुपयांऐवजी शंभर शुभेच्छांची नोटेत हमी दिलेली होती. बाबासाहेबांनी नाक मुरडले, तशी विजूने लगेच उठून त्या नोटेवर झडप घातली. बाबासाहेब हसले तेव्हा नोट हडपायला त्यांची संमती आहे, असे त्याने गृहीत धरले.

बिपिन क्रमाने एकेक चिरूट उचलून, काळजीपूर्वक उलगडत होता. चौथ्या चिरुटात गुंडाळलेला होता एक ग्रूप फोटो. तो बिपिनने बाबासाहेबांना दाखवताच ते म्हणाले, "हा आमचा लहानपणचा फोटो आहे. ती परकरवाली पोर म्हणजे आमची चंद्रूताई अन् हा जरीच्या टोपीतला बटू म्हणजे मी. आणि हे तुझे आजी-आजोबा. दे इकडे ! चंद्रीने दिलेली ती सर्वांत महत्त्वाची ठेव मी हीच समजतो. कारण माझ्या संग्रही हा फोटो नाही."

आणि मग पाचव्या चिरुटात एक चिठ्ठी होती– "बस्स ! आता उरलेल्या विड्या तू खुशाल ओढ. तुला त्याची चव आवडेल."

"ओ के ! दे ते बॉक्स इकडे."

बिपिनने शंभराची नोट आत घालून ते चिरुटाचे खोके वडिलांच्या हवाली केले.

बाबासाहेब ती पेटी घेताहेत तोच बाहेरून हाक आली– नमो नमः नमो नमः ! कुणीतरी पाहुणे आलेले दिसतात ! – अरे वा, चिरूटपेटीचं उद्घाटन झालं वाटतं ?" आणि या उद्गारांच्या पाठोपाठ एक गोरी, ठेंगणी ठुसकी मूर्ती आत आली. वयाने पन्नास पंचावन्न वर्षांचे हे गृहस्थ गोलसर अंगाचे होते. प्रसन्नमुख अन् विनोदी. मध्येच डोळे मिचकावण्याची सवय.

"या." बाबासाहेब म्हणाले, "हे मारुतराव सबनीस, बरं का रे ?"

"अंकल टु यू."

"नुसते टु यू काय ? हे सार्वजनिक काका आहेत. कलकत्त्याच्या महाराष्ट्र समाजात हे 'अंकल' म्हणून ओळखले जातात. यवतमाळला वडिलार्जित घराचा ताबा घ्यायला आले आहेत. पण त्यांचं अर्धअधिक आयुष्य कलकत्त्यात गेलं... आणि हे..." तेवढ्यात आत आलेल्या काळचा उंच गृहस्थांकडे हात करीत ते म्हणाले, "हे आत्याचे कारभारी नागेशराव ऊर्फ तात्या."

"माझ्याबद्दल या मुलांचा गैरसमज होईल, बाबासाहेब." अंकलनी परिचयविधी मध्येच तोडला. "मी इतकी वर्षं परप्रांतात होतो, पण मराठीचा माझा व्यासंग सुटलेला नाही."

"त्याबद्दल बोलायलाच नको. बरं का बिपिन, जुन्या मराठी

वाङ्मयावर हे ऑथॉरिटी आहेत. चक्रवर्ती कुटुंबाचे हे अगदी घरोब्याचे मित्र– आणि हा आमचा विपिन अन् हे त्याचे दोन मित्र."

"लक्षात आलं माझ्या ते." विपिनकडे पाहात अंकलनी एक डोळा बारीक केला. "मी केव्हाच ओळखलं तुम्हाला, बिपिनराव."

"रावबीव नको– आणि तुला म्हणा." विपिनने त्यांना अडवले.

"भालो– तुला तर तुला ! पण फार आधी वाट पाहात होतो आम्ही तुझी, बिपिन. तू इतक्या उशिरासा आलास ? अक्काचं दस्तुरखुद्द पत्र तुला आलं होतं ना ?"

"होय. पण जरा उशिरा मिळालं ते आणि आलं म्हणजे अक्षरशः आलं ! आल्याच्या रसाने लिहिलेलं पत्र !"

आणि मोना लगेच म्हणाली, "अदृश्य लिपीतलं." ते ऐकून तात्यांच्या मुखावर हास्यरेषा उमटली.

"त्याचा अर्थ लावण्यासाठी आम्हाला ते गॅसवर धरावं लागलं." विजू.

"तोपर्यंत आम्हीच गॅसवर होतो." मोनाने पुन्हा जीभ चावली.

या मुलांवर खूष झालेले अंकल खुदकन् हसले. "हे मात्र मला माहीत नव्हतं, बरं का ? पत्र लिहिलंय एवढंच म्हणाल्या. अक्कांच्या विचित्रपणाचा हा आणखी एक नमुना. पण विचित्र असल्या तरी मनाने उदार होत्या. आपल्या जवळच्या सर्वांना त्यांनी काही ना काही वारसा ठेवलाय. विपिन, मला वाटतं, या भाग्यवंतात तुझाही शेअर असावा."

"मी त्या आशेने आलो नाही, अंकल. पत्राने गोंधळून जाऊन मी ताबडतोब आलो. पण इथे येतो न येतो तो आत्या गेल्याचं

कळलं. तेव्हा माझा शेअर फक्त दु:खाचा आहे."

"हूं." बाबासाहेब एक उसासा सोडून म्हणाले. "मारुतराव, तुम्ही दहा मैलांवरून आला आहात. आधी चहा-बिहा घ्या. मग आपण बोलू."

"बोलायचं तर पुष्कळच आहे." मारुतराव सबनीस ऊर्फ अंकल अंगातला कोट काढीत म्हणाले, "कारण अक्कांचा एक्झिक्यूटर मीच आहे."

ताट्या नि ते आतल्या खोलीत गेले अन् इकडे विजू हळूच म्हणाला,

"हे काय बोलले, बिपिनबापू ? एक्झिक्यूटर म्हणजे मारेकरी ना ?"

"तो एक अर्थ झाला." बिपिनने हसू दाबीत हळूच सांगितले. "एक्झिक्यूट करणं म्हणजे अमलात आणणं असाही अर्थ होतो. अक्कांनी जे काय इच्छापत्र केलं त्याची अंमलबजावणी हे अंकल करणार आहेत."

"दिसतात किती मजेदार, नाही हे अंकल ?" मोना कुजबुजली. "त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर मला कवितेची एक ओळ सुचली !"

"हो का ? ती काय ?"

"ट्विंकल ट्विंकल लिटल् अंकल !"

तिघांमध्ये हास्याची एक हलकीशी लकेर उठली. बाबासाहेब तोंडातला चिरूट काढून त्यांच्याकडे पाहू लागले, तेव्हा त्यांनी आपला विनोद एकदम आवरला.

३ मृत्यूपूर्वीचा इतिहास

चंद्रू-आत्याच्या ऊर्फ अक्कांच्या मृत्यूमुळे सिंदुर्णीच्या शेती-वाडीवर अवकळा पसरली होती. कपाशीची बोंडे खुडून कापसाच्या गोणी केव्हाच भरून झाल्या होत्या. पण गोणी अकोल्याच्या जिनिंग फॅक्टरीकडे धाडण्याचे काम थबकले होते. त्यासाठी बोलावलेले मालट्रक आता एवढ्यात येणार नव्हते. दरम्यान त्या सुकलेल्या वाफ्यांना पाणी देऊन त्यात भाजीपाला लावण्याचे

कामही लांबणीवर पडले होते. शेतावर पंचवीस-तीस मजूर कामाला असत. पण अक्का गेल्यापासून तिथं शुकशुकाटच होता. शेतीच्या सर्व कामावर तात्यांची देखरेख असे. त्यांनीच संध्याकाळी विपिनला नि त्याच्या छोट्या मित्रांना सगळ्या वाडीतून फिरवून आणले.

"केवढा प्रचंड पिंपळ आहे, नाही ?" विपिन म्हणाला. "असा पिंपळ पाहिला की आदर वाटतो– जसा काही एखादा पुराण-पुरुष !"

"होय. पण या पिंपळाबद्दल गावकऱ्यांना आदरापेक्षा भीतीच जास्त वाटते. कारण–"

"कारण काय ?"

"कारण तो झपाटलेला वृक्ष आहे. त्याच्यावर दोन मुंज्ये वास करतात."

"वास ?" विजूने नाक मुरडले.

"वास म्हणजे वस्ती." तात्यांनी सांगितले. "आणि मुंज्या म्हणजे ज्याची सोडमुंज व्हायची राहून गेलीय असा मुलगा. तो मेल्यावर भूत बनून एखाद्या पिंपळावर बसतो म्हणे."

"तिथे बसून तो काय करतो ?"

"लोकांना छळतो, दुसरं काय ? म्हणून सारा गाव या पिंपळाला वचकून असतो. लोक पारावर बसतील, पण झाडावर चढणार नाहीत. कारण मुंज्या मानगुटीवर बसेल ही भीती !"

"आणि चंद्रूआत्याचाही विश्वास होता असल्या भाकडकथेवर ?" विपिन.

"नाही." तात्या गालातल्या गालात हसून म्हणाले. "पण त्यांचं मत जरा वेगळं असलं तरी असंच चमत्कारिक होतं."

"म्हणजे ?"

"त्या सर्वांना सांगत की, जो कुणी मध्यान्‌रात्री या पिंपळावर वरपर्यंत चढेल त्याला धनलाभ होईल. अक्कासाहेबांना म्हणे स्वप्नात तसा दृष्टांत झाला होता !"

"हूं !" त्या पिंपळाकडे जिज्ञासेने पाहात विजू-मोना पुढे निघाली– आपण केव्हातरी या झाडावर चढणार असे मनोमन ठरवीत.

"संत्र्याचं पीक यंदा नामी आलंय." तात्या म्हणाले, "बंग्या भरायला उद्यापासून सुरुवात होईल. पुण्या-मुंबईकडे तर आमचं फळ जातंच, पण आमचं मुख्य गिऱ्हाईक आहे बंगाल अन् बिहार."

संत्र्याशिवाय पेरूचीही बरीच झाडे होती अन् एका वावरात गहूही लावलेला होता.

"तात्या," बिपिनने विचारले, "चंद्रूआत्याला स्वतःला आवड होती का हो बागकामाची ?"

"म्हणजे ?" तात्या म्हणाले. "अरे, विलक्षण आवड होती. त्याशिवाय का एवढं सगळं उभं राह्यलं ? कल्पना करा– पतीच्या मृत्यूनंतर, मूलबाळ नसताना आणि नातेवाइकांकडे पाठ फिरवली असताना, एवढं नंदनवन एकटचा बाईने उभं करणं सोपं काम होतं का ?... आता अक्काचं खूप वय झालं होतं, तरी त्या स्वतः सगळ्या वावरांमधून हिंडत. खतपाणी नीट दिलं जातं की नाही, कुठे कीड वाळवी लागली नाही ना, गुरांना चारापाणी व्यवस्थित मिळतंय की नाही हे पाहात. ट्रॅक्टरसारखी यांत्रिक अवजारं कुठल्या सोसायटीतून कुठली आणायची हे त्या कॅटलॉग पाहून स्वतः ठरवीत. बाजारातून बीबियाणं आणण्यापासून तर कापणीपर्यंत प्रत्येक गोष्टीबद्दल त्या माझ्याकडे कसून चौकशी

करीत. अलीकडे आजारी पडल्यापासून त्यांना चालवत नसे. पण विचारपूस नेहमीच चालायची."

"एक विचारू का ?" बिपिन खाली पडलेलं एक बोंड उचलीत म्हणाला, "त्यांचा जो हौशी नि विक्षिप्त स्वभाव होता तो कधी या कामात आड आला का ?"

तात्या हसले. "अगदी योग्य प्रश्न विचारलात." ते म्हणाले, "अहो, तेवढ्यावरून तर त्यांची–माझी पुष्कळदा झकाझकी व्हायची !"

"त्याला अहो म्हणू नका." विजूने तात्यांना वजावले. "तुम्ही अहो म्हटल्यावर त्याने कसं नाक उडवलन् पाह्यलंत् ?"

तात्यांनी क्षणभर रोखून बिपिनकडे पाहिले. मग ते मोठ्याने हसून म्हणाले, "ठीक आहे. 'अरे' म्हणतो. कॉलेज विद्यार्थ्यांच्या बाबतीत आमच्यासारख्यांना नेहमी प्रश्न पडतो !! पण मी अक्कांचं सांगत होतो. त्या कुठेतरी काही तरी वाचीत अन् आपल्या पिकांवर ते प्रयोग करीत. बिपिन, तू आत्ता उचललेलं बोंड पाहिलंस ना ? हिरव्या रंगाचं आहे ! रंगीत कापूस पिकवण्याचं त्यांना वेड होतं !"

"उपयोग काय रंगीत कापसाचा ? शेवटी तो गादीतच भरायचा ना ?"–मोना.

"तेच तर ! पण एवढा विचार करावा कुणी ? त्यांच्याच कल्पनेप्रमाणे एकदा आम्ही राक्षसी आकाराची संत्री काढली. चांगली फूटबॉलएवढी मोठी. पण ती बेचव निघाली ! आंब्याची झाडं आमच्याकडे फार नाहीत. पण आंबा हे अक्कांचं लाडकं फळ. एकदा कोयींत तऱ्हेतऱ्हेची अत्तरं भरून सुवासिक आंबे काढण्याचा प्रयोग त्यांनी केला. पण आंबा तो आंबा ! त्याला हिना-चमेलीचा

वास मारलेला कुणाही गिऱ्हाइकाला आवडला नाही. तरी पण नॉव्हेल्टी म्हणून काही पेट्या खपल्या. एकदा अक्कासाहेबांनी कोयीत काय ठेवलं, माहीत आहे ?"

"हळदकुंकू ?" मोना म्हणाली. "कोय म्हणजे एक प्रकारची कुयरीच वाटते."

"अक्कांनी मोती ठेवले या कुयरीत !"

"मोती ?" विजू उद्‌गारला. "ते कशाला ? लाडक्या कैरीला नथ की आंब्याला भिकबाळी ?"

तात्या हसत म्हणाले, "तसंच काही नाही. दागिन्यांचं प्रेम नव्हतं त्यांना. कोयीतल्या मोत्याचं काय होतं ते त्यांना बघायचं होतं. पण पुढे रोप उगवल्यावर त्या बघायचं विसरल्या. नंतर झाड मोठं झाल्यावर मुळाशी कितीही खोदलं तरी त्या कोयीचा किंवा मोत्याचा थोडाच पत्ता लागणार होता ? सारं मातीला मिळालं ! – पण एक मात्र चमत्कार झाला."

"चमत्कार ?"

"चमत्कारच म्हणायचा. दुसरं काय ? ते एकच झाड रसरसून वाढलं. तीन हजार आंबा लागला. मोठं नि गोड फळ !"

"मोत्यामुळे ?"

"ते कुणास ठाऊक ! पण अक्कासाहेब मात्र त्यामुळे खुषीत होत्या. 'म्हटलं नव्हतं मी ?' वगैरे बोलल्या ! संत्र्यांना उधई लागते. त्यावर उपाय म्हणून मोरचुदाचं पाणी मारतात– हल्ली कृत्रिम रसायनंही भरपूर मिळतात. पण आमच्या अक्कासाहेबांनी मात्र एक आगळाच उपाय केला."

"तो कोणता.?"

"गुळाचे खडे त्यांनी आळ्यात ठेवले, त्यामुळे जे मुंगळे जमा

झाले त्यांनी उधईच्या किड्यांना खाऊन टाकलं ! जीवो जीवस्य जीवनम् !"

"वा ! पण ते मुंगळेच शिरजोर झाले नाहीत ?"

"झाले की ! म्हणजे शेवटी कीटकनाशक द्रव्य आणावंच लागलं."

हे ऐकून सर्वांनाच हसू कोसळलं.

घरी परतताना तात्यांनी आणखी एक किस्सा सांगितला. अमेरिकेत म्हणे एका शेतकऱ्याने एका झाडावर निरनिराळी कलमं करून त्याला सोळा जातीची फळं आणली होती. "अक्कांनी हे वाचलं आणि आपल्या बागेत तो प्रयोग केला, पण कलमं फळण्याऐवजी झाडच मरून गेलं !"

बोलत बोलत ते घरी पोचलेही.

पार्वती नावाची सुगरण बाई स्वयंपाकाला होती. तिच्या हातचे जेवण फस्त केल्यावर मंडळी बैठकीच्या खोलीत जमली. आत्याने हा दिवाणखाना चांगला सजवला होता. छताला चार कोपऱ्यांत चार सुंदर विद्युद्दीप होते. मध्यभागी काचेच्या लोलकाचे झुंबर लटकत होते. आरामशीर खुर्च्या नि कोच होतेच, पण शिवाय एका भिंतीलगतच भारतीय बैठकही घातलेली होती. शोभा वस्तूंमध्ये काष्ठशिल्पे नि रंगीबेरंगी दगड यांचा भरणा विशेष होता. भिंतींवर उत्कृष्ट पाश्चात्त्य नि भारतीय रंगीत चित्रे लटकत होती आणि काचेची तावदाने असलेल्या छोट्या कपाटातून सुबक ब्रांधणीची काही पुस्तके रचलेली होती.

बैठकीवर बसून तात्यांनी पानांचा डबा पुढे ओढला आणि बाबासाहेबांना नि अंकलना विडे करून दिले. एकीकडे पान बघळीत, बहिणीने दिलेला चिरूट बाबासाहेबांनी आता बिनधोक-

पणे शिलगावला. एक झुरका घेऊन ते म्हणाले, "मारुतराव आता आपल्याला काही माहिती देणार आहेत, बिपिन. बोला, अंकल !"

आणि अंकल विडा चघळीत म्हणाले, "तसं बोलायचं फारसं नाहीच आहे म्हणा. झालं काय– मी कलकत्त्याहून यवतमाळला चार महिन्यांपूर्वी आलो. तिथून लगेच इकडे आलो. तोपर्यंत चंद्रू-अक्कांचा कागदपत्रांचा व्यवहार हे तात्या पाहात असत. आणि अजूनही पाहतात म्हणा. मी आलो तेव्हा अक्कांची तब्येत बिघडलेलीच होती. मग यवतमाळला न परतता मी नि माझी पत्नी दोघं इथेच राहिलो. अक्कांची जमेल तेवढी सेवा केली. त्यांना क्षयरोग झाला होता."

"बाप रे !"

"डॉक्टर बी सी जी ची लस टोचायला लागले तशी त्या म्हणाल्या, 'डॉक्टर, ती लस राहू द्या बाजूला, त्या बाटलीत मी रस भरून ठेवलाय ना, त्याचं द्या मला इंजेक्शन.'"

हे सांगताना अंकलनी एक डोळा मिचकावला होता.

"डॉक्टर ते ऐकून चाटच पडले. 'रस ? कसला रस ?' ते म्हणाले, 'कांद्याचा !' अक्कांनी सांगितलं, 'क्षयरोगावर कांद्याचा रस हा खात्रीलायक उपाय आहे. तो रक्तात टोचतात म्हणे.' '–अहो, असेलही तसं. पण तुम्ही विळीवर चिरलेल्या कांद्याचा रस मी सरळ तुमच्या रक्तवाहिनीत टोचू ? मला शिक्षा होईल, मिसेस् चक्रवर्ती.' आणि त्यांनी हा अघोरी उपाय करण्याचं साफ नाकारलं. अक्का रागावल्या. पण करतात काय ? मग त्यांनी कच्चे कांदे खाण्याचा सपाटा लावला."

"ते ठीक आहे म्हणा." बाबासाहेब म्हणाले, "क्षयरोग्याला

कांदा चांगला."

"मी त्याच वेळी त्यांना विचारलं की, 'नात्यातल्या मंडळींना बोलावून घेऊ का?' तशी माझ्यावरच उखडल्या– 'काही नको! मला काय धाड भरलीय? क्षयाचा रोगी खूप दिवस जगतो! आणि तसं म्हटलं तर मला आहेच कोण नात्यातलं?'"

बाबासाहेबांनी पटदिशी चिरूट काढला. त्यांना ठसका लागला होता.

"मग आम्ही दोघं यवतमाळला निघून गेलो. अक्कांची काळजी घ्यायला इथे तात्या नि कामगार मंडळी होतीच. तात्या त्यांची खुशाली पत्राने कळवीत असत. दोन महिन्यांनी कळलं की अक्का अगदी बिछान्याला खिळल्या आहेत आणि अकोल्याहून एक नर्स आणलेली आहे. लगेच मी इकडे निघून आलो. पत्नीची तब्येत बरी नव्हती म्हणून एकटाच आलो. अक्का खालावत चालल्या होत्या. बिछान्यातून उठवत नव्हतं. शब्द क्षीण येत. तुम्हा मंडळींचे पत्ते माझ्याजवळ होते, म्हणून मी पत्रं टाकली. हिलाही कळवलं. ती येऊन भेटून गेली. सर्वांना पत्र लिहिल्याचं अक्कांना सांगितलं. त्या काही बोलल्या नाहीत. पण त्यांनी माझ्या हातात काही पाकिटं दिली– लिफाफे. मी अगदी कान देऊन त्यांच्या सूचना ऐकत होतो... 'मी पूर्वीच तयार करून ठेवलेत हे लिफाफे. वर नावं आहेत. ज्यांचे त्यांना द्या. माझी शेवटची भेट आहे म्हणावं. नाकारू नका आणि रागावले गागावले असेन त्याची क्षमा करा. जे दिलं ते किती दिलं नि कसं दिलं याची खंत न करता प्रेमाने घ्या म्हणावं–' त्यानंतर दोनच दिवसांनी त्यांनी प्राण सोडला. डॉक्टरांनी शेवटी खूप उपचार केले, पण काही इलाज चालला नाही."

४ घरात पाकिटं, दारात बग !

"पाकिटातून अक्कांनी प्रत्येकाला काही ना काही निरोप ठेवला होता." नागेशराव ऊर्फ तात्या कारभारी सांगत होते, "तो लिहिण्यासाठी त्यांनी माझी मदत घेतली होती. आपल्या विनोदी स्वभावाला अनुसरून या इच्छापत्रांच्या बाबतीत त्यांनी आणखीही भलभलते उद्योग केले. त्या सर्व कामांत माझा हातभार लागलेला आहे. पुढे पाकिटांची विल्हेवाट लावण्याचं काम मात्र त्यांनी अंकलसाहेबांवर सोपवलं."

"भीषण बिचित्र काज!" अंकलनी सहज समजणाऱ्या बंगालीत शेरा मारला.

"तिच्या या इच्छापत्रात कोण कोण वाटेकरी आहेत?"

"तसे फारसे कुणी नाहीत. चक्रवर्तींनीही खूप पैसा कमावून ठेवला होता. तो अक्कांनी आपल्या बंगाली भाच्या-पुतण्यांना वाटून टाकला. सिंदुर्णीची ही इस्टेट विकून टाकावी आणि येणाऱ्या पैशांतून निम्मे इथल्या आदिवासी मंडळाला देऊन टाकावेत, असं त्यांनी लिहिलंय."

"उत्तम!" बाबासाहेब आपल्या चिरुटाकडे पाहात म्हणाले. "म्हणजे सुखवस्तूंच्या डोळ्यांवर संपत्तीचा धूर यायला नको– पण निम्मे पैसे? उरलेल्या निम्म्याचं काय?"

"त्यासाठीच ही पाकिटं आहेत." अंकल हातातली पाकिटे दाखवीत हसून म्हणाले, "तुम्ही माहेरची मंडळी याचे वारसदार आहात."

"माझा वाटा मला मिळालाच आहे." भुवया आक्रसून कडी-पाटाकडे पाहात बाबासाहेबांनी एक झुरका घेतला. धुराचे एक वलय तरळत वर गेले.

"बिपिनराव, तुम्ही–"

"तू टू यू अंकल."

"बरं, तू– तू आलेलाच आहेस. तुझ्यासाठीही एक पाकीट आहे. पण जरा सबुरीने घे."

"मला कुठे घाई आहे?" बिपिन म्हणाला. "माझा भविष्यावर विश्वास नाही, तरी भविष्यदर्पण मी वाचलेलं आहे. माझ्या धनरेषेप्रमाणे माझी आयुष्याची रेषाही जोरदार आहे. मी वाटेल तितका थांबू शकतो."

"उत्तम." अंकल डोळे मिचकावीत म्हणाले, "मग तुझं पाकीट मी शेवटाला ठेवतो. नाहीतरी क्रम तोच ठरलेला आहे. पण आय प्रॉमिस यू ए प्लेझन्ट सरप्राइझ !"

हे ऐकून मोनाने "आहे ब्बुवा" पुटपुटत बिपिनच्या बाहूला एक चिमटा काढला.

बाबासाहेबांनी चिरुटाच्या टोकाला टिचकी मारीत विचारले, "उरलेले भाग्यवंत कोण ?"

"चारच माणसं उरतात." अंकल म्हणाले. "एक म्हणजे किशाबापू पंडित आणि दुसरे बजरंग ब्रह्मे. दोघेही अक्कांच्या दोन मावसबहिणींचे मुलगे. भाचे त्यांचे."

"म्हणजे माझेही अर्थात." बाबासाहेब म्हणाले. "चांगले माहीत आहेत. त्यांच्या आया आमच्याकडेच होत्या तरुणपणी. या दोघा भाच्यांपैकी बजरंगाने कधी संसारच केला नाही. ब्रह्मचारी आहे. समर्थांचा अनुयायी. चाफळला राहतो. राहणं नाममात्र. कारण त्याच्या पायाला भिंगरी आहे. देशभर भटकत असतो. जगाला सुधारण्याचं कंकण बांधलंय त्याने."

"त्यांच्या भ्रनक मंडळाला अक्कासाहेबांनी एकदा देणगी दिली होती." तात्यांना आठवले.

"भ्रनक मंडळ ?"

"भ्रष्टाचार नष्ट करा मंडळ !"

बाबासाहेब हसले. "अच्छा ! आणि किशाबापूला पण ठेवलंय ना ? त्याने संसार थाटलाय खरा, पण थाटमाट नाही. कर्जतजवळ आडरानातच झोपडी बांधून राहतो. बायका-मुलांसह. आदिवासी लोकांना शिकवतो. भजन करतो. पण संसाराच्या नावाने भोपळा. तो बज्या रामदासांचा भक्त, तर हा तुकारामबाबांचा. दोघेही

अवलिया !"

"या दोघांना मी एकदाच पाहिलंय– आणि तेही एकत्र !" बिपिन म्हणाला, "दोघांची अशी वादावादी चालली होती की मी ऐकतच राहिलो. शेवटी मीच मध्ये पडलो आणि रामदास स्वामींचंच एक वाक्य त्यांच्या तोंडावर फेकलं. 'अति वाद करू नये !'– पण एकंदरीत ही चक्रमपणाची देणगी आत्याला दोन्ही घराण्यांकडून मिळाली होती म्हणायची."

"जगावेगळी बाई होती ही आत्या." मोना पुटपुटली.

बाबासाहेबांनी ते ऐकले.

"हा तुमचा बिपिनबाबू तरी काय कमी जगावेगळा चक्कर आहे ?" ते म्हणाले.

अंकल अजून ती रहस्यमय पाकिटे हाताळीत होते. ते एकदम म्हणाले, "उरलेली दोन पाकिटं रक्ताच्या नातेवाइकांसाठी नाहीत. स्नेह्यांसाठी आहेत. हे छोटं पाकीट आहे प्रफुल्ला सेन-साठी."

"कोण ही प्रफुल्ला सेन ?"

"कलकत्त्यात सेन नावाच्या बंगाली कुटुंबाशी चक्रवर्तींचा खूप घरोबा होता. पुढे धाकटचा सेन बंधूने मुंबईला नोकरी धरली आणि तो महाराष्ट्रात स्थायिक झाला. त्याची बेबी ऊर्फ प्रफुल्ला नावाची छोटी मुलगी अक्कांची फार लाडकी होती. आता ती मुंबईच्या ग्रँट मेडिकलमध्ये शिकत असते. आम्ही तिलाही पत्र टाकलंय. एक-दोन दिवसांत तीही येऊन हजर होईल."

"व्हेरी गुड." बाबासाहेबांनी एक भपकारा सोडला.

"आणखी एक पाकीट आहे." अंकलनी तात्यांकडे पाहात समारोप केला. "देवाचं देणं" एवढे दोनच शब्द त्या पाकिटावर

खरडलेले आहेत. या तात्यांचंच अक्षर. आपण हे शेवटी फोडू.''

"लास्ट बट वन." विपिन म्हणाला. "शेवटचा नंबर तुम्ही आधीच मला बहाल केला आहे."

"चालेल. देवाला काहीही चालतं. खरं म्हणजे पहिलं दान देवाला देतात. पण अक्कांच्या बाबतीत उलटा न्याय द्यायला हरकत नाही."

"काय हे अक्कांचं वुइल् ! हे इच्छापत्र नसून इच्छासत्र आहे !" विपिन म्हणाला.

"हे एक पाकीट विसरलात तुम्ही !" तात्या एकदम म्हणाले. "प्रिय मैत्रीण शकुंतलाबाई परब–"

"खरंच की !" अंकल म्हणाले. "सॉरी हं ! या बाई इथे सिंदुर्णीला दोन वेळा येऊन गेल्या आहेत. दोन्ही वेळा मी बाहेरगावी गेलो होतो. बाबासाहेब, तुम्हाला माहीत असतील या परब बाई ? अक्कांची बालमैत्रीण."

"नाही बुवा ! लहानपणी मनू, अंबी, सखू असे दोन-तीन नग तिच्या– अक्कांच्या खास मैत्रीतले होते एवढं मला आठवतं. पुढचं मला माहीत नाही. लग्नानंतर मुलींची नावं बदलतात. सखू ही एक भलती जहांबाज, पण शेंबडी पोर होती. परकराच्या टोकाने सारखी नाक पुसायची. त्या सखूचीच पुढे कदाचित शकू झाली असेल. शेंबड्या बायकोच्या बाबतीत कुणीही नवरा 'स' चा 'श' अन् 'खू' चा 'कू' करील !" आणि असे म्हणून आपण केवढा विनोद केला अशा अर्थी बाबासाहेब खो खो हसू लागले.

अंकलचे डोळे पुनः पुन्हा मिचकणारे, त्यामुळे भुवया वारंवार

आक्रसायच्या. पण आत्ताचे बाबांचे बोल ऐकून त्यांचे डोळे मोठाले झाले, अन् भुवया वर गेल्या.

"या शकूताईंचा सध्याचा पत्ता मात्र सापडलेला नाही." तात्या असे बोलताहेत तो बाहेरचे दार खटखटले. सोमा जाऊन दार उघडतो आहे तोच एक बुभुक्कार येऊन कानांवर आदळला.

"हुंः हुश्श् ! आहे का हो कुणी घरात ?" आणि मग "येता येता वाटेत कळलं– चंद्री भूत होऊन वर गेली. तशी म्हटलं, कुठला मुहूर्त काढून आलो आपण ! आणि आता आलोय तर भेटायचं तरी कुणाला ? मेली जिवंत असतानाही भुतासारखी एकटी राहायची..."

हे वाक्य पूर्ण होईतो तात्या दाराशी गेले होते. एक उग्र चेहऱ्याच्या म्हाताऱ्या चष्मेवाल्या जाडजूड बाई उंबरठ्यावर उभ्या होत्या. त्यांनी सुरू केलेले भाषण स्वगत होते की हातात बॅग घेऊन शेजारी उभ्या असलेल्या खेडवळ माणसाला उद्देशून होते, कुणास ठाऊक ! आता तात्यांना पाहून त्या गुरगुरल्या, "आपण कोण ?"

"मी नागेशराव. तात्या म्हणतात मला. अक्कांचा कारभारी मी– या ना आत." असे म्हणून त्यांनी त्या माणसाच्या हातातली बॅग घेतली.

"याने वाट दाखवली का ?"

"हूं." कारभारी तात्यांचा हा कारभार सूक्ष्मपणे न्याहाळत असलेल्या पाहुण्या बाई नाराजीने म्हणाल्या, "म्हणजे वाट लावलीन् म्हणा. असो. चांदण्यातून इथवर धिंडका पोचवलीस तेव्हा हा घे रे रुपया आणि कर इथून काळं !"

बाईंचे व्यक्तिमत्त्व असे ठसठशीत की त्या दिवाणखान्यात प्रविष्ट होताच उपस्थित मंडळी वचकून उभी राहिली.

विद्युत्प्रकाशात दिसलेले दृश्य विलक्षण होते. बाईंच्या कपाळावरून घाम ओघळत होता. त्यात कुंकवाचे फराटे उमटले होते. थोड्याशा वाटचालीनेही चष्म्याआडचे डोळे तळावले होते. डोळ्यांच्या कोपऱ्यात तयार होत होत्या गंगोत्री, जम्नोत्री. दोन्ही नाकपुड्या तांबूस अन् ओल्या बनल्या होत्या आणि तरी नजर भेदक होती.

"बसा ना !" तात्या म्हणाले.

बाईंनी एकदा हॉलभर नजर फिरवली, स्वागत समितीला निरखून घेतले. आतल्या खोलीकडेही एक दृष्टिक्षेप केला आणि वेताच्या एका प्रशस्त खुर्चीत बूड आदळीत त्या म्हणाल्या, "मंडळी, मला माफ करा ! इथे जमलेल्या एकालाही मला चंद्रीचं असलं कळवण्याची बुद्धी झाली नाही आणि मला चंद्रीला भेटायला येण्याची बुद्धी झाली ती नेमकी आताच. बुद्धिबळाचा डाव, अडीच घरांची आडनाडी चाल. नाहीतर क्वीन गेल्याचं आधी कळतं तर माझं तट्टू मी इथपर्यंत कशाला दामटलं असतं ?"

सोमाने आणलेल्या तांब्यातले पाणी पिऊन त्यांनी फुलपात्र खाली ठेवले आणि त्या म्हणाल्या, "मी नि चंद्री लहानपणी सागरगोटे खेळलोत, फुगड्या घातल्याहेत अन् भेंड्या लावल्याहेत. पाठांतर जबरदस्त, त्यामुळे भेंड्यांत कधी कुणाला हार गेलो नाही. आणि भेंड्या म्हणजे अस्सल कविता बरं ! वामनपंडित, तुकाराम अन् मोरोपंत जिभेवर नाचत. आजच्यासारखी सिनेमातली झिजवट नाणी नव्हतो वापरत आम्ही ! देह दोन, पण जीव एक होता आमचा !" बोलता बोलता त्यांच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या. रुमालाने त्यांनी अश्रू टिपले आणि त्या रुद्ध कंठाने म्हणाल्या, "पण तुम्ही म्हणाल, ही कोण बया अन्

काय बडबडते आहे ? तशी मी इथं दोन वेळा येऊन गेले आहे पण दोन्ही वेळा हे कारभारी इथे नव्हते. आणि हे–"

अंकलकडे नि बाबासाहेबांकडे पाहात त्या पुढे म्हणाल्या, "तुम्ही पण नव्हता. त्यामुळे ओळखी मेल्या झाल्याच नाहीत. असो. अखेर चंद्रीचं असं व्हायचं होतं ! वाईट काय झालं म्हणा ? सोनंच झालं ! पण मरायच्या आधी मी मेली भेटले असते तर बिघडलं असतं का ? पण नशिबात नव्हतं ! अ...अ..." बोलता बोलता त्यांचा नूर एकाएकी पालटत गेला. त्यांना कसला तरी भयंकर ताण बसत होता असे दिसले. चेहरा लालबुंद झाला, डोळे संकोच पावले, त्यांतून गंगा-यमुना निघाल्या.

बाईंनी रुमाल नाकाकडे नेला आणि एक जबरदस्त शिंक दिली. "आच्छि: !"

"मी ओळखलं तुम्हाला !" त्या दृश्याकडे पाहात बाबासाहेब एकदम उद्गारले.

बाईंनी डोळे तांबारले, दुसरी एक शिंक फेकली आणि पुन्हा विस्फारलेल्या नेत्रांनी बाबासाहेबांकडे पाहात त्या म्हणाल्या, "मीही तुम्हाला ओळखलं ! बुकलवार ना तुम्ही ?– चंद्रीचा धाकटा भाऊ बाबल्या ?"

"गुन्हा कबूल ! आणि तुम्ही सखूताई ना ?" बाबासाहेबांच्या दृष्टीपुढे परकराला शेंबूड पुसणारी छोटी सखू दिसत होती.

"सखुताई होते. पन्नास वर्षांपूर्वी शकुताई झाले. शकुंतलाबाई परब."

आणि बाबासाहेब विजयी मुद्रेने सर्वांकडे का पाहात आहेत हे शकूताई परबांना कळेना.

तात्या मात्र म्हणाले, "बरं झालं तुम्ही आलात. आम्हाला तुमचा पत्ताच सापडत नव्हता."

५ हे हुंबे की टोणपे ?

मध्यरात्र उलटून गेली होती. शकूतईच्या नाटचपूर्ण एन्ट्रीने दणाणलेला सिंदुर्णीचा सुतकी बंगला आता शांत झाला होता. पार्वतीबाईंनी आयत्या वेळी शिजवलेले भात-पिठले खाऊन तात्यांनी दाखवलेल्या खोलीत ती महामाया झोपी गेली होती. बाकीचे वडीलधारेही झोपले होते. बिपिन, विजू नि मोना यांची सोय एका कडेच्या खोलीत केलेली होती. तिथल्या खिडकीतून बागेचे दृश्य दिसत होते. फिकट चांदण्यात झाडे न्हाऊन निघाली

होती. वारा चांगला सुटला होता आणि दूर अंतरावर तो जुना-पुराणा पिंपळवृक्ष आपल्या शेकडो वर्षांच्या जागेवर अंग झटकीत उभा होता.

मोना मध्येच जागी झाली. आणि मग किती तरी वेळ तिला झोप येईना. पिंपळाच्या प्रत्येक सळसळीबरोबर तिचे अंग थर-थरायचे. भीतीच्या नि कुतूहलाच्या नजरेने ती त्या अश्वत्थराजां-कडे पाहात होती. मध्येच अकाली 'काव काव' करीत एक कावळा कुठून तरी आला आणि झाडाच्या अगदी वरच्या फांदीवर बसला. तशी तिथे फडफड झाली अन् 'किच्च' आवाज झाला. तो तिथल्या 'नाईट वॉचमन' वाघळाचा असणार.

आणि मग मोनाची नजर खाली वळली. तिला असा भास झाला की खालच्या मोठ्या फांदीवर काहीतरी पांढुरके हलते आहे. भासच होता का तो ? नाही पुन्हा काही तरी हलले– थरथरले. आणि एक नाही, चांगले दोन पांढरे भुरके धब्बे थड-थडताना दिसले.

दोन्ही हातांनी खिडकीचे गज धरून बारीक डोळ्यांनी मोना बाहेर पाहात होती. पांढऱ्या फटफटीत आभाळाच्या पडद्यावर पिंपळाची प्रचंड सावली अन् त्या सावलीपुढे तरळत असलेले ते दोन ढग. नजरबंदी झाल्यासारखी मोना तिकडे पाहत होती आणि मग चपापून तिने मागे पाहिले. तिचा बाहू विजूने पकडलेला होता.

"काय पाहते आहेस, मोना ? तुला झोप नाही आली ?"

मोनाने ओठ दाबले. "आली होती, पण आता नाही येत– तू पाहिलंस ते ?"

"पांढरं पांढरं ना ? हूं ! ते मुंज्ये तर नसतील ? पिंपळावर

मुंज्ये राहतात ना दोन ?"

"आपण संशोधन करू या. येतोस ? की भीती वाटते ?"

"भीती ? हट्! चल, जाऊ या."

दोघांनी पांघरुणे फेकली अन् ती कॉटखाली उतरली. त्यांना काटकोन करून भिंतीलगत जी पलंगडी होती तिच्यावर बिपिन झोपलेला होता– कुशीवर. त्याची यांच्याकडे पाठ होती.

दोघे चोरपावलांनी निघाली. खोलीबाहेरच्या बोळकंडी जागेतून चाचपडत जात त्यांनी मागचे दार गाठले. कडी खाली आहे की वर हे माहीत नसल्यामुळे त्यांना तिथेही चाचपावे लागले. विजूचा हात लागून काही तरी सरकले अन् जमिनीवर पडले– कटक्– खण्ण ! केवढा तरी आवाज झाला.

ऊप् ! आवंढा गिळीत विजूने मोनाचा हात दाबला. दोघे भिंतीला लगटून उभी राहिली.

सुदैवाने कुणी उठले नाही. ओसरीवरून एकदाच कण्हल्यासारखा आवाज आला. पुन्हा काही नाही. सोमा असणार. कुशीवर वळला असेल, पुन्हा झोपला असेल.

विजू– मोनांत कुजबुज झाली–

"दाराला काय टांगलं होतं बुवा ?"

"ते केराचं सूप असेल पत्र्याचं. पण इथे का ठेवतात ते ?"

"मुद्दामच ठेवलं असेल. चोरबीर आला तर आवाज व्हावा म्हणून !"

काही क्षण दोघे चुप्प उभी राहिली. मग–

कडी कुठे आहे हे एव्हाना लक्षात आले होते. थोडी खसबस करीत विजूने ती काढली. दरवाजा उघडला. 'झुम्' करीत वाऱ्याचा एक लहानसा झोत आत आला. दोघे बाहेर पडली.

मोनाने मागे दार ओढून घेतले.

बाहेर फुलझाडांच्या गर्दीमधून चांदणे ठिपकत होते. वर पाहावे तर चंद्राचे अर्धेमुर्धे बिंब पानांच्या जाळीतून पश्चिमेला उतरत होते.

विजूने मोनाचा हात धरला. दोघेही दबकत आजूबाजूला पाहात बागेतल्या वाटेवरून पिंपळाच्या पाराकडे चालली होती. अनवाणी पायांना खडे बोचत होते. वाळलेली पाने कुरकुर करीत होती. पाराच्या दिशेने काही तरी बडबडही ऐकू येत होती.

आणि हळूहळू शब्दही स्पष्ट ऐकायला येऊ लागले. कुणी तरी दोन व्यक्ती बोलत असाव्यात. होय, व्यक्तीच असणार. अव्यक्त भुते नव्हती ती.

बागेतली वाट संपत आली तशी एका मोठ्या झाडाआड उभी राहात मोना कुजबुजली, "ते बघ !"

विजूही झाडाआड होत डोकावला.

"पारावर बसलेत बोलत. कोण ग असतील ? चोर ?"

"चल ! चोर असते तर गप्पा मारीत कशाला बसले असते ? डल्ला मारून चालते झाले असते. पण... ऐक..."

गुलाबी सदऱ्यातला एक माणूस पारावर आंथरलेल्या घोंगडीवर रेललेला होता. त्याने हाताची कोपरे उशाला टेकली होती. दुसरा माणूस समोर एका अरुंद सतरंजीवर पहुडलेला होता. चांदण्यात याच्या कपाळावरचा पांढरा टिळा लुकलुकला. पहिल्या माणसाने दाढी वाढवलेली होती. दुसऱ्याच्या गालावर आत्ता खुंट असले तरी तो नेमाने दाढी करणारा असावा. मिशा मात्र दोघांनाही होत्या– दाभणकाठी म्हणतात तशा.

आणि त्यांचा संवाद चालू होता–

" समर्थ कधी टाळ कुटीत बसले नाहीत. आज इथे तर उद्या तिथे असा त्यांचा संचार चालत असे. नित्यनूतन हिंडावे, उदंड देशाटन करावे !"

" आणि खावे काय ? त्यासाठी नित्य झोळी पसरणे हेच की नाही ? आमचे तुकाराममहाराज सांगतात की, भिक्षापात्र अवलंबणे, जळो जिणे लाजिरवाणे– उलट रामदासस्वामी म्हणत– भिक्षेविशी लाजो नये !"

" थांबलास का ? पुढची ओळ बोल की ! भिक्षेविशी लाजो नये, बहुत भिक्षा घेऊ नये ! समर्थ लोकांकडे भिक्षा मागत, कारण लोकांचंच कार्य ते करीत होते ! भिक्षा हे ते निःस्पृहतेचं लक्षण मानीत. पोटभरूपणाचं नाही ! भिक्षेचा महिमा सांगावा तर तो समर्थांनीच."

" आणि भक्तीचा महिमा सांगावा तर तो तुकाराम महाराजांनी."

" भक्तीचा अन् भूतदयेचा. मी ते कुठे नाकारतो आहे ? माझं म्हणणं एवढंच की समर्थ झोळीवाले बनले ते देशासाठी. लोकांना त्यांनी अन्यायाविरुद्ध भांडायला लावलं. त्यांच्यांत जागृती आणली."

" आणि तुकोबांनी लोकांना गाई गाई करायला लावली असं का म्हणणं आहे तुझं ?"

" नाही, त्यांनीदेखील लोकांना जाग आणली. पण त्यांचा भर देवभक्तीवर होता. समर्थांचा देशभक्तीवर. अशी भर देणारा व्यवहारी माणूस संतांच्या मालिकेत दुसरा कुणी झाला नाही."

" तुक्या वाण्याची वाणी किती प्रेमळ अन् प्रासादिक ! जे का रंजले, गांजले त्यांसी म्हणे जो आपुले... दया करी जे पुत्रासी,

तेचि दासा आणि दासी । तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ! उलट रामदास स्वामींचं पाहा. ढेकूण काय, पाली काय, घुंगुरटी काय– स्वामी त्यांना सरस्वतीच्या घरातून फिरवताहेत ! तस्कर तडतडा ताडीती काय अन् भुते झडपोनि मारिती काय ? हुंब्यासि हुंबा लावावा म्हणे, आणि टोणप्यासी टोणपा आणावा ! – मला तर कित्ती दिवस हुंबा नि टोणपा यांचा अर्थच कळत नसे."

" दोन्हींचा अर्थ एकच– रडचा बिनडोक माणूस ! तुला कसा कळणार तो ? कारण तू–"

' किती रांगडी भाषा ही ! "

" रांगडी पण रोकडी ! सुंदर काव्यपंक्ती रचायला भटकबहाद्दर समर्थांना वेळ होता कुठे ? ते कधी मठपती होऊन बसले नाहीत एका ठायी ! आणि किशा, तसं म्हणशील तर तुमच्या तुकोबांनी काय कमी रांगडं लिहिलंय ? ' कुशब्दाची घाणी ' काय त्यांनी कमी उपसली आहे ? असेल दासबोध ओबडधोबड, पण समर्थांनी सकलांसी शहाणे करूनि सोडिले हे तर खरं ना ?"

" आणि तुकारामांनी काय वेडे केले ? ते स्वतः शहाणे होते म्हणून तर ' सावधान ' शब्द ऐकून पळाले नाहीत. संसारात राहिले."

" आणि जेहेत्ते त्यांनी त्याचं वाट्टोळं केलं ! उलट समर्थ स्वतः पळाले खरे. पण लोकांना त्यांनी बजावलं की प्रपंच करावा नेटका ! नेटका बरं ? फाटका नाही ! "

वाद इथपर्यंत रंगला आणि एकाएकी कुठूनतरी गोड आवाजात सूचना आली– " अति वाद करू नये ! "

हे इतक्या अचानक झाले की दोघेही वावदूक विदूषक बनून

इकडेतिकडे बघू लागले. एकाने तर आकाशवाणीच्या शंकेने वर-सुद्धा बघितले.

"अं हं ! मुंज्या नाही बोलला, मी बोलले." मोना पुढे होऊन म्हणाली. रामदासी बोवांना तिने सरळ सवाल केला– "तुम्ही बजाकाका ना हो ? बजरंग ब्रह्मे ना ?"

"आणि तुम्ही किशाबापू पंडित ?" विजूचा दुसऱ्या बुवांना प्रश्न.

दोघाही बुवांनी नुसत्या माना डोलावल्या. अजूनही त्यांचे आश्चर्य ओसरले नव्हते. कुठून टपकली ही पोरं ? स्वर्गातून तर नसतील ? देवबाळं तर नाहीत ही ?

मोनाच आता धीटपणाने बोलू लागली–

"तुमच्या रंगलेल्या वादावरून आम्ही तुम्हाला ओळखलं. कारण नुकतंच तुमच्याबद्दल बोलणं झालं होतं."

"हो का ? तशी आमची कीर्ती आहेच म्हणा ! पण तुम्ही कोण ?"

विजू-मोनांनी थोडक्यात आपली ओळख करून दिली. तेव्हा किशाबापू म्हणाले, "अस्सं ! म्हणजे बिपिनबरोबर आलात तुम्ही ?"

"तो पुस्तकातला किडा आलाय काय इथे वळवळत ?"

"आमच्या बिपिनबाबूला किडा म्हणू नका." मोना पारावर बसली होती, ती नाकापुढे बोट धरीत म्हणाली. "तो कसरी-सारखा पुस्तकाला चिकटत नाही. पुस्तक वाचतो अन् त्यातलं काही तरी करायला निघतो."

"पुस्तकातलं ज्ञान तो पुस्तकात बांधून ठेवीत नाही." विजू म्हणाला, "आम्हाला तो शहाणं करून सोडतो."

" छान छान ! मग खूपच शहाणा आहे बरं तुमचा बिपिन ! समर्थांनी म्हटलंच आहे– पुस्तक बांधोनि ठेवी बंदी– तो एक मूर्ख ! पूर्वीची पुस्तकं म्हणजे सुटया पानांच्या पोथ्या असत. रुमालात गुंडाळून वर नाडया किंवा बंद बांधीत."

" ऐकलंय आम्ही ते. पण– पण काय हो–" विजूला एकदम आठवले की हे काय आपण बडबडतो ? यांना आधी हे नको का विचारायला की काय हो तुम्ही आलात कधी ? आणि असे रात्रीच्या वेळी येऊन पिंपळावर का बसलात ? आम्हाला तर मुंज्येच वाटलात तुम्ही !

आणि लगेच आपल्या या शंका त्याने बोलून दाखवल्या आणि मोना आणखी म्हणाली, " मघाशी तर तुम्ही दोघे चक्क पिंपळाच्या फांदीवर बसला होतात, हो ना ?"

" हो." किशाबापू हसून म्हणाले, " हा बज्या म्हणाला, वरच्या फांद्या चांगल्या कॉटसारख्या आहेत, येतोस का ? म्हणून गेलो. थोडा वेळ पडलो होतो माडीवरची हवा खात. मी तर थेट गच्ची-पर्यंत चढलो."

" शेंड्यावर ?– बाप रे ! तिथे तर मुंज्ये राहतात म्हणे, तुम्हाला दिसले ते ?"

" मुंज्ये ? छट् ! उलट–"

" उलट काय ?"

" काही नाही– काही नाही !" किशाबापू गडबडीने म्हणाले, " उद्या कळेल काय ते, पण मग शेंड्यावर जरा अवघडल्यासारखं वाटलं म्हणून खाली आलो."

" अहो पण हे अवघडणं केलंत कशाला ?"

" हो ना. सरळ घरी यायचं सोडून या पारावर काय बसलात ?

अक्का गेल्यामुळे व्हिजिट आहे ना ही तुमची ? बिपिनबाबूही तिच्याच पत्रामुळे आलाय."

"तो तर मावशीला जास्तच जवळचा. सख्खा भाचा ना ? आम्ही मावस. पण रात्री-अपरात्री आल्यावर, म्हटलं, सर्वांना उठवण्याऐवजी इथे पारावरच पथारी पसरावी. उजाडल्यावर जावं मग घरी."

"आम्हाला सवय आहे."

"हं ! पण आता आम्ही आलोय तर चला ना ?" मोनाने टुमणे लावले.

"खरंच चला की !" विजू.

या मुलांनी खूप आग्रह केला; पण दोघेही नटखट अन् हट्टी. यांना हुंबे म्हणावं की टोणपे म्हणावं ? आपल्या निर्धारापासून ते अजिबात हटेनात. शेवटी त्यांचा निरोप घेऊन विजू-मोना बंगल्याकडे परतली. आता चंद्र मावळला असल्याने अंधार पडला होता. त्यामुळे त्यांना जपूनच चालावे लागले.

आणि परसातल्या दरवाज्यापाशी पोचतात तो उंबरठ्यावर उभा होता बिपिनबाबू.

किंचित आश्चर्याने मोनाची जिवणी फाकली, तर विजूने दातांनी खालचा ओठ दाबून आपले नवल गिळले. बिपिन काही बोलला नाही. दार लावून बिलकूल आवाज न करता तिघेही आपल्या खोलीत गेले. मग बिपिनच्या वटारलेल्या डोळ्यांना मोनाने आपण होऊन उत्तर दिले,

"जादूची नवलकहाणी जगतोय आम्ही." ती हळूच पुटपुटली. "ॲलिस इन् वंडरलॅन्ड !"

"दोन भुतं भेटली." विजू.

"ऑन दि पिंपळ. ट्विंकल ट्विंकल !" मोना.

आणि मग दोघांनी आत्ता अनुभवलेला प्रसंग आळीपाळीने वर्णन केला.

बिपिन हसला अन् म्हणाला, "ठीक आहे. त्या दोन्ही वल्ली उद्या इथे उगवतीलच. तोपर्यन्त आपलं झोपेचं एक सेशन होईल."

खिडकीतून गार वाऱ्याच्या झुळका येत होत्या. पांघरुणात गुरफटण्याइतकी थंडी आत होती. त्यामुळे डोळे मिटल्याबरोबर तिघेही झपाट्याने निद्रादेवीच्या राज्यात गेली.

मागोमाग किशाबापू माजघरात शिरले. तिथे बजरंगाने रिकाम्या खाटेपुढे दंडवत घातला. तोंडातून अति गंभीर वाणी निघत होती–

"मृत्यू न म्हणे हा धीर
मृत्यू न म्हणे हा उदार
मृत्यू न म्हणे हा सुंदर
चतुरंग जाणें ।।"

दरम्यान किशाबापूने डोळे मिटून "विठ्ठल– विठ्ठल !" करीत हात जोडले होते. त्या दोघांत आता वाद उरला नव्हता. मावशीच्या प्रेमाने संवाद साधला होता.

किशाबापू म्हणाला, "कसं बोललास बज्या. धीर– उदार– सुंदर ! मावशी यांतलं सर्व काही होती. ती धीराची तर होतीच, पण अंतःकरणाची उदार होती आणि वृद्धपणीसुद्धा ती सुंदर दिसे. वार्धक्याचं तेज म्हणजे काय ते तिच्याच मुखावर पाहावं."

"तू कधी बघितलं होतंस तिला ?"

"प्रत्यक्ष नाही. फोटोत. गेल्या दिवाळीत सहीनिशी फोटो धाडला होतान् शुभेच्छांसह. तुलाही धाडला असेल. पण तू भटक्या कधी जागेवर असशील तर ना ? पण बज्या ! त्या धीर, उदार नि सुंदर मावशीलाही शेवटी जावंच लागलं !"

"हं ! जायचं सर्वांनाच असतं. मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे । आवक चालू, तशीच जावकही चालू आहे."

"त्याशिवाय लोकसंख्येचा प्रॉब्लेम सुटणार कसा ?" हे बोलणे ऐकत असलेल्या अंकलनी हळूच प्रश्न केला.

आणि किशाबापू भावनावेगाने म्हणाला, "कलकत्ता झालं,

सिंदुर्णी झाली. आता मावशी आपल्या खऱ्या गावी गेली. तिचा राम राम ध्यायला आपण नव्हतो एवढंच बऱ्या, आपलं दुःख !"

सोमाने चहा आणला. नव्या पाहुण्यांसाठी दुधाचे कप आले, तेव्हा किशाबापू म्हणाला, "माझ्यासाठी दूध ? चालेल म्हणा. पण नंतर चहा हवा."

दुधाचे आणखी दोन प्याले आले होते– नुकत्याच तोंडे धुऊन आलेल्या विजू-मोनांसाठी. त्यांचे हर्षभराने स्वागत करीत किशाबापू म्हणतात, "बिपिन, हे तुझे बालमित्र मोठे धाडसी आहेत, बरं का ? भुताबिताला डरत नाहीत."

बाबासाहेबांनी चिरूटाची पेटी जवळ ओढली होती. ते एकदम म्हणाले, "ही काय भानगड आहे ? किशा, तू कसा ओळखतोस या पोरांना ? आणि बिपिन 'चाहूल लागली' म्हणाला त्याचा काय अर्थ ?– काय रे गोसाव्यांनो, तुमचं काय जे वाहन असेल ते आत्ताच आलं ना पहाटे पहाटे ?"

"नाही काही. ते रात्रभर पिंपळाच्या झाडावर बसले होते." मोना हसत म्हणाली.

"बिपिनला चाहूल आमची लागली, बाबासाहेब !" विजूने सांगितले. "आणि आम्हाला चाहूल आधीच लागली होती या दोघांची !"

आणि मग दोघांनी जेव्हा रात्रीच्या भेटीचे मजेदार वर्णन केले तेव्हा सर्वांनाच मोठी गंमत वाटली.

"वा ! म्हणजे मोठाच लाभ झाला की तुम्हाला पोरांनो !" बाबासाहेब म्हणाले, "ऐन मध्यरात्री संतांचं दर्शन घडलं !"

"लाभ आम्हाला जास्ती झाला मामा !" बजरंगाकडे अर्थपूर्ण नजरेने पाहात किशाबापू म्हणाला, "मला जास्त."

सर्वजण कुतूहलाने त्याच्याकडे पाहू लागले. पैरणीच्या खिशातून पाच कागद काढून त्याने मंडळींपुढे ठेवले. प्रत्येक कागद म्हणजे शंभराची नोट होती. प्रत्येक नोटेला एक बारीक छिद्र होते.

"क्या बात है ?" अंकल देखील आता चकित झाले होते.

"या भोकात दोरा घालून नोटा पिंपळपानांना शिवलेल्या होत्या." किशाबापू म्हणाला, "झाडावर अशा एकूण सहा नोटा मिळाल्या मला."

"आणि मला चार." बजरंगाने सांगितले. "आळशावर गंगा. मी खालच्या बर्थवर पहुडलो होतो. बज्या नोटा वेचीत होता तेव्हा एक डहाळी खाली आली. मी पडल्या पडल्या चार नोटा खुडल्या."

"म्हणजे मला सहाशे अन् याला चारशे मिळाले. भुतांच्या या झाडावर चढायला कुणी धजत नव्हता. भूत नावरे कोणासी । अक्काने खिळिले त्यासी ।। प्रत्येक नोटेच्या कडेला अक्षरे आहेत ती अशी– ज्याचे धजले मन । त्याचे झाले हे धन ! ..."

"हाही नोटांचा विनोद चंद्रीचाच ना ?" बाबासाहेब म्हणाले.

"अर्थात, दुसरं कोण करणार हे ?" अंकल म्हणाले आणि बज्या-किशा कंपनीसाठी त्यांनी खुलासा केला : "असे अनेक विनोद करूनच अक्कांनी वारसदारांना खैरात केली आहे."

"अर्थात हा नोटा टाचण्याचा उद्योग अक्कासाहेबांच्या वतीने मी केला." तात्या म्हणाले. "अक्का थोडचाच चढणार होत्या झाडावर ?"

"तुम्ही पिंपळावर चढलात, तात्या ?" विजूने आश्चर्याने प्रश्न केला. "तुम्हाला भुताने झपाटलं नाही ?"

"झपाटलं असेल !" बिपिन पुटपुटला. "म्हणूनच चढले. अशी

कामं झपाटल्यावाचून थोडीच होतात !"

"नाही–" पाठीकडे हात नेत तात्या म्हणाले, "झपाटलं नाही· पण हापटलं. उतरताना पारावर पडलो अन् पाठ शेकली– आता बरी आहे म्हणा."

"कमाल केलीन् त्या बयेने." शकूताई आ वासून म्हणाल्या आणि मग त्यांनी तात्यांवर डोळे तांबारले. "आणि कारभारी बोवा, तुम्ही पण ! झाडावर का कधी नोटा टांगतात ? वाऱ्याने उडाल्या असत्या म्हणजे ?"

"उडाल्याच असणार." तात्या म्हणाले, "कारण एकूण नोटा वीस होत्या. आणि चार दिवसांपूर्वी एक लहानसं वादळ झालं होतं. तुम्हाला एवढ्याच मिळाल्या ना किशाबापू ?"

"होय. मी फांदीन् फांदी धुंडाळली ! हा किशाच मला पुन्हा पुन्हा सांगत असतो, सूकराची विष्ठा काही नेहमीच त्याज्य नसते. संसाराच्या मळ्याला ती खत पुरवते !– पण खूप शोधूनही मला आणखी नोटा मिळाल्या नाहीत."

"आता मिळालेल्या धनाचा उत्तम वेव्हारे वेच कर म्हणजे झालं !" बजरंगाने भावाला बजावले. "नाही तर एखाद्या चोराची भरती करशील. माझे चारशे जाणार भ्रनकमंडळाच्या पेटीत."

सर्वांच्या आंघोळी झाल्या. तात्यांनी पूजा केली आणि मग पुन्हा दिवाणखान्यात बैठक बसली.

अध्यक्षस्थानी आता अंकल होते– एक्झिक्यूटर !

"किशाबापू !" त्यांच्या डोळ्यांपुढे एक पाकीट नाचवीत अंकल म्हणाले, "हे पाकीट अक्कांनी तुमच्यासाठी मागे ठेवलं आहे. पिंपळावरचा मुंज्याही तुमच्यावर प्रसन्न व्हावा हा केवळ

एक योगायोग होता–"

"हो ना !" विजू मोनाच्या कानाशी कुजबुजला. "खरं म्हणजे आम्ही चढणार होतो त्या झाडावर !"

"–पण त्यामुळे या पाकिटावरचा तुमचा हक्क नाहीसा होत नाही." अंकल किशाबापूंना सांगत होते.

"द्या इकडे."

"अं हं ! इतकं सोपं नाही ते. पाकीट तुमचं असलं तरी ते उघडण्याचा हक्क अक्कांनी मला बहाल केला आहे."

सर्वांच्या उत्सुक नजरा त्यांच्याकडे लागलेल्या असतानाच अंकलनी पाकिटांची एक कड कात्रीने कापली. आतून नोटांचे एक बंडल निघाले आणि एक कागद."

"कोरा की काय ?" मोना उद्‌गारली.

नाही, कागद कोरा नव्हता. त्यावर काही मजकूर लिहिलेला होता. अंकलनी तो वाचला–

"किशा, तू तुकारामभक्त आहेस. मी तुला एक सोपे कोडे घालते त्याचे उत्तर दे. निर्णय अंकल करतील. उत्तर देण्यासाठी एकूण वेळ पंधरा मिनिटं फक्त."

"वाचा प्रश्न."

"थांबा जरा. आता आधी हे दुसरं पाकीट फोडतो. हे समर्थ चरणदासानुदास बजरंग ब्रह्मे यांच्यासाठी."

"म्हणजे अर्थात भ्रनक मंडळासाठी." बजरंग म्हणाला, "मला स्वतःला म्हणाल तर नको रे मना द्रव्य ते मागिलांचे !–समर्थ, मला क्षमा करा !"

"हे क्षमा मागणं कशासाठी ?" मोनाने बिपिनला हळूच विचारले. आणि बिपिननेही तिला हळूच उत्तर दिले, "कारण

मनाच्या श्लोकांत 'पूढिलांचे' आहे, त्याचं यांनी मागिलांचे केलं. दासबोधात हा गुन्हा मूर्खांच्या व्याख्येत जमा आहे असं त्यांना वाटलं असणार– 'अक्षरें गाळूनि वाची। काही घाली पदरींची ॥'

"तुमच्यासाठीही असंच एक कोडं आहे, बजाबा." अंकल सांगत होते. "आणि तुम्हीही पंधरा मिनिटांत पेपर द्यायचा आहे. आता मी दोघांचेही प्रश्न वाचतो. ते वाचून आपण दोघांनी वेगवेगळ्या खोल्यांमध्ये जावं. घंटी वाजली की परत हॉलमध्ये यावं."

कात्री घेऊन त्यांनी दोन्ही पाकिटे कापली. मग बजरंगाचा 'पेपर' त्यांनी आधी वाचला. त्यातला मजकूर असा होता–

"१) खाली एक कविता उद्धृत केली आहे. तिच्यातले काही शब्द ओळखीचे वाटतील. काही विचित्र वाटतील. ती समर्थांची एक अतिप्रसिद्ध कविता आहे. फक्त कोणातरी पढतमूर्खाने अक्षरांची फिरवाफिरव करून हे दुर्बोध नवकाव्य तयार केले आहे. मूळ कविता काय आहे ते तू ओळखायचेस.

काका मामा दादा वा !
आपण सर्व चिडा रडा
वंगपेरणी घूस गयो
नंगू झाको तुझे नयना
अघतावादे तुझा हेता
उणे हता क्षू !"

ही प्रश्नपत्रिका अंकलनी बजरंगाच्या हातात दिली– तिची कार्बन कॉपी स्वत:जवळ ठेवून. मग त्यांनी किशाबापूचे ते पाकीट फोडले. त्यात पहिला प्रश्न असा होता–

"१) खाली एक कविता दिली आहे. तीन अक्षरांचा गोल-

माल झाला आहे. नाहीतर ही तुकाराम महाराजांची एक प्रसिद्ध कविता आहे हे कुणीही सांगू शकला असता.

ऐशा मुंज्याचे अंगा
हाण वेगी व्हाण र
राया मासा काप दे रे हा
न हुवा चाखल त त्न
वतन मोठे न कुल ठीक म्हणेनात
याचा दे ना थो
तरवाराहाणतु अंगी
लपया जाण र

याही प्रश्नपत्रिकेची नक्कल स्वतःजवळ ठेवून त्यांनी मूळ कागद किशाबापूंच्या हाती दिला. किशाबापू कागद वाचीत वाचीत अक्कांनी पावन केलेल्या माजघरात गेला आणि बजरंगाची स्वारी स्वतःशी चडफड करीत आरशाच्या खोलीत शिरली. या वेळी त्याने केलेली त्रासिक गर्जना ऐकून मात्र सर्वांनाच हसू कोसळले.

बजरंग म्हणत होता, "समर्थांचिया सेवका वक्र पाहशी ! अशी एक भूमंडळी तूच मावशी !"



७ संतकृपा झाली..आता शकूताईचे काय?

बजरंग ब्रह्मे आणि किशाबापू पंडित दोघे आपापला पेपर घेऊन दोन वेगवेगळ्या खोल्यांत जाताक्षणी अंकल गडबडीने उठले. त्यांना कसली तरी आठवण झाली होती.

भितीलगतचे काचेचे कपाट उघडून त्यांनी काही जाडजूड ग्रंथांवरून बोटे फिरवली. मग एक लहानसे डायरीवजा पुस्तकही त्यांनी पुढे ओढून पाहिले.

"हा– ठीक आहे. इथेच आहेत तिन्ही ग्रंथ." ते उद्‌गारले.

विपिन त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागला, तेव्हा ते म्हणाले, "तुकारामाची गाथा, दासबोध आणि मनाचे श्लोक. नाही तर म्हटलं, कुणीतरी वाचायला घेऊन तिकडच्या खोल्यांतून टाकली आहेत की काय ?"

"हं– त्यांतल्या कविता असणार, नाही का त्या ?" बाबासाहेबांच्या कपाळावर आठ्या चढल्या होत्या.

"बजाकाका नि किशाबापू दोघेही सात्विक, सत्यप्रिय तरुण आहेत, अंकल." तात्या म्हणाले, "पुस्तक हाताशी असतं तरी त्यात चोरून पाहण्याचा गुन्हा त्यांनी केला नसता."

"ते बरोबर आहे," अंकल एक डोळा मिचकावीत म्हणतात, "पण परीक्षक या नात्याने मला काळजी घ्यायला हवीच."

प्रत्येकाच्या हातात अंकलनी त्या कागदांच्या नकला दिलेल्या होत्या आणि प्रत्येकाचे डोळे कागदावरच्या त्या विक्षिप्त कविताकडे लागलेले होते–

काका मामा दादा
वा ! आपण सर्व चिडा रडा
वंगपेरणी घूस गयो
नंगू झाको तुझे नयना
अघतावादे तूझा हेता
उणे हता क्षू !

आणि–

ऐशा मुंज्याचे अंगा हाण वेगी व्हाण र
राया मासा काप देरे हा न हुवा चाखलतत्न
वतन मोठे न कुल ठीक म्हणेनात याचा देनाथो
तरवाराहाणतु अंगी लपया जा र

"मूळ कवितेची ही मिसळ म्हणायची की चिवडा ?" बाबासाहेब हेटाळणीने म्हणाले, "मारुतराव, मीसुद्धा दासबोध अन् गाथा नेहमी वाचतो, पण हे पाहून माझ्या डोक्यात प्रकाशाची तिरीपही शिरत नाहीये ! काका काय, मामा काय, अन् दादा काय ? आणि सारे मिळून म्हणे चिडा नि रडा !"

"आणि म्हणे पंधरा मिनिटांत सोडवा !" शकूताईनी त्यांचीच री ओढली. "मेलीला कोडं घालायला काय जातं ? सोडवणं किती कठीण आहे !"

"तुम्ही म्हणता ते खरं आहे, शकूताई." तात्या म्हणाले, "एखाद्या वस्तूचे तुकडे क्षणार्धात करता येतात. ते परत जुळवायला किती वेळ लागतो !"

"नुसत्या फेव्हिकॉलने भागत नाही. डोकंही लागतं थोडंफार."

"लागतं म्हणजे काय– दुखायलाच लागतं म्हणा ना ! जिगसॉ पझलसारखी डोकेदुखी ही. तिथे चित्राचे तुकडे असतात, इथे शब्दाचे." शकूताई म्हणाल्या. "मनाचे श्लोक काय, आमचेही पाठ होते लहानपणी. भेंडयांत भलते उपयोगी पडत. म आणि न सारखी नेहमी येणारी अक्षरं. म आला की 'मना सज्जना' आणि न आला की 'नको रे मना' सुरू झालंच. मनाच्या श्लोकांनी भेंड्या रंगायच्या."

"चटकन शिजणारी भेंडयाची भाजी." बाबासाहेब म्हणाले, "अर्थात वजरंगाला ही उपमा आवडायची नाही म्हणा."

"कुणालाच आवडायची नाही." शकूताईंनी डोळे वटारले. "असं पाहा बाबल्या–"

"काय ग सखू ?" बाबासाहेबांच्या धुरातून गमतीने उद्‌गार

निघाला.

"माफ करा, बाबासाहेब," शकूताई भलत्याच गोऱ्यामोऱ्या होत म्हणाल्या, "ती जुनी नावं पटकन तोंडात येतात बघा."

"येऊ देत हो !"

"मनाचे श्लोक म्हणजे झणझणीत लोणचं आहे, बाबासाहेब." शकूताई खूष होत म्हणाल्या. "शेकडो वर्षं मराठी माणसाच्या जिभेला झोंबलेलं. त्याला भेंडयाची भाजी म्हणणं म्हणजे त्याच्या प्रखरपणाचा अपमान आहे."

"मग त्याबद्दल मी क्षमा मागतो, शकूताई." बाबासाहेब चिरुटाच्या टोकावर टिचकी मारीत म्हणाले, "पण अवघी पंधरा मिनिटं देणं निष्ठुरपणाचं आहे असं तुमच्याप्रमाणेच मलाही वाटतं–"

"मुळीच नाही." अंकल मध्येच म्हणाले, "मनाचे श्लोक ज्यांच्या नित्य पठणात आहेत त्यांना हा वेळ पुरेसा आहे. पण थांबा, तुमचा काही तरी गैरसमज झालाय. तुमच्या मनात मनाचे श्लोकच का सारखे घोळताहेत ? या ओळी दासबोधातल्या कशावरून नसतील ?"

"बाप रे ! तसं असेल तर कंबक्तीच आहे !"

"बजरंगाची नाही. त्याला ते कठीण जाऊ नये." अंकलनी सांगितले. "एक लक्षात ठेवा. समर्थांची अतिप्रसिद्ध कविता आहे म्हणे ही– सर्वांच्या तोंडी बसलेली."

"तरी पण–" बाबासाहेब अन् शकूताई दोघेही आता विचारमग्न बनली.

"मंडळी, तुम्ही या परीक्षेचे उमेदवार नाही आहात." अंकल डोळे मिचकावीत म्हणाले. "तुम्ही इथले ग्रंथ चाळू शकता."

वडील मंडळींचा हा निष्फळ संवाद चालू असता, तिकडे दुर्लक्ष करून बिपिनने आपले स्वतंत्र कोंडाळे केले होते आणि तो खरोखरीच दासबोध चाळण्यात गुंतला होता. पण या खटाटोपात काही अर्थ नाही असे वाटून तो ग्रंथ त्याने पुन्हा कपाटात ठेवला.

मोनाने त्याच्याकडे पाहात विचारले, "काही सापडलं नाही का रे बिपिनबाबू ?"

"नाही बुवा ! पण मोना, मला असं वाटतंय की या ओळी दासबोधातल्या नसून हा मनाचा श्लोकच असावा."

"कशावरून ?"

"कारण यात एकूण अठ्ठेचाळीस अक्षरं आहेत. मनाच्या श्लोकात प्रत्येक ओळ बाराक्षरी असते. बारा चोक अठ्ठेचाळीस, दुसरं असं की, थोड्या वेळात उत्तर सुचावं म्हणून आत्याने सोप्यात सोपी कविता दिलेली असेल. आणि सोप्यात सोपे म्हणजे मनाचे श्लोक."

"ते खरं रे, पण आत्याने सोप्याचं कठीण करून टाकलंय ना ? ही 'वंगपेरणी' कसली केलीय तिने या शेतात ?"

"आणि हा 'नंगू' कोण ? 'घूस गयो' काय ?"

"तीच तर गंमत आहे ! इकडची अक्षरं तिकडं करून नवे काहीतरी विचित्र शब्द बनवले आहेत." बिपिन म्हणाला, "आपण तिकडची अक्षरं इकडे करून पुन्हा मूळ शब्द तयार करायचे."

"महाकठीण कर्म आहे ते !"

"अर्थात ! आणि तेच तर आपल्याला आव्हान आहे. तसं म्हटलं तर, सगळे नाहीत तरी बरेचसे मनाचे श्लोक पुष्कळ मुलांचे पाठ असतात."

"माझेसुद्धा पाठ आहेत." विजू म्हणाला, "सदा सर्वदा योग

तुझा घडावा–"

बिपिनने त्याच्याकडे डोळे फाडून पाहिले. "विज्या–विज्या!"

"काय रे बिपिनबाबू ?"

"यू हॅव्ह हिट इट ! मला वाटतं, तोच श्लोक असणार हा. मी आत्ताच स्वतःशी म्हणत होतो की, ही कविता जर मनाचा श्लोक असेल तर यातलं विशेष अक्षर कोणतं आहे ते आधी बघावं. आणि मला एकदम तडकलं की क्षू हे अक्षर तसं अनयूझुअल आहे. क्वचितच वापरलं जाणारं. क्षू कोणत्या शब्दात येईल ? रक्षू– भक्षू–"

"उपेक्षू !" मोना म्हणाली.

"करेक्ट ! उपेक्षू नको गुणवंता अनंता !– ही सर्वच्या सर्व अक्षरं आत्याच्या या खिचडीत सापडतात. पण ही ओळ मनाच्या श्लोकात शेवटी येते असं मला वाटलं. तो कोणत्या श्लोकाचा शेवट आहे ते मात्र मला काही केल्या आठवत नव्हतं. तेवढ्यात विजू, तू आपली घोषणा केलीस ! सदा सर्वदा–"

"बाकीची अक्षरं पाहू सावकाशीने, ती असणारच यात. हाच तो श्लोक आहे यात शंका नाही."

विजू-मोना धावत अंकलकडे गेली आणि त्यांच्या दोन कानांना लागली.

"आम्ही ओळखलं, अंकल !"

"आमच्या बिपिनबाबूचा सदा सर्वदा विजय असो !"

अंकलनी दोघांच्याही पाठी थोपटल्या. त्यांच्या डोळ्यांत सूक्ष्म स्मित झळकत होते.

"ऐकला मी तुमचा संवाद." ते म्हणाले, "उत्तर बरोबर आहे. पण– पण अजून तुकाराम महाराज राहिलेत की ! अर्थात

तुमच्यावर जबाबदारी कोणतीच नाही. तुम्ही काही परीक्षार्थी नाही."

"म्हणून काय झालं ?" मोना कागदाकडे पाहात म्हणाली, "पण अंकल, ही दुसरी कविता फारच गोंधळाची आहे. थोडा तरी क्लू द्या ना ! हे 'मासा काप दे रे' काय ? आणि 'न हुवा चाखल' काय ?"

"नॉनव्हेज वाटतं ! पण आत्याने कधी माशाचे काप चाखले नव्हते. का हो अंकल ?"

"होते तर काय झालं ! पक्क्या बंगाली बनल्या होत्या त्या. पण–" त्यांनी एक डोळा बारीक केला, "त्याचा कवितेशी काही संबंध नाही !"

"आणि मुंज्याचे अंगा वहाण हाणायला काय सांगते ही ? पिंपळावरच्या मुंज्याला तिथून हुसकून इथे वसवलं काय तिनं ?" विजूचा कुतर्क.

"म्हणून म्हणते, आम्हाला एखादा 'क्लू' द्या– सूचक विधान !"

"ते बिपिनला विचारा– काय रे बिपिन, तुझ्याच पद्धतीप्रमाणे, 'थो', आणि 'त्न', ही अक्षरं तुला अन्यूइयुअल नाही वाटली ? पण नाही ! अक्कांनी दिलं त्याहून जास्त काही मी देणार नाही. दिलं तेवढं घ्या ! तुज दिले आता करी यत्न याचा । जीव भाव वाचा–काया–मन । ' असं दासबोध सांगतो."

"'थो' आणि 'त्न', ? 'थोडाही गुण मिळता घ्यावा ?' की 'यत्न तो देव जाणावा ?', पण नाही. ती दुसरी ओळ रामदासांची आहे. तुकारामांची नाही !"

बिपिनने कायावाचामने खूप खटपट केली, पण त्याला उत्तर

सुचेना.

आणि तेवढ्यात– टिर्रर्र–टिण्ण– घंटा झाली.

पंधरा मिनिटे संपल्याचा अंकलनी इशारा दिला होता.

दुसऱ्याच क्षणी दोन्ही खोल्यांची दारे उघडली आणि दोन्ही परीक्षार्थी बाहेर आले. सर्वांच्या आतुर नजरा त्यांच्याकडे लागल्या.

" उत्तरं तयार ?" अंकलनी डोळा मारला. एकदा याला, मग त्याला.

" माझं तयार आहे–" भ्रनक मंडळाच्या अध्यक्षांनी घोषणा केली आणि आपल्या नेहमीच्या खड्या सुरात हॉल दणाणून सोडला.

" सदा सर्वदा योग तूझा घडावा
तुझे कारणी देह माझा पड़ावा
उपेक्षू नको गूणवंता अनंता
रघूनायका, मागणे हेचि आता."

आणि मग टाळ्यांच्या कडकडाटात 'जयजय रघुवीर समर्थ'चा घोष झाला. बिपिनने हे कोडे आधीच सोडवले होते, त्यामुळे त्याला आश्चर्य वाटले नाही. विजूमोनांना मात्र गुदगुल्या झाल्या आणि त्यांनी अभिमानाने आपल्या 'बाबू'कडे पाहिले.

" माझंही उत्तर तयार आहे." किशाबापूने जाहीर केले. तो म्हणाला, " बिपिननेही डोकं चालवलं म्हणे ?" मी आत्ताच ऐकलं. त्याची बुद्धी मला नाही. त्यामुळे तुकाराम महाराजांचे प्रसिद्ध अभंग तोंडावर असूनही कितीतरी वेळ मला काही सुचेना. मग एकदम– माझ्या कानात घूस गयो तो 'चाखल' शब्द !"

" तुम्ही तो कानांनी चाखलात ?" मोना.

" अगदी बरोबर, 'चाखल'वरून मला साखर आठवली, कारण बोबडेपणी मी साखरेला 'चाखल' म्हणायचो. मग साखरे-

वरून आठवला 'मुंगीसाखरेचा रवा !' तेव्हा माझं उत्तर आहे–

लहानपण दे गा देवा
मुंगी साखरेचा रवा
ऐरावत रत्न थोर
तया अंकुशाचा मार.
ज्याचे अंगी मोठेपण
तया यातना कठीण
तुका म्हणे जाण
व्हावे लहानाहून लहान !"

"बरोबर !" असे अंकलनी जाहीर करताच पुन्हा एकदा टाळचा झडल्या– तुकोबारायांना आवडणाऱ्या टाळ्या.

"मला तो भेंड्याचा काळ आठवतो–" शकूताई म्हणाल्या, "आमच्या लहानपणी आम्ही 'तुका म्हणे बरवे जाण' म्हणत असू. इथे त्या बरवेला डिच्चू दिलाय."

"नाही." किशाबापू म्हणाला, "हेच बरोबर आहे. मूळ गाथेत असंच आहे. पुढे पेशवाईत कुणा बरव्याने आपलं आडनावच घुसडलं असावं !"

"हं !" अंकल हसत हसत म्हणाले, "बिपिन, तू त्या दुर्बोध अन् विचित्र शब्दात गुरफटलास आणि एकच निष्कर्ष सगळीकडे लावायला गेलास हे तुझं चुकलं. अक्कांनी दुसरा एक फार साधा 'क्लू' या कवितेत ठेवला होता– साडेचार हजार अभंगांचा किशाबापूचा हँडीकॅप लक्षात घेऊन. पण तो तुलाही कळला नाही अन् त्यांनाही कळला नाही."

"कोणता बुवा तो क्लू ?"

"नीट बघा. प्रत्येक ओळीतलं पहिलं अक्षर घेतलंत की कोणता

शब्द होतो ?"

"ऐ–रा–व–त" विजूने वाचले.

"आणि शेवटची चार अक्षरं ?"

"र–त्न–थो–र–" मोना म्हणाली, "अय्या ! यातलाच एक चरण !"

"मग ? याहून आणखी काय पाहिजे ?"

"कमाल आहे ! माझ्या नाही हे लक्षात आलं !" किशाबापू.

"माझ्या पण हे आलं नाही विशेष !" बिपिन म्हणाला. "असली पहिल्या अक्षरांची कोडी आम्ही किती तरी वाचलेली आहेत. हो की नाही ग मोना ?"

"हो ना ! रामदासस्वामींनीच नाही का शिवाजीमहाराजांना कवितेत संदेश धाडला होता–"

"विजापूरचा सरदार निघाला आहे." विजू उद्‌गारला, "प्रत्येक ओळीतील पहिलं अक्षर." हे बोलणे थांबवून अंकल एकाएकी उठून उभे राहिले आणि म्हणाले, "बजाकाका नि किशाबापू पास झाले. त्यांची नोटांची पुडकी तयार आहेत."

पुनश्च टाळ्यांचा गजर झाला. सर्वांना गप्प बसवीत अंकल म्हणाले, "आपली सकाळची बैठक येथे संपते. पण तिचा समारोप करण्यापूर्वी मला दुपारच्या 'सेशन'ची घोषणा करायची आहे, ती शकुंतलाबाईच्या संदर्भात आहे."

"माझ्या ?" शकूताई खुर्चीसकट उठून म्हणाल्या. मग त्यांनी खुर्ची उडवीत अन् चष्मा सावरीत विचारले, "मलाही ठेवलं आहेन् की काय तिने डबोलं ?"

"अर्थात ! डबोल नसलं तरी एक लहानसा डबा म्हणा.

तुमच्यासारख्या प्रिय सखीला अक्का कशा विसरतील ? पण तुम्हाला त्यांनी जी अट घातली आहे ती अशी साहित्यिक स्वरूपाची नाही."

"मला कळतंय काय साहित्यातलं डोंबल ?"

"तुम्हाला ज्या साहित्यातलं कळतं त्यातलीच एक कामगिरी तुम्हाला करायची आहे. तीं कितीही नाक मुरडण्यासारखी असली तरी तुम्हाला नाक मुठीत धरून ती करावीच लागेल."

"बया– बया– बया !"

डोळे वटारल्या स्थितीत शकूताईंनी आपले बूड खुर्चीत आपटले.

"हॅव्ह करेज, शकूताई !" बाबासाहेब त्यांच्याकडे चिरूट करीत म्हणाले, "शांत व्हा."

पण शकूताईंचे डोळे इतके व्यग्र नि उग्र दिसत होते की विपिनला वाटले– ही बया मनातल्या मनात आपल्या दिवंगत मैत्रिणीला स्वर्गातून खेचीत आणत असावी– तिच्या झिंज्या धरून.

८ थोडी मासेमारी

चंद्रूअक्काने आपल्या प्रिय सखीपुढे टाकलेला पेच मोठा विलक्षण होता. अंकलनी तो वाचून दाखवला तेव्हा शकुताई सोडून बाकी सर्वजण क्षणभर स्तंभित होऊन ऐकत राहिले आणि मग खो खो हसत सुटले.

अक्कांनी आपली 'इच्छा' नमूद केली होती ती अशी–

"शकू, माझ्या नात्यातल्या माणसांपेक्षा मी तुला जास्त ओळखते. तुझ्या आवडीनिवडी मला चांगल्या माहीत आहेत. मी तुला जी शर्त घालणार आहे ती तुझ्या मनाला कदाचित रुचणार नाही. ही

वया निष्कारण माझा सूड उगवते आहे– भेंड्यांत हरत असे त्याचा– असं तुला वाटेल, पण तसं काही नाही. सूडाबिडाचं माझ्या मनातही नाही. केवळ एक गंमत. मी देत असलेल्या पैशासाठी हे कर असंही मी म्हणत नाही. मैत्रिणीच्या प्रेमासाठी कर! तुझ्याकरता मी पाण्यात जीवसुद्धा देईन असं तू म्हणायचीस, आठवतं ? मी तुला पाण्यात जीव द्यायला सांगत नाही. पाण्यातला जीव वापरायला सांगते आहे. ऐक माझा पण. तू पक्की शाकाहारी असलीस तरी सोवळं ओवळं पाळणारी नाहीस. भावुक आहेस, पण माझी शर्त पाळताना तुझी तत्त्वं आड येणार नाहीत, अशी माझी खात्री आहे. तू असं करायचंस– आमच्या सिंदुर्णी गावात मिळणारा खास मासा तू तळावास अन् जमलेल्या पाहुण्यांना खायला घालावास. तू खावास अशी सक्ती नाही आणि तू केलेला पदार्थ, तेव्हा त्यांनीदेखील खावा अशी सक्ती नाही. पण तोंडं वेडीवाकडी करीत का होईना, मंडळींनी खाल्ला तर माझ्या आत्म्याला बरं वाटेल ! आजकाल सगळी बामणंसुद्धा 'अभक्ष्य' खातात ! तुला तळण्याची रीत माहीत नसेल तर एक जुनं पुस्तक इथल्या घरी आहे, ते चाळून बघ. मला वाटतं, लक्ष्मीबाई धुरंधरांचं 'हजार पाकक्रिया' असणार."

"अं ?" शकूताई तोंड वेंगाडत किंचाळल्या. "शी– शी– शी ! मला मासे तळायला सांगतेय ही कैदाशीण ! मासा दूर कोळणीच्या पाटीत असला तरी नाक धरून मागे फिरणारी बाई मी आणि मी मासा तळू ? कालत्रयी होणार नाही हे ! असल्या अटी घालणारी चंद्री समजते कोण स्वतःला ?"

आणि मग कितीतरी वेळ त्या गप्प होत्या. त्यांच्या मनाची भयंकर उलघाल होत होती हे त्यांच्या चेहऱ्याची अवस्था पाहून

कुणालाही कळले असते. त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता. नाक फुलले होते अन् त्याची बोंडी थुरथुरत होती. डोळ्यांत दोन इवलेसे अश्रू उभे राहिले होते.

ते अश्रू क्रोधाचे होते की एक प्रकारच्या दुःखाचे ? मैत्रिणीची शेवटली इच्छा आपण पाळू शकत नाही या व्यथेचे ?

सर्व मंडळी आपले हसू आवरून आता त्यांच्याकडे उत्सुकतेने पाहात होती आणि तेवढ्यात शकूताई एका घोर निर्णयाप्रत येऊन पोचल्या. त्यांनी पदर घट्ट बांधला अन् दबलेल्या ओठांमधून घोषणा केली, "करीन मी हे ! चंद्रिटलीचा आत्मा तेवढ्यासाठी तळमळतोय ना ? त्यासाठी करीन. बोला, कुठे आहे तो मासा ?"

शकूताईंची ती भीष्मप्रतिज्ञा ऐकून श्रोत्यांमध्ये टाळ्यांचा गजर झाला. बाबासाहेब मंद स्मित करीत म्हणाले, "शकूताई, चंद्रीने तुमच्यासाठी देवमासा धरून ठेवलेला नाही, जो हॉलमध्ये बसल्या बसल्या दिसेल. तो मुद्दाम तालुक्याच्या बाजारातनं आणायला हवा."

"बाजार शनिवारी भरतो. अजून तीन दिवस आहेत." तात्या.

"मग मसणात गेली हिची इच्छा ! मासाच नसेल तर तो तळणार कसा ? तिला तर हवाय इथला मासा ! मुंबईची मच्छी इम्पोर्ट करून चालणार नाही."

"आणि इम्पोर्ट करूनही ती येईस्तो शनवार उगवेलच की." बाबासाहेबांनी फुसकुली सोडली.

"नाही, मला उद्या जायला हवं."

"तुमचं हे अभक्ष्य भक्षण आपल्याला काही पसंत नाही !" बजरंग आपल्याच नादात म्हणाला. "पण मला वाटतं, इथल्या नदीत चिकार मासे असावेत. मला पोहताना सारखं हुळहुळत

होतं. तुला रे किशा ?"

"मी हुळहुळण्यावर सुटलो नाही. मला तर डसला एक ! क्षणभर मला वाटलं की मगरबिगर खातेय की काय आपल्याला ? गजेंद्रमोक्षाचा धावा म्हणायला मी सुरुवातही केली."

"इथल्या नदीत मासे आहेत हे अगदी खरं आहे." तात्यांनी सांगितले. "चांगले फूटभर लांबीचे मासे आहेत, पण मच्छीमारी करायला आज कुणी आलं असेलसं वाटत नाही. इथल्या कोळी लोकांचे काही ठराविक वार आहेत."

"कोळी कशाला हवेत ? शकूमावशी, मी देतो की धरून तुम्हाला एखादा मासा ?" बिपिन म्हणाला. "काय रे पोरांनो, येणार का शिकारीला ?"

विजू–मोना ताडकन उड्या मारीत उठली, हे काय सांगायला पाहिजे ? त्यांचा तो उत्साह पाहून तात्या म्हणाले, "तुमची तयारी असेल तर अक्कासाहेबांनी तुमच्यासाठी तयारी करून ठेवली आहे. या आत."

बिपिनला तात्या माजघरात घेऊन गेले. तिथले फडताळ उघडून त्यांनी मासे धरण्याचा एक उत्तम गळ, जाळे वगैरे साहित्य काढले आणि ते म्हणाले, "घ्या हे. परसात केळीच्या आळ्यात जरा खोदलंत तर तुम्हाला गांडुळं मिळतील. बारा महिने तेरा काळ तिथे गांडुळं असतात."

"गांडुळं ?" विजू आश्चर्याने म्हणाला, "आत्याला मासा हवाय की गांडुळं ?"

"अरे, एवढं कसं कळत नाही तुला ?" मोना म्हणाली. "माशाला काहीतरी आमिष दाखवायचं असतं, तर तो गळाला लागतो. आणि गांडुळं म्हणजे तर–"

"कळलं ! त्यांचा आवडता खाऊ– शेवया !" विजू म्हणाला.

तिकडे किशाबापूंची स्वारी गुणगुणत होती. "आमिषे मीन लावियेला गळी–"

ही फौज आपल्या कामगिरीवर निघाली तेव्हा त्यांचा तो संवाद ऐकत असलेल्या शकूताई दात करकरावीत त्यांच्याकडे पाहात होत्या. आता अंकल त्यांच्याकडे पाहून हसत म्हणाले, "शकूताई, तुमची आता सुटका नाही बरं ? तुम्हाला हा चॅलेंज पार पाडलाच पाहिजे !"

इकडे शकूताई चिंतातूर होऊन बसल्या आहेत अन् बाकीची मंडळी त्यांच्याकडे गंमतीने पाहत आहेत, तो बिपिन अन् त्याचे दोन बालमित्र नदीवर जाऊन पोचले. निघण्यापूर्वी त्यांनी मच्छी-मारीचे साहित्य बरोबर घेतले होतेच, शिवाय तात्यांनी दिलेल्या डबडचात काही विशविशीत गांडुळेही भरून घेतली होती.

नदीवर यावेळी गर्दी फारशी नव्हती. सूर्य बराच वर आलेला असल्याने आंघोळी नि धुणी आटपून गावकरी घरोघर गेले होते. एका प्रशस्त काळचा कातळावर बिपिनने डेरा दिला आणि गळाला ते वळवळणारे आमिष बांधून त्याने गळ पाण्यात सोडला. मोना त्याची कारवाई लक्षपूर्वक पाहू लागली, तर विजूने उरलेली गांडुळे डबडचात भरून तो खजिना आपल्या ताब्यात घेतला.

"पाणी स्वच्छ आहे. तो बघ तळ दिसतोय." मोना जाळे उलगडीत म्हणाली, "आणि कोळंबी बघ किती वळवळताना दिसताहेत. जाळं टाकलं तर गाळण्यातल्या चहासारखं भरून जाईल मासळीने."

"कोळंबी नाही. ती कोळंबी खाऱ्या पाण्यात मिळते. तू पकड वाटलं तर हे बारीक मासे. पण आत्याच्या लिहिण्यावरून तिला

मोठा मासा अभिप्रेत असावा."

"काय असावा ? मासे मारायला बसलं की लगेच प्रेतबीत असली भाषा केली पाहिजे का ?"

बिपिन हसला. आपल्या तोंडून एकदम जाडा शब्द का निघून जावा हे क्षणभर त्यालाही कळले नाही. रामदास-तुकाराम फार झाले म्हणून तर नसेल ?

तिकडे बिपिनने सांगितले तरी मोना आपल्या जाळ्यात बारक्या माशांचा पुंजका पकडण्याची धडपड करीत होतीच. त्या गडबडीत तिचा पाय घसरला अन् ती पाण्यात पडली.

"मोना– मोना–"

"संभाळ ! तो खडक पकड, मोना !"

"कुणीही घाबरू नका !" मनातून घाबरलेली मोना नाका-तोंडातून पाणी फेकीत फुदफुदली. तिने खडकाची कपार पकडली अन् ती सुरक्षित वर आलीसुद्धा. पण तिचे कपडे संपूर्ण भिजले होते.

"घरी पळ मोना ! कपडे बदलून ये." बिपिन म्हणाला.

"कशाला ! आत्ता वाळतील अंगावर." मोना म्हणाली. पण बिपिनने ते मानले नाही. त्याने तिला घराकडे पिटाळले. बिचारी निराशपणे घरी गेली पण धावतपळत. कारण तिला परत यायचे होते.

बिपिन गळ टाकून एकाग्र चित्ताने पाण्याकडे पाहात बसला होता. त्याला विजू म्हणाला, "कधी येणार आहे तरी मोठा मासा ?"

"मोनाने पाण्यात पडून घोटाळा केलान्, आपण भिजली ती भिजली अन् पाण्यात उगाच खळबळ माजवलीन्." बिपिनने गळ उचलून तो आपटीत म्हटले. "एखादा मत्स्यराज इकडे यायला

निघाला असला तर तो बिचकून परतही गेला असेल. पाणी निवळेपर्यंत जरा थांबायला हवं."

"ए ! मला आता काहीतरी हिरवंनिळं जाताना दिसलं. पापलेट असणार ! की रावस ?"

"दोन्ही नाहीत. बांगडा म्हणजे बाँबे डक. खास मुंबईचा मासा. आणि रावस हिरवा-निळा नसतो, लाल असतो हे माहीत आहे ना तुला ? शिवाय ते दोन्ही खास समुद्रातले."

इतक्यात त्यांच्या मागून कुणीतरी खुळूखुळू हसत असल्याचा आवाज आला आणि पाठोपाठ शब्द आले,

"एक्सक्यूज मी, पण गळ फार हलवताय तुम्ही. अशाने फिश मिळणंच शक्य नाही."

बिपिनने चपापून मागे पाहिले. एक सतरा-अठरा वर्षांची मुलगी त्यांच्याकडे उपहासाने पाहात उभी होती. तिच्या गळ्यात एक शबनम होती अन् तिचे पाय धुळीने मळलेले होते. बरीच चालून आली असावी. केस कुरळे, चेहरा नाजुक, डोळे काळेभोर अन् मिस्किल असा तिचा एकूण नूर होता.

"काय चुकलं माझं ? आणि तुम्ही कोण ?"

"तुम्ही पक्के शहरातले दिसता. मी मुंबईकर असले तरी कधी-कधी फिशिंगसाठी जात असते."

"पण तुम्ही कोण ?"

"मी ? माझं नाव प्रफुल्ला सेन."

"ओ: ! म्हणजे तुम्हीदेखील चंद्रूआत्याकडे आलाहात तर. आम्ही पण तिकडेच आहोत. माझी ओळख करून देतो. आमार नाम बिपिन."

"त्याला अहो म्हणू नका." बिपिनच्या छोट्या सेक्रेटरीने

आपले नेहमीचे तुणतुणे लावले.

"बिपिन ? तुमि बांगला ?"

"नोई. आमि मराठी. बिपिन बुकलवार."

"ओः ! म्हणजे अक्काचा नेव्हचू ना ? भांज्या ?"

"राईट.आणि तुम्...तू...अक्कांची लाडकी बंगाली मुलगी ना ?"

"राईट. मी बंगाली असले तरी आता पक्की मराठी बनले आहे. अक्कांची मानलेली मुलगी मुंबईला असते. मेडिकल कॉलेजात."

"मी पण मुंबईला असतो." विजू म्हणाला. "शाळेत. हा बिपिनबाबू माझा नि मोनाचा दादा आहे मानलेला."

प्रफुल्ला हसली. मग एकाएकी तिचा चेहरा काळवंडला. "अक्कांनी बोलावलं म्हणून आले मी. आय ॲम सो टेरिबली सॉरी ! बिचारी अक्का! – अंकल इथेच आहेत का ?"

"हो. अक्काच्या वुइलची वाट लावताहेत ते. आमच्या आत्याचं वुइल म्हणजे साधं इच्छापत्र नाही. ते इच्छासत्र आहे."

"आम्ही मासे पकडतोय ते तरी काय, तिच्याच हुकुमावरून." विजू.

"म्हणजे ?"

म्हणजे काय ते बिपिन समजावून देतो आहे तोच पोशाख बदललेली मोना धावतच तिथे येऊन थडकली. लगेच विजूने तिची प्रफुल्लाशी ओळख करून दिली.

इकडे बिपिन मच्छीमारीच्या उद्योगातून निवृत्त झाला होता आणि प्रफुल्लाने खाली बसून त्याच्या हातातला गळ आपल्या ताब्यात घेतला होता. गळचातली शबनम आता खडकावर लडबडत होती.

गळाचा हूक रिकामा दिसला म्हणून प्रफुल्ला म्हणाली, "बेट ?"

बिपिनला वाटले, ही बेट म्हणजे पैज मारायला बघते आहे. तो म्हणाला, "बेटबिट लावायला मी काय चंद्रूआत्या आहे ?"

"आणि तरी याने बेट मारून मुंबईला अठरा तासांत चक्कर मारली आहे." बिजूने गर्वाने माहिती दिली. "मी होतो बरोबर."

"बेट नाही. मी बेंऽट म्हटलं. BAIT. बेऽट." या खेपेस बोलताना तिने आपले 'बेबे' बकरीसारखे लांबवले होते. मात्र बकरी हसत नाही. ही हसत होती. "या गळाला लावायचं बेट."

"आमिष ? हे घे." आणि लगेच कोषाध्यक्ष बिजूने आपली ट्रेझरी खोलली आणि तिला काही गांडुळांचे अनुदान दिले.

गळाच्या हुकाला गांडुळे लावून ती म्हणाली, "नीट बघा, गळ असा धरायचा. अन् असा फेकायचा."

तिने गळ फेकला मात्र, त्याच क्षणी खांद्याला अडकवलेला शबनमचा पट्टा ओढला गेला. त्याचे झिप खोलले गेले अन् पिशवी गडगडत जाऊन थेट नदीत पडली.

"सॉरी." प्रफुल्ला म्हणाली.

"नेव्हर माइंड" बिपिन पुटपुटला.

खरे म्हणजे त्यावेळी जो जोराची ओढ बसली त्यामुळे प्रफुल्लाही पाण्यात लवंडणार होती, पण तेवढ्यात तिने स्वत:ला सावरले, अन् गळाची काठी ओढून धरली.

लेंगा भिजणार याची पर्वा न करता बिपिन तिची शबनम काढण्यासाठी पाण्यात उतरला. वाहात गेलेली पिशवी आणायला त्याला बरेच आत जावे लागले. पण अखेरीस हाताला लागली. तिचे तोंड उघडले होते अन् आतून कसली तरी पुडी बाहेर पडली होती. त्याने पिशवी धरली, पण त्याला ती चटकन ओढता येईना.

थाड– थाड– त्याच्या हातावर फटके बसले. तो चकित झाला.

खूप जोर करून त्याने शबनम उचलली अन् पाण्याबाहेर काढली. किनाऱ्यावरचे प्रेक्षक त्याचा विक्रम पाहून थक्क झाले. कारण बिपिनने शबनमबरोबर तिला झोंबणारा एक मोठा मासा वर आणला होता.

"विजू-मोना ! लवकर या ! धरा त्याला. नाहीतर पळून जाईल !"

मासा जवळजवळ दीड फूट लांबीचा होता. त्याच्या थपडा चुकवण्याच्या नादात त्याने शबनम खडकावर फेकली. विजू-मोना इतका वेळ आश्चर्याने हा प्रकार पाहात नुसती उभी होती. आता विजूने एकदम माशावर झडप घातली. अन् त्याची वळवळणारी शेपटी दाबली. प्रफुल्लाने हातातला गळ टाकला आणि तीही त्याच्या मदतीला धावली. मोनाच्या कोवळ्या मनाला मात्र त्या मुक्या प्राण्याचे हाल बघवत नव्हते. 'ईऽ' म्हणत तिने दोन्ही कान दाबून मान फिरवली होती.

माशाच्या या अकल्पित शिकारीचे रहस्य लवकरच उलगडले.

"शबनमचं तोंड उघडलं होतं ना?" प्रफुल्ला म्हणाली, "त्यामुळे माझी फरसाणाची पुडी बाहेर पडली !"

"फरसाण खायला आला हा ढोल्या ?"

"मग काय तर ? आणि पिशवीचं झिप तोंडात अडकून कैदी झाला !"

"शाबास !" मोना म्हणाली. माशाची तडफड आता थंडावल्यामुळे तीही बरीच सावरली होती. "म्हणजे या प्रफुल्लाताईच्या गळाला मासा लागलाच नाही. तिच्या शबनमला लागला."

"काही असो. आपलं काम झालं !" बिपिन म्हणाला. मोना-

जवळचे जाळे घेऊन त्यात त्याने मासा कोंबला होता. ते जड झालेलें जाळे खांद्यावर टाकीत तो म्हणाला, "चला आता घरला! शकूताई वाट पाहात असतील."

प्रफुल्लानेही आपली शबनम उचलली आणि तो अर्धा भिजलेला बिपिन कोळी अन् ती घामाबूम झालेली प्रफुल्ला कोळीण आपल्या छोट्या मित्रांसह शिकार घेऊन घराकडे निघाली.

१ शकूताईचा 'तळतळाट' संपला

"शिकार आणलीय शकूमावशी, शिकार!" वाहेरून गर्जना झाली आणि दाराशी आलेल्या शकूताई किंचाळल्या, "आईऽग! हा असला भोपळा मी चिरायचा की काय?"

"नुसता चिरायचा नाही, तळायचा पण!" बाबासाहेबांनी त्यांना आठवण दिली. "मरळ मिळाली वाटतं, विपिन? –की रोहू? कमालच केलीस!"

"एक पाहुणीताई पण आणलीय आम्ही." मोनाने वर्दी दिली

आणि बाहेर कोण आले आहे हे पाहण्यासाठी लगेच सर्वजण उठले.

"कोण– प्रफुल का ? वा, छान ! ये आत." अंकलनी दाराशी येता येता तिचे स्वागत केले. "तुला आमचं पत्र मिळालं ना ? व्हेरी गुड ! अक्का तुझी शेवटपर्यंत आठवण काढीत होत्या बघ!"

"अक्का ग्रेट छिलो, अंकल !" प्रफुल्लाच्या डोळ्यांत दोन मोत्यांसारखे अश्रुबिंदू उभे राहिले. "पण– पण तिने माझी आठवण काढलीन् हे पुष्कळ झालं. मला तिने प्रेझेंट देण्याचं काही कारण नव्हतं आणि तोही म्हणे दागिना ! एवढा का मला दागिन्याचा सोस आहे ?" हे बोलताना तिला हुंदके येत होते.

"असं कोण म्हणतो ग ?" अंकलनी तिच्या खांद्यावर हात ठेवीत म्हटले, "आणि तिने तुला प्रेझेंट का द्यावं हे तिला माहीत अन् तुला माहीत. आम्हाला काय विचारतेस ?"

प्रफुलने ओठ दाबले. एक आवंढा गिळला. जरा कावऱ्याबावऱ्या नजरेने तिने सभोवार पाहिले.

"सिंदुर्णीला ये म्हणून अक्का कितीदा तरी म्हणायच्या." ती रुद्ध कंठाने म्हणाली, "पण अखेरीस ती निघून गेल्यावर मी इथे येते आहे." माजघराकडे पाहात ती पुढे म्हणाली, "अक्काची प्राणज्योत विझली, आता भेटायचं नुसतं त्या पणतीला !" तिला आता रडू आवरत नव्हते. "खरं म्हणजे मला बोलावलंत तरी कशाला, अंकल ? नुसतं ते प्रेझेंट घ्यायला ?"

"नाही, बेटा." अंकल असे म्हणताहेत तो बाबासाहेब पुढे झाले अन् तिच्या खांद्यावर थोपटत म्हणाले, "आम्हाला तुला बघायचं होतं म्हणून. या पोरांशी तुझी ओळख झालेली दिसतेच आहे. यांच्यातला मोठा हा बिपिन आहे ना, त्याचा मी..."

"माझे वडील हे, प्रफुल." विपिन मध्येच म्हणाला आणि मग त्याने दाराशी जमलेल्या इतर मंडळींच्याही ओळखी करून दिल्या.

अंकल तपकिरीची डबी उघडीत म्हणाले, "प्रफुल, तुझ्या अक्काने तुला जो छोटासा दागिना ठेवलाय तो अर्धा खोटा नि अर्धा खरा आहे. त्यातला असली-नकली भाग तू जर बरोबर ओळखलास तरच तुला तो बक्षीस मिळेल !"

अश्रूंतूनही हास्य फुलले. प्रफुल म्हणाली, "हे बरं आहे अक्काचं ! मी काय एखादी सराफ बिराफ आहे वाटतं ?"

"नाही, पण तू हुशार आहेस. धातुशास्त्रावरची पुस्तकं तू वाचली आहेस. या विपिनचंही वाचन दांडगं आहे. अक्काच्या अटीप्रमाणे तू सिंदुर्णीत हजर असलेल्यांपैकी कुणाचीही मदत घेऊ शकतेस."

इतक्यात शकूताई पदराचे टोक नाकाशी धरीत बाहेर आल्या होत्या. त्यांच्याकडे पाहात तात्या म्हणाले, "पण या सगळ्या नंतरच्या गोष्टी आहेत. अंकलसाहेब, सध्या परीक्षा चालू आहे ती शकूताईची !"

"खरंच की !" आणि अंकलनी लगेच शकूताईशी प्रफुल्लाचा परिचय करून दिला. मासेमारी प्रकरणामुळे तिला त्यांचे नाव आधीच कळलेले होते. त्यामुळे त्यांच्याकडे पाहात ती नुसती हसली आणि मग एकदम तिच्या लक्षात आले की बरीच वडील माणसं इथे जमलेली आहेत; आपण जरा वाकलं पाहिजे. आणि लगबगीने तिने एक नमस्काराची कवायत केली.

"औक्षवन्त हो !" खूष झालेल्या शकूताईनी आशीर्वाद दिला. "बरं झालं तू आलीस मुली ! इथे माझी घनघोर परीक्षा चाल-

लीय. तू मासेखाऊ बंगालीण आहेस. हा मासा तळताना मदत करशील का मला ? का हो अंकलसाहेब, परीक्षेच्या हॉलमध्ये मी हिची थोडी सल्लामसलत घेतली तर ती कॉपी ठरणार नाही ना ? स्वर्गात ती बया चवताळणार नाही ना ?"

"मुळीच नाही. मदत बिदत अवश्य घ्या." आपली डायरी उघडून अंकल म्हणाले, "तुमच्या कामात जर कुणी दुय्यम मदत करतील तर ती जरूर घ्यावी असं अक्कांनी चक्क सांगितलंय." आणि त्यांनी डायरी मिटली.

"ए दुय्यम, करशील ना ग मदत ?" शकूताईंनी पुन्हा आपला मोर्चा प्रफुलकडे वळवला.

"करील की !" तिच्या वतीने बिपिननेच उत्तर दिले. "मासा पकडतानासुद्धा जर तिने मला मदत केलीय, तर मासा तळताना का करणार नाही ?"

प्रफुल्ला नुसतीच हसली.

विजू-मोनांना ही संधीच हवी होती. त्यांनी दोघांनी मिळून आता त्या अपूर्व मच्छीमारीचा इतिहास थोडक्यात वर्णन केला. तेव्हा सर्वांचीच करमणूक झाली. बिपिन म्हणाला, "सगळं काही करील ती. पण अगोदर तिला चहा पाजाल का ?"

"बाई-बाई ! खरंच की !" आणि शकूताई तात्यांकडे वळून म्हणाल्या, "तात्या, आम्हाला सर्वांनाच हवा आहे चहा. सगुणाबाईंना म्हणावं तेवढा द्या आणि तुम्ही कटा. स्वयंपाकघराचा ताबा मग मी घेणार आहे. पोरांनो, तुम्ही पण या दुय्यम म्हणून मदतीला. मोठ्यांनी मात्र आत येण्याचं कारण नाही."

त्याप्रमाणे सर्वांचे चहापान झाले आणि मग शकूताई कमरेला

पदर अन् नाकाला रुमाल बांधून स्वयंपाकघरात प्रविष्ट झाल्या.

गोड्याच पाण्यातला मासा, पण शकूताईंच्या आग्रहावरून सोमाने त्याला स्नान घालून ताटात बसवून आणले होते.

" फार मोठा आहे. आधी चार तुकडे करा." प्रफुल्ला म्हणाली, तशी शकूताई पुढे सरसावल्या. आता त्यांच्या अंगात जणू महाकाली संचारली होती. कोळीण धारदार पात्याच्या प्रचंड विळीवर कशी फतकल मारून बसते ते त्यांनी एकदा पाहिले होते– अन् लगेच मान फिरवली होती– त्याप्रमाणे विळी उघडून त्यांनी जमिनीवर मांडली आणि मन घट्ट करून त्या म्हणाल्या, " आणा ती भाजी इकडे !"

सोमाने दिलेला मासा त्यांनी दोन हातात धरला; पण तो जो बुळकन् निसटला, तो थेट उडी मारून स्वयंपाकाच्या ओट्यावर जाऊन पडला. शकूताईंनी त्या मरळीसारखेच डोळे वटारले.

" मेल्यांनो !" त्या किंचाळल्या. " हा तर जिवंत आहे !"

" मेलेलाच आहे तो, शकूआत्या !" बिपिनने हमी दिली. " तुम्हाला धरता आला नाही. त्याला प्रॅक्टिस लागते."

" हो का ?" हातांना घाण लागल्यासारखे तोंड करून दोन्ही तळवे घाशीत शकूताई म्हणाल्या, " मग आता प्रॅक्टिसिंग स्कुलात नाव घालू का ? कर जरा हात लांब अन् दे तो इकडे."

पुन्हा शकूताईंच्या हातात आलेला मासा त्यांनी दोन्ही हातांनी दाबून धरला. विळीवरही त्या दाबून बसल्या आणि पाठ शक्य तेवढी मागे नेऊन डंबेलसचा व्यायाम करावा तसे त्यांनी दोन्ही हात पुढे ताणले अन् मासा बेधडक हाणला विळीच्या पात्यावर.

विळीला धार चांगलीच होती. माशाचे दोन तुकडे होऊन दोन बाजूंस पडले, पण ते लालपांढरे थबथबीत मांसखंड बघणे शकू-

ताईंना असह्य झाले आणि त्याही मागच्या मागे पडल्या. उठल्या, पण त्यांना भयंकर मळमळत होते. धावत पळत मोरीकडे जाऊन दोन मिनिटांनी लगबगीने परत आल्या.

इकडे विजूने एक अन् मोनाने एक असे ते माशाचे रक्ताळ तुकडे उचलले अन् आता विळीवर बसलेल्या प्रफुल्लाजवळ दिले. ती त्यांचे एखाद्या तरबेज कोळणीप्रमाणे बारीक तुकडे चिरू लागली.

शकूताई तिच्याकडे पाठ फिरवून ओटचाशी उभ्या होत्या. तेवढ्यात तात्यांनी एका फाटक्या कव्हरचे छोटे पुस्तक आणून दिले. ते हातात घेऊन बिपिन म्हणाला, "यात हजार पाकक्रिया मावणंच शक्य नाही. साइजवरूनच सांगतो, हे लक्ष्मीबाई धुरंधरांचं पुस्तक नाही."

शकूताई त्या चोपडचाकडे पाहात म्हणाल्या, "त्याला कापडी बाईंडिंग असे. मी पाहिलेलं आहे. याची लेखिका आहे साजूबाई घुर्ये."

"साजूबाई असो नाही तर लक्षुंबाई असो, शकूताई ! त्यात मासे तळण्याची कृती आहे का पाहू या." बिपिनने भराभरा पाने उलटली. त्याला फक्त आमलेट करणे माहीत होते.

"मटनाचे मुठे नकोत, मटन चॉप नको, मालपोवे– आं ? मधेच हे भटजी खाद्य कुठून आलं ? हां, बरोबर. अकारविल्हे मांडणी केलेली दिसतीय. 'म' ची लाइन ही. हे काय मुगाचे लाडू नि मेसूर ! हं, हे ओले मासे तळलेले. प्रकार एक, प्रकार दोन. हा दुसरा प्रकार करा तुम्ही, शकूआत्या. खमंग वाटतो." आणि मुद्दामच तो मिटक्या मारीत वाचू लागला... तुकडे स्वच्छ धुवावेत. धुतले. त्यांना मीठ लावून ठेवावे–"

"पण आधी खवले उपटायचेत ना ?" विजू म्हणाला. "शकू-मावशी, प्रफुलताई करील तुम्हाला मदत खवले उपटायला !"

"ते उपटणं बिपटणं तुम्हीच करा." शकूताई नाक मुरडीत म्हणाल्या आणि प्रफुलने खरोखरच त्या कामाला केव्हाच सुरुवात केली होती.

"मीठ लावून ठेवावेत–" बिपिन पुढे वाचीत होता. "अर्ध्या पाऊण तासाने ते धुऊन– त्यांना हळदीची व मिरचीची पूड लावावी."

"अर्ध्या-पाऊण तासाने ? म्हणजे आता इंटर्व्हल की काय ?"

"अर्धा तास नको नि पाव तास नको !" प्रफुलने मान झटकीत सांगितले. "पुस्तकांचं नेहमीच मानायला नको काही ! हे घ्या ताट, मावशी. आताच लावा हळदकुंकू– आय मीन हळद-मीठ !"

शकूताई त्या समारंभासाठी खुर्चीवर बसल्या. टेबलावरचे मसाल्याचे पंचपाळे नि मिठाचे बकम त्यांनी जवळ ओढले आणि पहिल्याने डोळे मिटून मग दोन बोटांच्या चिमटीत मीठ-हळद घेऊन त्या ते तुकड्यांना फासू लागल्या. तिकडे प्रफुलने भांड्यांमधून एक पसरट बिनकानाची कढई काढली– किंवा तवा म्हणा. फ्राईंग पॅन. आणि तो स्टोव्हवर ठेवला. त्यावर तेल ओतले.

"शेंडीने चोपडायला हवं तेल." शकूताई म्हणाल्या. तशी विजू मध्येच म्हणतो, "वेणीने चालेल ? बिपिनबाबूला कुठे शेंडी आहे ? माझी तर मुंजच झालेली नाही."

शकूताई पुन्हा डोळे वटारताहेत असे पाहून मोना कुजबुजली, "त्यांना शेंडी लावू नकोस." आणि चटदिशी टोपलीतली नारळाची शेंडी आणून तिने शकूताईंना दिली ती घेऊन त्या तव्याच्या तळाला तेल चोपडू लागल्या.

तिकडे प्रफुलने मसाल्याने माखलेले तुकडे एकेक करीत तव्यावर सोडले. दहा-बारा तुकडे जेव्हा एकसाथ चुरचुरायला लागले तेव्हा सुगंधी धुराने वातावरण भरून गेले आणि त्याची सवय नसलेल्या शकूताईंना दोन वेळा बाथरूमला व्हिजिट द्यावी लागली.

पण अखेरीस ते 'फराय' केलेले चॉप तयार झाले आणि सर्वांनी चॉपून खाल्ले. म्हणजे स्वतः शकूताई अन् ते दोन संतमणी सोडून सर्वांनी. शकूताईंना पोरांनी आग्रह खूप केला,– "बघा तरी शकूमावशी. अगदी वांग्याचे काप आहेत." पण शकूताई स्थितप्रज्ञासारख्या ढिम्म बसल्या होत्या.

भोजनोत्तर एक बैठक भरली. शकूताईंना मदत भरपूर झालेली असली तरी त्यांनी स्वतःला घृणास्पद वाटणारी ही कामगिरी तडीला नेली, याबद्दल अंकलनी त्यांचे 'पोटभर' कौतुक केले आणि त्यांचे पाकीट त्यांच्या स्वाधीन केले. त्यात शंभराच्या दहा नोटा होत्या.

"हुं!" करून त्या हजार रुपयांकडे शकूताई कितीतरी वेळ चमत्कारिक नजरेने पाहात होत्या.

"काय करण्याचा बेत आहे शकूताई, त्या पैशांचा?" बाबासाहेबांनी सहज प्रश्न केला, तेव्हा त्यांना तडकाफडकी उत्तर मिळाले, "चारी धाम यात्रा. त्याशिवाय या पापाची भरपाई होणार नाही!"

या वेळी उसळलेल्या हास्यकल्लोळात शेवटी शेवटी का होईना, पण शकूताईदेखील सामील झाल्या होत्या.



"या प्रफुलताई ! आता तुमची पाळी !" तात्यांनी पुकारले.

वेळ होती दुसऱ्या दिवसाची सकाळ. किशाबापू नि बजरंग या दोन संत पाहुण्यांनी आदल्या रात्रीच सिंदुर्णीला रामराम ठोकला होता. बजरंगाला वर्ध्याचा हनुमानगड बघायचा होता आणि किशाबापूंचा कर्जतला एक भजनाचा कार्यक्रम ठरलेला होता.

"आता तुमची पाळी." तात्यांची ठेक्यात री ओढून अंकल म्हणाले, "पुढे करा तुमची कानांची पाळी !" लगोलग हातातली छोटी डबी उघडून त्यांनी तिच्यापुढे धरली. डबीतल्या लाल लाल मऊ गादीला बिलगली होती दोन जुळी भावंडे– हिऱ्याची कुडी !

"आयला !" विजूचा एकेक डोळा एकेका संपूर्ण कुड्याएवढा झाला.

"अय्या !" "ओ:– माय– माय !" अशी प्रतिक्रिया अनुक्रमे मोनाने नि प्रफुलने प्रकट केली.

त्या हिऱ्यांचे तेज पाहून सर्वच जण चकित झाले होते. बाबासाहेबांनी तोंडाकडे नेलेला चिरूट वाटेतच थबकला होता. प्रफुलच्या हातांची बोटं तर कितीतरी वेळ ओठांना टेकलेली होती. अखेरीस ते ओठ विलग झाले अन् त्यांतून शब्द उमटले, "काय मस्त आहेत हो कुडी ! आत्या तरी फारच करते ! आय डोंट डिझर्व्ह धिस !"

"यू डू बट ओन्ली हाफ ऑफ इट." अंकल स्वतःची डबी उघडून तीत दोन बोटे खुपशीत म्हणाले, "कारण त्यांतले अर्धे हिरे खोटे आहेत हे तुला सांगितलंच. तेव्हा आता कर परीक्षेला सुरुवात. –आक्छिः !"

"बाई ग ! काय दचकले मी !" प्रफुल.

"तर काय !" विजूने तिला हळूच दुजोरा दिला. "केवढ्याने शिकतात हे शिकल ! आय मीन अंकल !"

"ए !" मोनाने त्याला चिमटा काढला अन् प्रफुल म्हणाली, "ही रत्नपरीक्षा माझ्या मेडिकलवर ताण करणारी आहे." तिने दोन्ही कुडी हातात घेऊन उजेडाकडे धरली.

"कशी काय ओळखायची बुवा यांतली खरी नि खोटी ? त्यासाठी खरोखरीच एखादा जवाहिऱ्या हवा."

"किंवा बिरबल !" विजू म्हणाला.

"बिपिनबाबू, तू काढ की तुझ्या त्या टॉप डोक्यातून एखादी आयडीआ."

"प्रत्येकाचंच डोकं टॉपला असतं." बिपिन म्हणाला. "मी म्हणजे कुणी म्युझियममधला प्राणी नाहीये !"

"तसा या गावातल्या कुणाही तज्ज्ञांचा तुम्ही सल्ला घेऊ शकता. पण गावातलाच हवा." अंकल म्हणाले, "मात्र चार

तासांत तुम्ही निर्णय लावला पाहिजे. पण– तात्या सांगतात की, सिंदुर्णीत कुणी रत्नपारखी नाही."

"लहानसा गाव हा. इथे एकही सराफ तुम्हाला मिळायचा नाही." तात्या.

बिपिन विचारात गढला होता. तो आता एकदम म्हणाला, "सराफ नसेल, पण सावकार असेल की !"

अंकलने डोळे विस्फारले... "ग्रेट !" ते म्हणाले, "ही छान आयडीआ काढलीस तू."

बिपिनची कल्पना सर्वांनीच उचलून धरली. खेडोपाडी लोक सावकाराकडे दागिने गहाण टाकतात. सावकारासारख्या धूर्त माणसाला रत्नाची पारख असलीच पाहिजे."

अंकल म्हणाले, "मग 'शुभस्य शीघ्रम् !' तुम्ही सावकाराला भेटा जाऊन."

"थांबा, मीच येतो तुमच्याबरोबर खटमलशेटजींच्या घरी." तात्यांनी तयारी दर्शवली.

लगेच बिपिन, त्याचे छोटे सोबती अन् प्रफुल्ला सेन तात्यांसमवेत खटमलशेटजींकडे जायला निघाली.

"खटमल म्हणजे ढेकूण." बिपिनने जाता जाता प्रफुलजवळ शंका काढली. "सल्ल्याची फी मागीलच तो ! आपलं थोडंसं रक्त चुंफीलच हा ढेकूण."

"जाऊ दे रे." मोना म्हणाली, "कर थोडंसं रक्तदान. प्रफुलताईच्या कानात खरंच छान दिसतील ही कुडी !"

"कुणाच्याही दिसतील." प्रफुल हसत म्हणाली, "तुझ्याही कानांत छान दिसतील."

"भिकबाळी असती तर मलाही शोभली असती." विजू

दुसराच त्याला भिकवाळी पुरुष घालतात हे माहीत होते; कारण 'व्यवहारमशास्त्री प्रभुण्यांचा धडा वाचला होता.

तो भिकबाळी मोत्यांची असतात." मोनाने त्याला हिणवले तशाच्यावेपिन लगेच म्हणाला, "हिऱ्याची पण असतील, हो ना ग प्रफुल ?"

"मला काही माहीत नाही. पुरुषी दागिना तो. आणि पुन्हा टिपिकल मराठी."

तात्या हा संवाद ऐकताना स्वतःशी हसत होते. त्यांच्या कानात भिकबाळी नसली तरी ते नाना फडणीस शोभत होते.

इतक्यात सावकाराचे घर आले. ही पाहुणी मुले कशासाठी आली आहेत याचा तात्यांनी खुलासा केल्यावर शेटजींनी फारच नवल प्रकट केले.

"कुडी–हिऱ्याची कुडी !" उघडलेल्या डबीतल्या त्या लखलखीत दागिन्याकडे पाहताना शेटजींची जीभ सुकलेल्या ओठांवरून फिरत होती. "माझ्याकडे लई दाग आहेत, पण हिऱ्याचा एकबी नाही. या सिंदुर्णी खेडचात हिरा कुठचा हो दिसायला पण थांवा, शेटाणीला विचारतो मी !"

"नको नको, त्यांना कशाला त्रास देता ?" बिपिन गडबडीने म्हणाला. आणि मोना पुटपुटली, "त्यांना काय कळतंय ?"

बिपिनला कसली शंका आली असावी ते हेरून तात्या त्याच्या कानाशी कुजबुजले, "शेटजींच्या प्रामाणिकपणाविषयी शंका घेण्याचं कारण नाही, बिपिन. त्याबद्दल आम्हाला खात्री आहे."

बिपिनचा चेहरा जरा पडला. पण शेट नि शेटाणी आतून इतक्या झटपट बाहेर आली की तेवढचा वेळात त्यांना काही भानगड करणे शक्यच नव्हते.

"आपल्याला नायबा कळत यातलं काही !" शेटी त की, म्हणाल्या, "समदे खडे सारखेच लखलख करताहेत."

"मग जातो आम्ही" बिपिन म्हणाला. पण शेटाणींनी यचा तसे जाऊ दिले नाही. मसाल्याच्या दुधाचे प्याले आले. वजू-मोना त्या दुधावर बेहद्द खूष झाली. मग तात्यांनी सर्वांतर्फे यजमानाचे आभार मानले आणि मंडळी घरी निघाली.

वाटेत बिपिन सारखा विचार करीत होता, की आता पुढे काय करावं ?

"काही सुचत नाही बुवा !"

"ते किशाबापू नि बजरंगकाका असते तर त्यांनी तरी काही सुचवलं असतं." मोना म्हणाली.

"त्या गोसाव्यांना दागिन्यातलं काय ज्ञान असणार आहे ?" बिपिन मोठ्याने हसून म्हणाला आणि त्याला दासबोधातले एक वचन अर्धवट आठवले, "बजरंगकाकांनी काय सांगितलं असतं माहीत आहे ? 'नाना रत्नांची परीक्षा हे ज्ञान नव्हे !'"

पण उंबरठ्यावर पाऊल पडले मात्र, त्याला एक कल्पना सुचली.

"रत्नपरीक्षेवरची पुस्तकं असतात." तो उद्गारला, "आत्याचं ग्रंथभांडार मोठं आहे. त्यात कदाचित् एखादं पुस्तक असेलही."

पण विजूने त्याच्याही अगोदर पुस्तकांच्या शेल्फावर झडप घातली होती. कालपासून हेरून ठेवलेला कोश त्याने बाहेर काढला, तेव्हा बिपिन म्हणाला, "हा शब्दकोश आहे. यात नुसते शब्दांचे अर्थ असतात. आपल्याला ज्ञानकोश हवा– एन्सायक्लोपीडिया."

"डॉ. केतकरांचा ज्ञानकोश आतल्या कपाटात आहे तुम्हाला पाहायचा असला तर." तात्या म्हणाले. पण तेवढ्यात बिपिनला

दुसराच एक कोश सापडला होता. गणेश रंगो भिडे यांचा 'व्यवहारकोश.'

तो पहिलें काही भाग चाळीत असतानाच मोनाने पाचवा खंड त्याच्यापुढे करीत म्हटले, "याच्यात आहे बघ र– रत्नातला."

आणि भराभरा पाने उलटताच 'रत्ने' या विषयावरची नोंद निघाली.

"१६५१ ते १६७२. बाप रे! चांगला २१ पानांचा लेख आहे की!"

"रत्नं खूप जातीची असतात. आपल्याला फक्त हिरे हवेत." प्रफुल म्हणाली.

"मिळतील. प्रफुलताई, तुला हिरे मिळतील." मोनाने तिला आश्वासन दिलें आणि बिपिन भराभर वाचू लागला–

"रत्नांची परीक्षा : पूर्वकालीन ग्रंथांतून सांगितलेली परीक्षा नेत्रेंद्रिय, स्पर्शज्ञान, निकष इत्यादी साधनांनी होत असे. अलीकडे रत्नांचे पृथक्करण केले गेल्यामुळे त्याच्या घटकांचे ज्ञान झालेले आहे. क्ष-किरणांनीही यात आपला वाटा उचलला आहे. त्यामुळे सांप्रत परीक्षेची शास्त्रीय साधने विविध झाली आहेत. त्यायोगाने खऱ्याखोट्याची पारख त्वरित व बिनचूक होऊ शकते–"

"हो. पण ती साधनं कोणती ते सांगा की!" मोना.

"पुढे ऐका– हिरा इतका कठीण असला तरी तो फोडता येतो, त्याचे चूर्णही करता येते. हे चूर्ण हिरे व इतर रत्ने यांना जिल्हई देण्याकरता वापरतात. ढेकणाच्या रक्ताने हिरा भंग पावतो असा लोकभ्रम आहे."

"या घरात ढेकूण पण नाहीत." तात्यांनी गॅरंटी दिली.

"ढेकणाचं रक्त म्हणजे आपलंच रक्त की!" मोना. "पण

स्वत:ला कुणी हो टोचून घ्यावं ? आणि किती रक्त लागेल एक हिरा कापायला ?"

"शिवाय तो लोकभ्रम !"

"तुम्ही कुठे वाहवत चाललाहात ?" प्रफुल म्हणाली. "विपिन, तू मुद्द्यापुरतं बघ. आपल्याला हिरा फोडायचा नाहीये ! हिऱ्याची परीक्षा..."

"परीक्षा– परीक्षा– अरे सापडलं ! हे बघ. सबंधच वाचतो. ऐका हं– हिऱ्यांची परीक्षा करणे हे नजरेचे काम आहे. सर्व रत्नांपेक्षा हिऱ्यात लखलखीतपणा व तेज जास्त असते. हिऱ्याने सर्व रत्नांवर चरा पडतो. इतर रत्ने हिऱ्यावर चरा पाडू शकत नाहीत–"

"ही कसली टेस्ट ? आणि इतर रत्नं आहेत कुणापाशी ?" प्रफुल म्हणाली. "आगे बढो !"

"खऱ्या हिऱ्याची ढाळ वरच्या बाजूस मारते. खोट्याची आतल्या बाजूस मारते."

"ढाळ म्हणजे काय बुवा ?" मोना.

"थांब. मी शब्दकोश पाहून सांगतो." विजू म्हणाला. आणि लगेच त्याने शब्दकोशाचा चौथा भाग काढला– ड ते न. तो पाने उलटायला लागला. "ड– ड– डोण, डोलणे– ढ– ढळणे– ढाक– ढाका–ढाल– आणि हे ढाळ."

"तेच. अर्थ वाच."

"पु. १– पु. म्हणजे पुल्लिंगी ना रे, बिपिनबाबू ?"

"बरोबर. तसा तू हुशार आहेस. पण अर्थ वाच. पुल्लिंगी काय ?"

"पातळ विष्ठा, जुलाब–"

'शी ! ते नाही रे– दुसरा अर्थ असेल 'ढाळ'चा. बघ–"

विजूने वाचले– "२, शौचास साफ होण्याचे औषध–"

बिपिनने डोळे तांबटरले. "बंद कर पाहू ते ! पुढचा अर्थ वाच–"

"ढाळ म्हणजे तेज, पाणी (मोत्याचे) !"

"दॅटस् इट !" बिपिन म्हणाला. "प्रफुल, बघ पाहू तेवढे तपासून. या तुझ्या चौदा हिऱ्यांपैकी कुठल्याचं तेज बाहेर आहे अन् कुठल्याचं पाणी आत आहे ते !"

पण प्रफुलने खूप पाहिले तरी तिला काही ते कळेना. प्रत्येक खडाच लखलख करीत होता. पण ते तेज किंवा पाणी आत आहे की बाहेर हे तिला सांगता येईना. आणि तिच्याजवळ आत–बाहेर नसल्यामुळे तिने आपले अज्ञान कबूल केले.

बिपिनने पुन्हा वाचले– "खोटचाची ढाळ आतल्या बाजूस मारते व खोलगट दिसते."

प्रफुल अजूनही हातातल्या कुड्यांकडे पाहात होती. ती आता एकदम म्हणाली, "त्या 'खोल' शब्दावरून मला आता वाटतेय बरं का– यांतल्या काही खड्यांची लकाकी आतल्या अंगाला आहे. खोल."

"मग ते खोटे खडे. काढ पाहू ते एका बाजूला."

"कुड्यातून बाजूला कसे काढणार ? पण नंबर टिपून ठेवते त्यांचे एका कागदावर. हा तेजाचा फरक फार सूक्ष्म आहे. तेव्हा मी चुकेनही कदाचित."

"चुकू दे. मांड तर खरी."

आणि प्रफुलने बराच वेळ निरीक्षण केले अन् कुड्याच्या फिरकीच्या खालच्या भागापासून आरंभ करून प्रत्येक कुड्यातल्या सातही खड्यांना नंबर दिले. त्यांतले ३–४–६ हे पहिल्या कुड्या-

तले अन् १–२–४–५ हे दुसऱ्या कुडचातले हिरे नकली आहेत, असे तिने जाहीर केले.

"गुड !" बिपिन उद्‌गारला. "आता पुढल्या कसोट्या ऐका– खरा हिरा तेजाबात टाकला तर जशाचा तसा राहतो. खोटा फुटून त्याचे तुकडे होतात. आता तेजाब कुठून आणायचा आपण ? त्यासाठी दुकानात जायला हवं–"

"सोमा आणील." तात्या म्हणाले आणि त्यांनी त्याला चिठ्ठी देऊन पिटाळलेही.

"ठीक. तूर्त ती टेस्ट पुढे ढकलू या. पुढे– खरा हिरा विद्युत्– जागृत होतो. म्हणजे रेशमी वस्त्राने घासून जवळ कापूस नेला तर तो त्याला ओढून घेतो."

"प्रफुलताई, तुझी साडी प्युअर सिल्कची आहे–" मोना ओरडली. "बघ घासून साडीच्या टोकाने ते हिरे."

प्रफुलने तसे केले. क्रमाक्रमाने प्रत्येक बारीक खडा तिने पदराच्या टोकाने जपून घासला. आणि सिंदुर्णीचे ते घर म्हणजे कापसाचे आगर असल्यामुळे कापूस सहज मिळू शकला आणि ही परीक्षा पूर्ण व्हायला वेळ लागला नाही. त्यावरून प्रफुलने मघाशी केलेली परीक्षा बहुतांशी खरी असल्याचे सिद्ध झाले. आणि सर्वांनी तिचे अभिनंदन केले. फक्त एका खडयाच्या बाबतीत जरा शंका राहिली.

"पुढलं वाच."

"खऱ्या हिऱ्यावर मुखाने उच्छ्वास टाकला असता त्यावर पांढुरकेपणाची झाक काचेवर टाकलेल्या उच्छ्वासापेक्षा जास्त दाट येते व तावडतोब जाते. काचेवरची जास्त वेळ टिकते–"

हे वाचल्याबरोबर प्रफुलच्या कुडचांवर फुंकरा मारण्यासाठी

या युवक मंडळीत एकच अहमहमिका लागली. तिचाही निकाल प्रफुलने लावलेल्या निकालाला पुष्टी देणाराच ठरला. मघाशी ज्याबद्दल शंका होती तो हिरा नकली असल्याचे नक्की ठरले. मात्र दुसऱ्याच एका खोट्या ठरलेल्या हिऱ्याबद्दल शंका उत्पन्न झाली. कारण त्याच्यावरची पांढुरकी झाक जास्त वेळ टिकत नाही असे काही जणांना वाटले. बिपिनने पुन्हा विशेष काळजी घेऊन फुंकर मारली अन् निर्णय दिला की हा खरा हिरा आहे. मग त्याने पुढचे वाचले– "स्वच्छ पाण्यात खरा हिरा ठेवला तर त्याची चकाकी व तेज कायम राहते. खोट्या हिऱ्याची चकाकी पाण्यात मंद होते व पैलू वाकडेतिकडे व ढोबळ दिसतात–"

ही परीक्षा एकाग्रतेने करायची असली तरी सोपी होती. स्वच्छ पाणी एवढेच साहित्य होते. त्यामुळे अर्धा तास घालवल्यावर बिपिनच्या मते ती यशस्वी झाली. या परीक्षेत प्रफुल्लाताई नव्वद टक्के मार्क मिळवून पास झाल्या.

शेवटी पुस्तकात सांगितल्याप्रमाणे त्यांनी शेवटची टेस्ट केली. तात्यांकडून त्यांनी आत्याच्या पेटीतले सूक्ष्मदर्शक यंत्र आणवले आणि त्याखाली दोन्ही कुड्या ठेवल्या. "सूक्ष्मदर्शक यंत्राने पैलू पाहिल्यास नकली हिऱ्याचे जसेचे तसे दिसतात, पण खऱ्या हिऱ्याचे पैलू एका रेषेत दिसत नाहीत. कृत्रिम हिरा काचेचा केलेला असल्यास आत रेघोट्या व बारीक बुडबुडे दिसतात. खऱ्या हिऱ्यात तसे दिसत नाहीत."

आणि ही टेस्ट फार उपयोगी पडली. पूर्वी केलेल्या सर्व कसोट्यांवर तिने पसंतीचा शिक्का मारला. तेवढ्यात सोमा तेजाव घेऊन आला होता. त्यामुळे ती फायनल टेस्टही ताबडतोब उरकता आली. त्याही कसोटीने जेव्हा पूर्वीच्या निर्णयावर शिक्का-

मोर्तब केले तेव्हा परीक्षेच्या हॉलमध्ये निरीक्षक म्हणून बसलेली सर्व वडील मंडळी प्रफुल, बिपिन, मोना नि विजू या चौकडीवर एकदम प्रसन्न झाली अन् टाळ्यांचा कडकडाट करून त्यांनी त्यांचा गौरव केला.

अंकलनी बाबासाहेबांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करून त्यांच्या हस्ते प्रफुलचे पारितोषक तिला अर्पण केले, तेव्हा पुन्हा एकदा टाळ्यांच्या आवाजाने हॉल दणाणला.

"यांतले निम्मे हिरे खोटे असले तरी कुड्यांची किंमत ६–७ हजार रुपये होईल." अंकल म्हणाले. त्यावर गोरीमोरी झालेली प्रफुल म्हणाली, "त्या ६–७ हजारांपेक्षाही आत्याने मायेने माझ्यासाठी ठेवलेली भेट म्हणून मला या दागिन्याचं मोल अधिक वाटतं. हा मी कधी विकणार नाही." हे बोलताना तिचा कंठ नि डोळे भरून आले होते.

"आणि उद्या सकाळच्या एस्टीनेच निघून मला नागपूर एक्स-प्रेस गाठली पाहिजे, बरं का ?" ती म्हणाली.

"एवढी घाई का ग पण, ताई ?" असा मोनाने लाडिक हट्टाने सवाल केला, तेव्हा तिला जवळ घेऊन तिने हसत उत्तर दिले, "कारण माझी रत्नपरीक्षा आज झालेली असली तरी कॉलेजची एक परीक्षा दोन दिवसांवर आली आहे."

—*—



११ बिपिनच्या बुद्धीला उभे-आडवे रट्टे

दुसऱ्या दिवशी सकाळचा वेळ मंडळींनी शेतावरून अन् नदी-काठावरून मजेने फिरण्यात घालवला. गुरांचा बाजार भरलेला होता, त्यामुळे तीही एक आगळी गंमत या मुंबईकर मुलांना बघायला मिळाली. अंकलनी अन् बिपिनने केलेल्या खास आग्रहा-वरून प्रफुलने आपला मुक्काम एक दिवस वाढवला होता. आज दुपारी बिपिनचे पाकीट खोलले जाणार होते. आणि बिपिनसाठी अक्काने कोणते ताट वाढून ठेवले आहे हे जाणून घेण्याची तिलाही उत्कंठा होतीच.

त्याप्रमाणे दुपारी सर्व मंडळी पुन्हा हॉलमध्ये जमली. अंकलनी गोदरेजच्या लॉकरमधून संथपणे एक पाकीट काढले आणि ते बिपिनपुढे करीत म्हटले, "धिस इज युवर लॉट, बिपिन. विश यू ऑल दि बेस्ट !"

बिपिनने कात्री घेऊन अगदी काळजीपूर्वक त्या पाकिटाची कड कापली अन् हलक्या हाताने आतून कागदाची घडी बाहेर काढली. त्याच्या त्या कृतीकडे सर्व मंडळींचे बारीक लक्ष होते. विजू-मोना तर जणू डोळ्यांत प्राण आणून त्याच्याकडे पाहात होती. बिपिन ती घडी उलडीत असता मोना उतावीळपणे म्हणाली, "हं– वाच, वाच !"

"आयला मोना ! हा तर फास्टर फेणेचा शर्ट आहे !" विजू उद्‌गारला, "बुद्धिबळाचा पट !"

"क्रॉसवर्ड कोडं !"

खरोखरीच ते एक उभ्या-आडव्या शब्दांचे, चौकोनी घरांचे कोडे होते. रिकामी घरे ! पण नुसता चौरस नव्हता अर्थात. त्या बरोबर मजकुराचा एक कागद होता–

कोडचाची गुरुकिल्ली !...

"सूचक विधानं !" बिपिन म्हणाला.

"पत्रच आहे तुझ्यासाठी एक." अंकल म्हणाले, "वाचून बघ."

"वाचतो." बिपिन पुटपुटला. "कारण यातली तरी लिपी शुद्ध बाळबोध आहे. अक्षरही चांगलं आहे– अक्षर मात्र तितूके नीट । नेमस्त पैस काने नीट ! आडव्या मात्रा त्याही नीट– वगैरे."...

दासबोधातले ते सुभाषित उच्चारायला बजरंग तिथे नव्हता. बिपिनच्याच तोंडून ते निघालेले होते. त्याचेही पाठांतर कमी होते

असे समजू नका.

आता तो वाचू लागला–

" बिपिन बच्चा– माझ्या बुकलव्हर भाच्या ! तुझी कीर्ती मी ऐकून आहे (माझी तू ऐकून असशील.) तुझी–माझी तोंडओळख-सुद्धा नाही. तरी पण माझं पत्र वाचल्याबरोबर तू सिंदुर्णीला येशील अशी माझी खात्री आहे. तसा तू चळवळ्या भटकबहाद्दर आहेसच. पण शिवाय रक्ताचं नातं तुला ओढून आणील."

" ब्लड इज थिकर दॅन वॉटर." प्रफुल म्हणाली.

" तू येशील तेव्हा मी बहुधा नसेन. पण तुझ्यासाठीही मी काही ठेवलेलं आहे. तुझ्याबद्दलच्या माझ्या भावना लक्षात घेऊन त्याचा प्रेमाने स्वीकार कर. अर्थात हे बक्षीस तुला बसल्या जागी मिळणार नाही. त्यासाठी तुला एका दिव्यातून जावं लागेल. सोबतचं कोडं हा त्याचा केवळ पूर्व भाग आहे. ही तुझी लेखी परीक्षा आहे. त्यातली प्रत्येक कृती अमलात आणणे हा दुसरा भाग. ती तुझी प्रॅक्टिकल तर आता वाच. आधी संपूर्ण अलग वाच आणि मग एकेका विधानावर विचार कर. उपस्थितांमध्ये तुझ्याहून लहान वयाचे असतील (तसा तू लेकुरवाळा आहेस, एक दोन पोरे तुझ्या नेहमीच काखोटीला असतात म्हणे !) त्यांची मदत घेण्याची तुला परवानगी आहे. मोठ्यांची मदत मात्र नॉट अलौड ! आणि मला वाटतं, तुला ती लागणारही नाही."

पाकिटात असलेल्या एका स्वतंत्र कागदावर ते उभ्या-आडव्या शब्दांचे कोडे होते आणि त्याच्याच खाली सूचक विधाने पत्राच्या मजकुरात गोवलेली होती.

हा मजकूर वाचून त्याची तू अंमलबजावणी करायचीस. (आ) म्हणजे आडवा शब्द आणि (उ) म्हणजे उभा शब्द.

आता वाच हा मजकूर.

'तुझे (१आ) आहे (१आ) दिशेला. ती दिशा तू धर. पण कशी ? मला वाटतं तू अत्यंत विनयपूर्वक पावले टाकावीत. कारण माणूस असा (२उ) माजला की त्याचे पाऊल कसे उलटे पडते याचे उत्तम उदाहरण इथे म्हणजे (२उ) मध्ये आहे. अशा माणसाच्या डोळ्यांवर आलेला असतो (७उ). तोही उलटा ! तू म्हणशील, यात आश्चर्य ते कसले ! धूर नेहमीच खालून वर जात असतो. आमच्या चिरूट-चिरंजीव बंधुराजांना विचार ! ते असो. हा विनोद पुरे. मघा सांगितलेल्या दिशेने तू (३आ) किलोमीटर जा. तिथे तुला हे (४उ) गाव लागेल. गावाचे नावावरून तिथे एखादी 'कला' आहे असे समजू नकोस. गाव आहे ओबडधोबड. पण हे नाव पडण्याला दंतकथेचा आधार आहे. तो असा की विदेह देशच्या जनक राजाचे शेत नांगरले जात असता सीता सापडली ती म्हणे याच ठिकाणी. शेतकऱ्याने लगेच आपले औत वळवून घेतले. तेव्हापासून या भागाला हे नाव पडले असं म्हणे ! एकंदरीतच रामायणाचा इथल्या लोकांवर प्रभाव फार दिसतो. कारण ज्या उंच पहाडाच्या कुशीत गाव वसलेले आहे त्याचे नाव आहे (५उ). राक्षसी उंची नि दहा शिखरे यामुळे त्याला हे नाव अगदी शोभून दिसते. काही अंधश्रद्ध लोक तर या डोंगराच्या पायथ्याशी आले की तिथेच बैठक मारून (६आ) म्हणायला सुरुवात करतात. कारण ? इथून जवळच (८उ) काठी स्मशान आहे आणि तिथे पोरे खाणारी एक (९आ) राहते म्हणे ! पण भिऊ नकोस. तुमच्यासारख्या चंट पोरांना कोण खायला धजणार आहे ? काटेरी झुडुपांपासून तेवढा संभाळ, म्हणजे तुझ्या अंगावर एवढाही (१०आ) उठणार नाही. तू पैशाचा लोभी नसलास तरी

तुला आत्याने ठेवलेला ११(आ) घेतलाच पाहिजे. खरं ना ? तेव्हा नदीचे (११ उ) गाठ. तिथे एक विराट (१५ आ) वृक्ष आहे त्याचे (१७ उ) पकड व वर चढ. खालून वर चढतो आहेस हे लक्षात ठेवून (१६ उ) मीटर मोज. मग थांब. तिथे तू बसलास की बाळगाण्यातल्या 'हंप्टी डंप्टी' सारखा दिसशील आणि तुझ्या पायाशी लोळत असेल डोके तोडून पायांपाशी ठेवलेला बुद्धिबळातला प्रधान ! तिथे तुला एक (१३ आ) लागेल. तीत न भिता हात घाल. आतली (१५ आ) उपसून टाक. मग आत (१८ उ) रूपी हिदुस्थानी 'गोळा' सापडेल. तो आधी वरूनच खालच्या कातळावर फेक आणि मग तू खाली उतर. आपले बक्षीस 'गोळा' कर आणि घरी ये. या वेळी तुझ्या मनाची काय अवस्था झाली असेल, हा साराच उद्योग करताना तुझ्या छातीत काय झाले असेल याची पूर्ण कल्पना मला आहे. वाल्मीकीच्या तोंडून 'मा निषाद' च्या ओळी निघाल्या तशा तुझ्या तोंडून भावनेच्या भरात दोनच का होईना, काव्यपंक्ती स्फुरण्याचा संभव आहे. त्यातल्या नेमक्या शब्दांनी या चौरस कोडचाचा पहिला नि शेवटचा असे दोन्ही खांब तू सजवू शकशील.

"एवढ्याने झाले नाही. तू खुशाल डमडम करीत घरी ये आणि तुझे सहा शब्दाचे ते काव्य– कसरतीचे ते दोन मल्लखांब– घरी आल्यावर अंकलना दाखव. त्यांनी ते पसंत केले म्हणजे मगच तुझ्या बक्षिसावर अखेरचे शिक्कामोर्तब होईल !"

कोडचाची विधाने इतकी अजब होती की बिपिन अवाक् होऊन काही क्षण विजू-मोनांकडे पाहात राहिला. त्या दोन पोरांची तोंडे तर वासलेलीच होती.

थोड्या वेळाने मोना म्हणाली, "बिपिनबाबू, मला तर या

चौकोनाकडे पाहात राहावंसं वाटतं. कसा रांगोळी घातल्यासारखा चौकोन आहे ! नाही तर उभ्या–आडव्या शब्दांची कोडी पुष्कळ असतात. पण त्यांना काही आकार नसतो... म्हणजे..."

"शाबास ! आलं माझ्या लक्षात तुला काय म्हणायचंय ते. ते विस्कळित वाटेल तसे रचलेले चौकोन असतात, हे कसं व्यवस्थित आर्टिस्टिक कोडं आहे. यात काळचा घरांचं कसं स्वस्तिक तयार झालंय ते बघ. अशी कोडी तयार करणं सोपं काम नाही. त्याला हुशारी लागते."

"ही नक्की अंकलची हुशारी आहे." विजू म्हणाला आणि त्याने अंकलकडे पाहिले.

अंकलसाहेबांचा एक डोळा बारीक झाला होता.

पण अंकलनी जितक्या हुशारीने ते कोडे तयार केले होते, 'उस्सेभी जादा' हुशारी दाखवून ते सोडवणे आता विपिनला भाग होते. तेव्हा–

१२ बहुतेक कोडे सुटले. पण...???

बिपिन आता त्या कोडचाकडे वळला. पण विजू-मोनांनी आधीच त्याचा कबजा घेतला होता आणि त्यांचे त्यावर विचार-मंथन सुरू होते.

"तुझं 'हे' म्हणे या दिशेला आहे!" विजूचे डोळे हास्याने फुलले. "दोन्ही अर्थी एकच शब्द. काय असेल उत्तर याचं? मोना, ओळखलंस?"

आणि मोनाने जेव्हा त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले तेव्हा विजूने आपलाही सूर त्यात मिसळून दिला. हो! नाही तर आपल्याला सुचलं असूनही श्रेय तिला एकटीला दिलं जाईल!

"उत्तर."

"बरोबर. उत्तर हेच याचं उत्तर." बिपिन म्हणाला. "माझं उत्तर आहे उत्तर दिशेला."

"ठीक आहे. मग ते मिळवायला तू तिकडे जायचंस," मोना म्हणाली. "पण विनयपूर्वक पावलं टाकीत. माजल्यासारखा जाऊ नकोस."

"माजल्यासारखा ?" बिपिनने डोळे वटारले. "मी कधी तरी माजल्यासारखा वागलो आहे का ?"

"नाही. तसा कधी कधी गुरकावतोस आमच्यावर वाघासारखा."

"निदान रेड्यासारखा– पण जाऊ द्या. त्याला कुणी माजणं म्हणणार नाही."

"उलट तुम्हीच माजून मला त्रास देत असता."

"मुळीच नाही. शब्द मागे घे !"

त्यांचा संवाद चालू असताना मोठ्या माणसांपैकी कुणीही मधे पडत नव्हते. त्यांची शब्दांची फेकाफेक ऐकण्यातच त्यांना गंमत वाटत होती. बाबासाहेबदेखील संथपणे चिरूट फुंकीत बसले होते. तात्यांची मिशी या विनोदामुळे फुरफुरत असली तरी तेही कसला तरी हिशेब मांडण्यात गर्क झाले होते. अंकलनी हाताची घडी घालून तोंडावर हात ठेवला होता. पण आता मात्र ते मध्ये पडले– "ऑर्डर ! ऑर्डर ! गुद्द्यांवर येऊ नका. मुद्द्यांकडे वळा !"

"मुद्दा अजूनही माजलेल्या माणसाचाच आहे." बिपिन म्हणाला आणि त्याने पुन्हा विजू-मोनावर डोळे वटारले. "पण तो माणूस मी नाही. आत्याच्या कोड्यातला माणूस आहे तो. त्याचं पाऊल म्हणे उलटं पडतं– म्हणजे काय ? काय ?"

"उलटे पाय भुताचे असतात. माजलेला माणूस भूत बनतो असं आत्याचं म्हणणं आहे काय ?"

"नाही." बिपिन विचार करीत म्हणाला. "तसं नसावं. मला वाटतं, २ उ मध्ये 'माजलेला माणूस' या अर्थी शब्द बसवायचा आहे. असा शब्द कोणता ?"

"माजलेला म्हणजे 'उन्मत्त.'" विजू म्हणाला. "पण तो

तीन-अक्षरी शब्द आहे. आपल्याला दोन-अक्षरी हवा."

"उन्मत्त कशाला ?" मोनाने सुचवले. "नुसतं मत्त म्हणा की !"

"मोना इज राइट !" विपिन म्हणाला. "आता या 'मत्त'चं पाऊल उलटं पडतं, म्हणजे काय होतं ?"

"शब्दच उलटा करायचा ?"

"करेक्ट !" 'मत्त' शब्द उलटा करून लिहायचा. म्हणजे तो कसा दिसेल ?– त्त म !"

यावर मोनाने शेरा मारला– "उत्तम ! पुढे ?"

"पुढे– डोळ्यांवर काय आलेलं असतं ?"

"झोप." प्रफुल्ला जांभई देत म्हणाली. "पण ती माझ्या. मत्त माणसाच्या डोळ्यांवर आलेला असतो कशाचा तरी–"

विजूने बाबासाहेबांकडे पाहिले. ते एक भपकारा सोडीत होते. विजू एकदम म्हणाला, "धू–र !"

"बरोबर. पण तोही खालून वर आलेला आहे. म्हणजे ७ उ मध्ये भरायचं–"

"रधू." मोना.

"आता तीन आडवा. उत्तर दिशेला किती कि. मी. जायचं, ते या शब्दावरून कळणार. तीन-अक्षरी शब्द आहे. म्हणजे अकरा-अठरा-पंधरा-बावीस-तेवीस किंवा नव्वद-शंभर सुद्धा इथे घालता येतील."

"पण कितीही त्रास द्यायचा म्हटलं तरी आत्या मला नव्वद-शंभर किलोमीटर चालायला लावणार नाही. तो शब्द जास्तीत जास्त पंधरा एक कि. मी. असेल."

"आणि तितकं अंतर चालून गेल्यावर उंच डोंगराच्या पायथ्याशी

गाव लागतो म्हणे. मघाशी आम्ही ती डोंगराची रांग पाहिली. सिंदुर्णीपासून अकरा किंवा पंधरा कि. मी. वरच असेल ती. नव्वद-शंभर तर नाहीच, पण बावीस-तेवीसदेखील नाही. पण नक्की किती आहे हे मला मग कळेल. ४ उ आणि ५ उ काढल्यावर." मोना म्हणाली.

"४ उ हे चार-अक्षरी गावाचं नाव आहे– छचॅः ! हा शब्द देखील तसा कळणार नाही. ९ आ आणि १० आ चा शोध लागल्याखेरीज."

"कुणाही सिंदुर्णीकराला विचारलं तर पत्ता लागेल त्या गावाचा."

"पण विचारायचं नाही. आपणच शोधून काढायचं आहे. असं पाहा की या गावाच्या नावातच कला आहे असं आत्या म्हणते. जर पहिली दोन अक्षरंच क–ला असतील तर फक्त पुढची दोन अक्षरं शोधायची. आणि पहिली अक्षरं जर क–ला असतील तर ३ आ त मधलं अक्षर क येतं. म्हणजे अकरा कि. मी. हेच खरं असावं."

"बहोत अच्छा !" विजू म्हणाला. "आता ५ चं सूचक विधान काय आहे ? एका डोंगराचं नाव आहे ते. डोंगर कसा ? तर राक्षसी उंचीचा. दहा शिखरंवाला. त्याला हे नाव शोभतं म्हणे."

"राक्षसी डोंगरी–" मोना विचार करीत म्हणाली. "आणि दहा शिखरांचा म्हणजे दहा डोक्यांचा राक्षस असं तर सुचवायचं नसेल आत्याला ?"

"तोच– तोच, मोना !" विजू ओरडला. "रा पहिलं अक्षर आहे ना ? मग रा-व-ण."

"रावण इज राइट !" प्रफुल्ला, बिपिन नि मोना एकसुरात म्हणाली. "दहा तोंडाच्या रावणाला आम्ही एकमुखाने निवडून देतो." अशी मोनाने पुष्टी जोडली.

"पण त्यामुळे ९ आ मध्ये शब्द आला ला–व. त्याचा अर्थ जर बरोबर लागत असेल तर आपण घातलेला कला शब्द बरोबर होता असं होईल. नाही तर तो बदलावा लागेल."

"पाहू बरं." प्रफुल्ला म्हणाली. "९ आ चं विधान आहे पोरं खाणारी. पोरं खाणारी ? बाप रे ! 'लाव' म्हणजे पोरं खाणारी ? बिपिन, जरा डिक्शनरी लाव !"

"कोश पाहिलेला चालतो ना, अंकल ?" बिपिनने विचारले. "अरे, गेले कुठे अंकल ?"

"त्यांच्याऐवजी मी सांगतो. खुशाल पाहा. तुम्ही कोश चाळावेत म्हणून तर अक्कांनी एवढा खटाटोप केला !" तात्यांनी ग्वाही दिली.

"पण प्रफुल–" बिपिन म्हणाला, "या शब्दासाठी कोश पाहण्याची गरज नाही. लाव म्हणजे 'पोरं खाणारी हडळ.' हे मी वाचलेलं आहे."

"बाप रे ! कसली रे ही आत्या तुझी, बिपिनबाबू ?" मोना उद्गारली. "तिने हडळीलासुद्धा बोलावणं केलं."

हशाचा एक कल्लोळ उठला. तो ओसरल्यावर विजू म्हणाला, "पण आता अकरा शब्द फिट्ट बसला. तो बदलायला नको. बरं का बिपिनबाबू, तुला सिंदुर्णीच्या उत्तरेला अकरा किलोमीटर जायचं आहे."

"त्याला एकट्याला नाही, आपण जाऊ की त्याला साथ द्यायला."

"अकरा कि. मी ? ओ माय ! आमि आशिबो ना !"

"नको येऊस." आपल्याला बंगाली येते असे दाखवीत मोना म्हणाली, "पण आम्ही जाऊ. विपिनबाबू, एक राह्यलं रे ! ६ आ नि ७ उ."

"६ आ ला फारसा अर्थ नसावा. लोक त्या पहाडाचं रूप पाहून घाबरतात आणि 'हे' म्हणजे ६ आ म्हणतात म्हणे. भुताबिताला भ्यालेले लोक काय म्हणतात ?"

"रामरक्षा !"

"वा ! इथे दुसरं अक्षर म आहेच. पहिलं रा घातलं की रा–म तयार झाला, पण तिसरंही अक्षर आधीपासूनच तयार आहे, आणि ते धू आहे. तेव्हा रामरक्षा जेहेत्ते चालणार नाही. इथे हवं रा–म–धू–"

"न ! रामधून !"

"बरोबर. रामधून. 'राम' नावाचा जप. चपखल बसला हा शब्द. आता ८ उ. पहिलं अक्षर आलं न. दुसरं अक्षर दी असणार हे उघड आहे. कारण नदीकाठी स्मशान आहे. आता १० आ म्हणजे वण हे कोणीही सांगेल. काटेरी झुडपांपासून जप, म्हणजे अंगावर वण उठणार नाही."

"करेक्ट ! म्हणजे गावाचं जे ४ उ नाव आहे त्याची पहिली तीन अक्षरं झाली क–ला–व–"

"मग चौथं अक्षर ती असणार– कलावती. कलावती गाव ? असेलही. पण पुन्हा विचार कर या विधानाचा. जमीन नांगरताना इथे सीता सापडली. लगेच औत वळवून घेतला !– हीच वेळ आहे कोश चाळण्याची !"

"दात्यांचा शब्दकोश आहे तिथे." तात्या म्हणाले. "सहा खंड आहेत."

लगेच विपिनने जाऊन तिसरा खंड काढला 'औ' ते 'खा'चा, आणि त्याची पाने चाळली. "क–क–कला–कलावत. एक प्रकारचे गाणे. कलावती–नर्तकी, नायकीण. आणखी खाली गेलं की– कलावनी– याचा अर्थ पाहिलास, विज्या ?"

"कलावनी– औत वळवण्याची जागा ! 'लगेच औत वळवून घेतला'ची मख्खी आता कळली ! विपिनबाबू, या गावाचं नाव कलावनी असणार, शंकाच नाही !"

"इट इज डेड राइट !" प्रफुल्ला म्हणाली.

"ओ के आलो आपण कलावनी गावात–"

"तिथल्या नदीवर आलो. आता पुढचं बघा. ११ आ– तू पैशाचा लोभी नसलास तरी तुला आत्याने ठेवलेला– ठेवलेला काय ? अर्थात पै–सा. कारण ११ आ ची सुरवात पै ने होते आहे."

"ती कशी ?"

"कारण नदीचं हे चार-अक्षरी ११ उ गाठ असं म्हणते. म्हणजे ११ उ चा शब्द पै–ल–ती–र आहे."

"पैलतीरावर गेलास की काय करशील, बिपिनबाबू ? तिथे एक १६ आ चा विराट वृक्ष आहे. चार-अक्षरी विराट वृक्ष कोणता ?"

"वटवृक्ष. तो नेहमीच विराट असतो."

पण पुढे होते की, 'या वृक्षाचं १७ उ पकडायचं.' ट ने सुरू होणार काय पकडायचं ?

"बराच वेळ ही पोरे त्या 'वटा' भोवती घोटाळत होती, पण त्याला जोडून असलेले दुसरे शब्द जमेनात तेव्हा त्यांना तो वडावरच्या सूरपारंब्याचा नाद सोडावा लागला.

"वटवृक्ष इथे बसत नाही." विपिनने आपले निकाली मत दिले. "औदुंबर ट्राय कर."

आणि औदुंबरला ट्रायल देताच तो बसला की ! चांगला पाय पसरून बसला.

"१६ आ वाल्या या औदुंबराचं आता १७ उ पकडायचं. म्हणजे या दोन अक्षरी 'सतरा–उ'चा अर्थ फांदीबिंदी असणार."

"दुंग–दुंब–दुंट– काय असेल बरं ?"

"हा नेहमीच्या वापरातला शब्द दिसत नाही. कोश पाहू या."

कोशाची पाने उलटली गेली आणि शब्द निघाला 'दुंड.' दुंड म्हणजे झाडाचे खोड !

"व्हेरी गुड !" विजू एक उडी मारून म्हणाला. "आता हे दुंड म्हणजे खोड धरून वर चढायचं १६ उ वर. म्हणजे खालून वर उलटं वाचायचं. किती चढायचं ? तर औ– पुढचं अक्षर– कळत नाही, इतके मीटर. पण औनंतरचं अक्षर काय ? आपण बुवा औट !"

"शब्द सुचूनही तू औट. कारण तुम्हाला औटकी येत नाही. औट म्हणजे साडेतीन." विपिनने सांगितले.

"खरंच की ! औट घटकेचा राजा ! म्हणजे साडेतीन मीटर वर चढायचं. चढलो. पुढे ?"

"पुढे तू तिथे चढून बसलास की– 'हंप्टी डंप्टी' सारखा दिसशील."

"हंप्टी डंप्टी सॅट ऑन ए वॉल." मोना गुणगुणली. "पण हंप्टी डंप्टीसारखा दिसशील म्हणजे काय ?"

"ते जाऊ दे. पुढे वाच."

"तिथे तुला एक १३ आ लागेल. दोन अक्षरी. तीत हात घाल."

"'तीत हात घाल' म्हणजे ढोली असणार. पण इथे दुसरं अक्षरं 'ली' नाही. 'ल' लागलेलं आहे."

"ढो–ल स्त्रीलिंगी शब्द." बिपिनने कोश पाहून सांगितले. "ढोल काय, ढोली काय, अर्थ एकच."

म्हणजे हंप्टी डंप्टीच्या जागेवर पहिलं 'ढो' आलं. बिपिनने एकदम वडिलांकडे पाहिले अन् तो मोठ्याने हसला. बाबासाहेबांचे धुरात गुरफटलेले ओठही हसत होते.

१ उ	२ त	२		३ अ	४ क	५ वा
६ रा	म	७ धू	८ न		९ ला	व
			दी		१० व	ण
	११ पै	सा		१२ रा	नी	
१३ ढो	ल		ट			१४
१५ मा	ती		१६ औ	१७ दुं	१८ ब	२
१९ जी	२	व		२० ड		

"आठवलं बाबा मला ! 'हंप्टी डंप्टी सॅट ऑन ए वॉल'चं मराठी रूपांतर एका मासिकात आलेलं तुम्ही मला शिकवलं होतं. तुम्ही सगळी लहानपणी म्हणत होतात ते गाणं. 'भिताडा-

वरि उंच बैसला दोंदिल ढोमाजी !' म्हणजे १३ उ आहे ढो–मा–जी.''

विजू–मोनांना हा खुलासा ऐकून फारच गंमत वाटली. मोनाने तर लगेच मान डोलवीत म्हटले, ''वरं आहे, ढोमाजी ! पुढे काय करताय तुम्ही ? तुमच्या पायांपाशी लोळतोय म्हणे डोकं तोडून पायांवर १९ आत ठेवलेला बुद्धिबळातला प्रधान-वजीर ! जी र व.''

''गुड ! आता ढोलीत हात घाल– घातला ! आता म्हणे आतली १५ आ उपसून टाक.''

''आपली १५ आ आधीच साचलेली आहे– माती. ती उपसून टाक.''

''टाकली.''

''पुढे तुला १८ उ रूपी 'हिंदुस्तानी गोळा' सापडेल. हा कसला बुवा हिंदुस्तानी गोळा ?''

कोडे तिथेच थबकले. कारण त्यानंतर दोन तास उलटले तरी तो 'ब' पासून होणारा हिंदुस्तानी गोळा कोणाला सापडला नाही !

हत्ती गेला, शेपूट तेवढे वळवळत राहिले.

१३ कलावनी गावी भलतीच कलाटणी !

"मला वाटतं, झालं एवढं बस्स झालं !" विपिन जरा उतावीळपणे म्हणाला. आणि तात्यांनी कपाळावर आठ्या चढवलेल्या पाहून लगेच पुढे म्हणतो, "नाही– म्हणजे कोडं संपूर्ण सोडवूच आपण. बहुतेक सगळं सोडवलं आहेच की. पण आता बुवा आपल्याला कळ निघत नाही. केव्हा एकदा या उत्तरेकडच्या मोहिमेवर निघतो आणि त्या ढोलीत हात घालतो असं झालंय.

तेव्हा मी म्हणतो, आत्ताच स्टार्ट घ्यावा. ताजी हवा मिळाली की आपसूक मेंदू चालेल अन् ती उरलेली घरंही भरता येतील."

"तसं करा." तात्या म्हणाले, "आमची हरकत नाही. तीन वाजले आहेत ना ?"

"अकरा किलोमीटर जायचं म्हणजे आपल्याला निघायलाच हवं." विजू गडबडीने म्हणाला.

"आपण ? म्हणजे तू– तुम्ही पण येणार की काय ?"

"अर्थात !" मोना म्हणाली.

"आम्ही काही इथे घरात बसून राहायला आलो नाही. तुला डोंगळ्यासारखे चिकटणार आम्ही !"

बाबासाहेबांनी चिरुटावर टिचकी मारली. "यत्र यत्र बिपिन: तत्र तत्र विजू–मोना." ते म्हणाले. "पण पोरांनो, तुमच्याने एवढं चालवेल का ?"

"चालण्याचा विचार नव्हताच माझा." बिपिन म्हणाला. "तात्यांची सायकल घेऊन जाणार होतो. पण ट्रिपल सीट घेऊन जायची काही आपली तयारी नाही. या कटकटी कुणी कराव्यात ?"

"कटकटी नकोत तर फटफटी घ्या." तात्या म्हणाले. "अंकलनी आपली मोटरसायकल आणलेली आहे इथे. तू चालवू शकतोस ना, बिपिन ?"

"विथ प्लेझर !" बिपिन म्हणाला. "ही फार मोठी सोय झाली. मग या दोन्ही पोरांचे बोजे मी सहज नेऊ शकेन."

"बोजे म्हणतोस काय आम्हाला ?" विजू फुरंगटला. "आमची मदत नकोय का रे तुला ?"

"असं मुळीच नाही रे, राजा !" बिपिनने त्याला जवळ

ओढीत म्हटले. "चलो, लेटस स्टार्ट ! पण अंकल कुठे गेले ?"

"ते मधाशीच गेलेत. कुणी तरी बोलवायला आलं होतं." तात्या म्हणाले,

"'मो. सा.' वरून जायचं, मग एवढी घाई करण्याचं कारण नाही. चांगले खाऊन पिऊन निघा. सगुणाबाईंना पोहे करायला सांगतो."

त्याप्रमाणे कांदापोहेखान अन् चहापान झाले तरी अंकलचा पत्ता नव्हता. पण तात्या म्हणाले, "त्यांच्या वतीने मी तुम्हाला परवानगी देतो. तुम्ही खुशाल निघा. ही घ्या मोटरसायकलची चावी."

लवकरच ही त्रयी फटफटीवर स्वार होऊन उत्तरेवर स्वारी करायला निघाली.

"नीट बसा रे पोरांनो !" बिपिनने बजावले, "विज्या, मला घट्ट कवटाळून बैस आणि मोना, तू विज्याला पकड. माकडी कशी आपल्या पोराला धरते तशी. मी घोडी जोरात पिटाळणार आहे. वाटेत तुमची बोचकी पडली बिडली तर मला पत्ता लागेपर्यंत दोन कि. मी. अंतर मागे पडलेलं असेल."

"बोचकी म्हणू नकोस. आम्हाला डोचकी आहेत." मोना.

"तू आमची काळजी करू नकोस." विजूने गॅरंटी दिली– "सांगितलं ना ? आम्ही डोंगळे आहोत !"

घोडीच्या कमरेत किक् बसली, तसा बराच फुरफुराट करून तिने स्टार्ट घेतला.

दूर अंतरावर धिप्पाड डोंगर दिसत होता. बैलगाडीचा रखरखीत अन् खडखडीत रस्ता. धूळ भरपूर. धोकादायक नसली तरी धक्कादायक वाट. सावलीचे नाव नाही. दोन्ही बाजूंना झाडे

कसली ? तर शेराची नि बाभळीची !

पण टकाक् टकाक् उडचा मारीत 'राजदूत' आपल्या मोहिमेवर निघाली होती.

"काय मजा वाटते, नाही ?" मोना आपले हुळहुळणारे केस एका हाताने मागे सारीत म्हणाली.

"हात सोडू नकोस, मोना. केस उडाले तर उडू देत !" आणि हे बोलताना बिजूच सीटवर बसल्या बसल्या उडाला.

आता वारा कमी झाला होता. अन् रखरखही संपली होती. दुतर्फा हिरवीगार झाडी लागली होती.

समोरून मोटारीचा आवाज झाला. –"अरे वा ! ही तर एस्टी दिसतेय ! एस्टीचा पण फाटा आहे वाटतं इथे ?"

आणि ते धूड जवळ यायला लागले तशी बिपिनने मोटार-सायकल रस्त्याच्या कडेला उभी केली.

एस्टी बेधडक यांना मागे टाकून सिंदुर्णीच्या दिशेला निघून गेली. जाता जाता तिने यांच्या डोळ्यांत चिक्कार धूळफेक केली. आणि तरी बिपिनने तिच्या पाटीवरची 'सिंदुर्णी : मार्गे कलावनी' ही पाटी वाचली होती.

"कलावनी !" तो उद्गारला. "म्हणजे गावाचं नाव तर बरोबर आहे आपलं !" पुन्हा त्याने घोडीला लाथ हाणली अन् हे प्रवासी पुढे निघाले.

लवकरच उजवीकडे गावची वस्ती दिसायला लागली. डोंगराच्या पायथ्याशी वडांच्या नि चिंचेच्या झाडांच्या गराड्यात वसलेला तो गाव मोठा छान वाटत होता.

"पण आपल्याला गावात जायचं नाहीय." बिपिन म्हणाला. "तिकडे त्या बाजूला उतार दिसतोय. पलीकडे नदीचं पात्रही

दिसतंय. तेव्हा या डावीकडच्या वाटेने जाऊ या आपण."

अरुंद पायवाट होती ती.

"फटफटी नेता येईल या वाटेने ?"

"जितकी नेता येईल तितकी नेऊ. पुढचे पुढे."

"फार पुढे शक्यच नाही नेणं. कारण आपल्याला नदीचं पैलतीर गाठायचं आहे."

त्या वाटेने दोनशे अडीचशे मीटर आत गेल्यावर झाडी संपली. नदीचे मोकळे तीर दिसायला लागले. हीच नदी वाकडी वळणे घेऊन पुढे सिंदुर्णीत शिरली होती. पलीकडे दहा शिखरांचा तो प्रचंड पहाड पाय फाकटून उभा होता.

"रावण वाटतो खरा !" मोना पुटपुटली.

बिपिनने राजदूत झाडीत एका वृक्षालगत उभी केली, तिला कुलूप लावले अन् मुलांना घेऊन तो नदीच्या पात्रात उतरला. पाणी तसे बरेच असले तरी आत उड्या मारण्याजोगे कातळ होते. त्यामुळे पैलतीर गाठणे कठीण जाणार नव्हते. काही माणसे नदीवर पाणी भरीत होती. खालच्या बाजूस म्हशींना आंघोळ घालणे सुरू होते. वाळूवर पोरे खेळत होती.

बिपिनने आधी पलीकडच्या तीरावरून नजर फिरवली.

"तो विराट औदुंबर वृक्ष दिसतो का पाहा रे, विज्या !"

"झाडंच झाडं आहेत. त्यात उंबराची कोणती नि वडाची कोणती हेही कळत नाही."

"कारण तुम्हाला दोहोतला फरक कळत नाही !" बिपिन म्हणाला. "पण चला, आधी 'पैलतीर' गाठू या. मग शोधता येईल आपला औदुंबर. खडकांवरून नीट उड्या मारा. बरं का रे !"

उडचा मारण्यात पोरे तरबेज होती. पण मध्येच एका कातळावर जेव्हा विजूचे पाऊल थबकले तेव्हा मागून आलेली मोना धाडकन त्याच्या अंगावर आदळली.

"काय हे विज्या– उभा काय राहचलास ठुल्यासारखा ?"

"ते बघ काय आहे ?" विजूने बोट दाखवले.

"चिता जळते आहे." विपिन म्हणाला. "स्मशान असणार ते. नदी ओलांडल्यावर आपल्याला त्याच बाजूला जायचंय."

"बाप रे ! ती पोरं खाणारी लाव नसेल ना रे तिथे बसलेली ?"

विपिन खदखदून हसला. "तुम्ही काळजी करू नका." तो म्हणाला. "तुमच्यासारख्या चंट पोरांच्या वाटेला कोणतीही लाव जाणार नाही, अशी आत्यानेच हमी दिली आहे ना ?"

गाठले त्यांनी पैलतीर. या ठिकाणी तुरळक मोठमोठी झाडे होती. ती बहुतेक वडा–पिंपळाचीच होती. पण डावीकडे स्मशानाच्या दिशेने त्यांनी पावले वळवली मात्र–

"तो तर नसेल ना आपला विराट वृक्ष ?" विजू उद्‌गारला.

"गावठी अंजीर लागलेत त्याला. उंबराचंच झाड आहे ते." मोना तिकडे पाहात म्हणाली.

"बरोबर, तेच झाड असणार आपलं." विपिन म्हणाला आणि त्या झाडाकडे आपला मोर्चा वळवला. खाली वाळक्या पानांचा नि किडक्या उंबरांचा सडा पडला होता. तो तुडवीत विजू–मोना विपिनच्या आधी त्या वृक्षाखाली जाऊन पोचले. विजू वर पाहात म्हणाला, "किती कावळे काव काव करताहेत शेंड्यावर बसून !"

"थोड्या वेळाने वटवाघळं पण येतील लोंबायला." मोना

म्हणाली. "आता हे झाड पकडायचं ना रे, विपिनबाबू ?"

"हो. याचं दंड म्हणजे खोड पकडायचं आणि साडेतीन मीटर वर चढायचं." विपिन वर पाहात म्हणाला.

"माझी उंची सव्वा मीटर आहे." विजू म्हणाला आणि मोनाने दुजोरा दिला, "माझी पण."

"हो, पण तुम्ही एकमेकांच्या डोक्यावर उभं राहण्याची जरूर नाही. मला इथूनच ती जाड फांदी दिसते आहे. तिथेच असणार ती ढोली. मी जातो वर. तुम्ही इथेच थांबा."

खोड दोन्ही हातांनी घट्ट कवटाळून विपिन वर वेंघला. विजू नि मोना बघताहेत तो त्याने ती फांदी गाठलीसुद्धा.

"आहे बरं का ढोली !" त्याने तिथून घोषणा केली.

"मग तीत जपून हात घाल." विजू. "आत्यानेच लिहिलंय तसं."

"आणि आत माती असली तर ती उपसून टाक." मोना.

मोनाची ही सूचना पुरी होण्याच्या आतच तिच्या नि विजूच्या डोक्यांवर मातीची बरसात झाली. विपिनने ढोलीत घातलेला हात बाहेर काढला तेव्हा त्याच्या हातात नारळाएवढा चॉकलेटी रंगाचा गोळा होता.

"ओ: !" मोना म्हणाली. "हाच का तो हिंदुस्तानी गोळा ?"

"बाजूला व्हा. आत्याने सांगितल्याप्रमाणे मी तो खालच्या कातळावर टाकणार आहे."

"ए ! बाँबबिंब तर नसेल ?" अशी विजू शंका काढतो आहे तोच विपिनने गोळा खाली सोडला होता. कातळावर आपटताच एक लहानसा आवाज होऊन त्याच्या खापराचे तुकडे झाले आणि आतून धूर निघू लागला.

"खराच बाँब आहे." विजू म्हणाला.

"पण दिवाळीतला फुसका बाँब." मोना म्हणाली. "आतून काय काय निघालंय ते पाहू."

विपिन झाडावरून उतरला होता. त्याला मोना म्हणाली, "त्या बाँबमध्येच तुझा खजिना असणार, बिपिनबाबू. तुझी आत्या काय वाटेल ते करील."

तिघांनी ते खापराचे तुकडे अन् त्यांतून बाहेर पडलेला मसाला तपासून पाहिला. नुसती रेती अन् आता विझून निकामी झालेली दिवाळीच्या दारूची राख त्यात होती. नाही म्हणायला विजूला काहीतरी सापडले– एक बारीकसे नाणे.

"पैसा !" विजू मिस्किलपणे म्हणाला. "आत्याने तुला पैसा ठेवलाय ना– तोच हा ! भोकवाला नवा पैसा." आत्याच्या या ताज्या खटचाळपणाने बिपिनलाही हसू आले. पण मोना दुसरेच काहीतरी उचलीत होती.

"आमच्या गोपाळ गडचाच्या चंचीत असते तसली चुन्याची डबी !" ती म्हणाली.

"उघडून बघ." विजू म्हणाला. "प्रफुलताईसाठी आत्याने कुडचा ठेवल्या होत्या. तशी तुझ्यासाठी एखादी अंगठी नसेल ना ठेवलेली यात ?"

डबीचे झाकण घट्ट लावलेले होते. खिशातला चाकू काढून विपिनने ते उघडले. आत कागदाची एक सुरळी होती. ती तो उलगडीत असताना विजू-मोना उत्कंठेने त्याच्याकडे पाहात उभी होती.

कागदावर जो मजकूर लिहिलेला होता तो वाचीत असताना विपिनचा चेहरा असा पडलाय– असा पडलाय–

"काय लिहिलंय रे, बिपिनबाबू ?" विजू-मोनांनी एका सुरात विचारले.

"वाचा."

"हात्तिच्या !"

"बाप रे !"

"सारंच मुसळ केरात."

"वरसोव्याच्या बंगल्यात !"

कागदातला मजकूर असा होता– "बहादूर बच्चा ! सॉरी हं. तुला मी इथे पैसा ठेवलाय खरा, पण तुझं खरं बक्षीस इथे नाही. मुंबईला वरसोव्याला समुद्रकाठी माझा बंगला आहे. नं. ६ बीच रोड. त्याची चावी तुला अंकल देतील. त्या बंगल्यावर तू इथून निघाल्यावर दुसऱ्या दिवशी मध्यरात्री बरोबर बाराच्या ठोक्याला पोच. म्हणजे तुझं बक्षीस तुला मिळेल. काही झालं तरी आत्याच्या शुभेच्छा जन्मभर तुझ्या पाठीशी आहेत !"

"म्हणजे पाहा हो !" मोना म्हणाली. "बक्षीस जर मुंबईला आहे, तर इथपर्यंत कशाला पायपीट करायला लावली ?"

"त्याशिवाय आत्याच्या खटचाळ आत्म्याला स्वर्गात चैन कसं पसलं असतं ?" बिपिन तोंड वाकडे करीत म्हणाला.

"आणि मुंबईत मध्यरात्रीची ती वारी करून तरी तुझ्या पदरात काय पडणार आहे कुणास ठाऊक !" विजू.

"जन्मभराच्या शुभेच्छा !" मोना.

"मला त्या पुरेशा आहेत." बिपिन जरा रागातच म्हणाला. "द्रव्याचा हव्यास चांगला नाही."

"ते सगळं ठीक आहे, पण आत्याने तुझी चांगलीच फिरकी घेतलीन् की !"

"हो ना ! रावण काय, स्मशान काय, लाव काय–"

"ढोली काय– सारंच उरात धडकी भरवणारं !" मोना म्हणाली.

"उरात धडकी ! यू गॉट इट !" बिपिन ओरडला. आणि त्याने तो खिशातला कोड्याचा कागद बाहेर काढला. पेनही काढले. त्या चौकोनातले १ उ आणि १४ उ भरायचे राहिले होते ना ? ते त्याने आता भरले. १ उ : उ– रा– त आणि १४ उ : फि– र– की. उरात भरली धडकी, आत्याने घेतली फिरकी.

"आता फक्त १८ उ आणि २० आ राह्यलेत." तो म्हणाला. "१८ उ हिंदुस्तानी गोळा– गोळा म्हणजे बाँबगोळा होता हे झालंच."

"पण हिंदुस्तानी का म्हणून ?" मोना.

"हिंदुस्तानीत बाँबला काय म्हणतात, बिपिनबाबू ?"

"बाँबच. फार तर बम."

"मग बम बरोबर आहे. औदुंबरातलं 'ब' हे पहिलं अक्षर आहेच."

"१४ उ म्हणजे आत्याची फिरकी. म्हणजे उरलं सुरलं २० आ झालं : ड– म– की. डमकी म्हणजे काय ?

"ते घरी गेल्यावर कोशात पाहू. पण कोडं सुटलंय एवढं खरं."

"हाती जरी भोपळा आला असला तरी !"

"चला, आता घरी जाऊ या आपली काळवंडलेली तोंडं घेऊन."

"हो ना ! आत्याने चांगलाच पचका केला आपला !"

तिघेही पुन्हा नदीवर आली. उडचा मारीत पार केलेले नदीचे

पात्र त्यांनी आता संथपणे जड पावलांनी ओलांडले. आणि जिथें मो. सा. ठेवलेली होती तिकडे तिघेही गेले.

आणि तिथे त्यांना आणखी एक धसका बसला. कारण मोटर-सायकल जागेवर नव्हती !

बिपिन इतका घाबरला की काही क्षण त्याची वाचाच बसल्या-सारखी झाली.

"इथेच. नाही तर कुठे ? हेच ते झाड, मला नक्की आठवतं."

"ही काय टायरची खूण दिसतेय."

"पण मग– गेली कुठे ती ?"

"आपण होऊन थोडीच जाणार आहे ? कुणी तरी नेली !"

चोरी ! मोटरसायकलची चोरी ! आणि तीही परक्याची

मोटरसायकल ! अंकल काय म्हणतील आता ? त्यांना तोंड कसं दाखवायचं ?

बिपिनच्या उरात धडधड होत होती. त्याला काय करावं हे सुचत नव्हते. विजू–मोना बावचळल्यासारखी बघत होती. मग त्यांनी उगाच इकडे-तिकडे पाहिल्यासारखे केले. पण मो. सा. अशी थोडीच सापडणार होती ? इथली उचलून दुसरीकडे ठेवील कुणी ? हे काही मुंबईसारखं शहर नव्हतं, की इथे ठेवायची नाही, तिथे ठेवायची नाही. नो पार्किंग ! इथे थोडाच पोलिस तुमचा नंबर घेणार होता ?

"नक्कीच कुणीतरी चोरली !" बिपिन पुटपुटला. त्याचा आवाज कापरा येत होता. अन् चेहऱ्यावर घामाचे ठिपके उभे राहिले होते.

"आता काय करायचं रे, बिपिनबाबू ?" विजूच्या या प्रश्नाने तो ताळ्यावर आला अन् म्हणाला, "गावात जाऊ या. पोलिसांत वर्दी देऊ. दुसरं काय करणार आपण ? नुसती धावाधाव करण्यात काही अर्थ नाही. चोर पळाला तो सापडण्यासाठी नाही."

कलावनी गावात जाताना तिघांची पावले अशी पडत होती की त्यात जणू शिसे भरले आहे ! वाटेत विजू–मोना अन् बिपिन-सुद्धा भिरभिरल्या नजरेने आसपास पाहात होती. उगाच चोरीचा माल घेऊन चोर तिथे बसला असेल अशी का त्यांची कल्पना होती ?

अंकल हसबनीस– की सबनीस ?– अल्पावधीत साऱ्या परिसराला माहीत झाले होते असे दिसले. कारण पोलिस पाटील लगेच म्हणाला, "हंकलसाहेब तर मघाशीच इथे होते. आम्ही जाताना पाहिले ना ?"

"इथे होते ? म्हणजे काय ? आणि गेले कुठे ?"

"सिंदुर्णीले. फटफटीवर बसून गेले ना ? आता ध्यानात आलं बघा माझ्या. चोरीचा रिपोर्ट मागे घ्या. त्यांचीच गाडी. ते कशाला चोरतील ?"

विपिनने एक आवंढा गिळला. मग तो विजू-मोनांना म्हणाला, "खरं आहे पाटील म्हणतात ते. चोर आपण. ते कसे चोर ? त्यांचीच गाडी ना ती ?"

"पण– पण असं कसं केलं अंकलनी, विपिनबाबू ? आले केव्हा आणि पळवली केव्हा त्यांनी मोटरसायकल ?"

"साव असून चोर बनले ते." विपिन डोळे वटारीत म्हणाला. "जशी आत्या तसेच हे अंकल. दोघं एकमेकांना सामील आहेत. आपल्याला सिंदुर्णीपर्यंत तंगडणार हे लोक ! पाटील, एखादी एस. टी. असेल ना अजून ?"

"नाही. एस्टीचा टाइम होऊन गेला."

"बरं, बैलगाडी तरी ?"

"सगळ्या गाड्या खामगावास गेल्या आहेत. खंडू शेतकऱ्याची गाडी आहे. पण त्याची बैलजोडी फार तिरकस. ढवळ्या-पवळ्याचं आताशा जमतंच नाही बघा. ढवळ्या दक्षिणेला चालला की पवळ्या ओढ घेतो उत्तरेकडे. त्यामुळे–" पो. पा. नी हसत हसत ते बाळगाणे म्हटले–

"खंडूची गाडी चालेच्चि ना !"

"हं– मग चला झालं पायी पायी !" विपिन म्हणाला अन् सरळ चालायला लागला. विजू–मोना रोती सूरत करून त्याच्या मागे धावू लागली.

इतका वेळ ढगाआड गेलेला चंद्र बाहेर पडला. फिक्या चांद-

ण्याचे पांघरूण चहूकडे पसरले. सिंदुर्णीच्या खडबडीत वाटेवरून हे तीन प्रवासी एक-दोन करीत घाम गाळीत जात होते. त्यांच्या पायांत गोळे आले होते.

इतक्यात एक बैलगाडी रुटूखुटू करीत सिंदुर्णीकडेच जात असलेली त्यांना भेटली.

"पाटील, आम्हाला घेता का गाडीत ?" बिपिनने पुकारले.

पाटीलबुवांनी गाडी उभी केली. हे तिघे थकले-भागलेले प्रवासी त्याला धन्यवाद देत गाडीत चढले आणि गाडीचा पुढचा प्रवास सुरू झाला.

"नाव काय तुमचं, पाटील ?" बिपिनने विचारले.

"खंडू म्हणतात मले."

"खंडू ? तुमच्या ढवळ्या-पवळ्यांचं जमत नव्हतं ना ? मग गाडी कशी काढलीत ?"

"हे ढवळ्या-पवळ्या न्हाईत. हा हाये गवळ्या आन् त्यो हाये चवळ्या."

"अस्सं ! म्हणजे बदली गडी आहेत होय ?" विजू म्हणाला. आणि मग चांदण्याची हवा खात तिघांनी उरलेला प्रवास लवकरच पुरा केला.

सिंदुर्णीच्या बंगल्यावर पोचताच दाराशीच त्यांना राजदूत उभी असलेली दिसली. तोंडे वाकडी करीत तिघांनी एकमेकांकडे पाहिले अन् घरात प्रवेश केला.

त्यांची सरबराई मात्र चांगली झाली. अंकलनी स्वत: त्यांना सरबत आणून दिले. बिपिन त्यांच्याकडे रोखून पाहू लागला. तो काही बोलला नाही. पण अंकल मख्ख होते. तेही काही बोलले नाहीत. प्रफुल्ला नुसतीच ओठातल्या ओठात हसत होती आणि

बाबासाहेब स्वस्थपणे चिरूट फुंकीत होते.

विजू–मोना मात्र मोकळी–ढाकळी पोरे. त्यांनी लगेच अंकलचा गुन्हा त्यांच्या पदरात घातला.

"काय हो अंकल ?– आम्हाला कळलं नाही असं वाटतं काय तुम्हाला ?"

"तुम्हीच पळवलीत ना फटफटी ?"

अंकल हसले आणि बिपिनकडे न पाहता डोळे मिचकावीत म्हणाले,

"मी काय करणार ? मी हुकुमाचा चाकर. आत्यानेच तशी कंडिशन घातली होती."

"चांगलं आहे." बिपिनला आता तोंड फुटले. "पण आमची कंडिशन काय केलीत ते बघा ना !"

"तरीच बरं का– अंकल कांदेपोहे खायला नव्हते !" विजू.

"ते आधीच एस्टीने कलावनीला गेले– आपल्या पुढे."

"आणि झाडीत लपून बसले."

"आपलीच मोटरसायकल आपणच चोरायला !"

"आयॅम व्हेरी सॉरी, किड्स् !" अंकल म्हणाले, "मी तुम्हाला फार सतावलं असं वाटेल, पण मीच तुमची सोडवणूकदेखील केली. खंडूची गाडी मीच धाडली तुमच्या मदतीला– त्याला नवी बैलजोडी देऊन."

"सारा कट आधीच ठरलेला असणार !" मोनाने दातांनी खालचा ओठ दाबला.

"ते काय करतील ? हुकुमाचे चाकर–" विजू.

"एनीवे– आयॅम सॉरी."

"थॅंक्यू."

आणि मग सारीच मंडळी थट्टखोर स्वभावाची असल्यामुळे त्या प्रकरणाचा हास्यविनोदात शेवट झाला.

बिपिनने पूर्ण भरलेले कोडे अंकलना दाखवले. त्यांनी ते ताबडतोब पास केले. १ उ चा उ–रा–त आणि १४ आ चा फि–र–की हे दोन्ही 'खांब' बरोबर होते. 'उरात भरली धडकी, आत्याने घेतली फिरकी' ही ओळ कशी अगदी आत्याला अपेक्षित अशीच या आधुनिक वाल्मीकीच्या तोंडून बाहेर पडली होती ! कुठून तरी कसा तरी या भाच्याचा सूर आत्याशी जुळला होता खरा !

आणि २० आ त भरलेली डमकी हे खरोखरीच एक डमडम वाजवणारे वाद्य होते !

रात्री जेवताना अंकलनी विचारले– आणि मोनाच्या मते त्या विचारण्यात खवचटपणाची छटा होती–

"मग काय, बिपिनबाबू ? केव्हा लागणार वरसोव्याच्या वाटेला ?"

"घाई काय आहे एवढी पण ?" तात्यांनी हरकत घेतली. "आल्यासारखे राहतील चार दिवस !"

"तर–तर ?" बिपिन म्हणाला,

"आणखी वेळ आहे कुणाला ? मला टर्म भरायची आहे."

"अंकल घाई करताहेत ती एवढ्याचसाठी," बाबासाहेबांनी खुलासा केला, "की, चंद्रीच्या अस्थींचं गंगेत विसर्जन करण्यासाठी त्यांना उद्या निघायलाच हवं आणि मी पण उद्या यवतमाळला परतेन म्हणतो. –चालेल ना तात्या ?"

"आता निघणारच म्हणता, तर काय ? चालेल." तात्या म्हणाले.

"मग मीही उद्याच मुंबईला जायला निघेन." बिपिन म्हणाला. "ओके, विजू–मोना ?"

प्रत्येकाचे डोके होकारार्थी हलले.

"उत्तम !" प्रफुल्ला म्हणाली. "मला आयती सोबत मिळेल."

"हा सगळा अंदाज गृहीत धरून मी तुमचं ट्रेनचं रिझर्वेशन केलं आहे." अंकलनी डोळे मिचकावले. "आणि मलाही जायचं आहेच अक्काच्या अस्थी घेऊन एखाद्या तीर्थस्थानी !"

"आता एकच गोड काम करायचं राह्यलंय, ते मी उरकतो. बिपिनच्या काखोटीला दोन पिल्लं असतील तर त्यांना खाऊ द्या म्हणून अक्कांनी मला बजावलं होतं. त्याप्रमाणे..." त्यांनी कपाट उघडून चॉकलेटची दोन भली मोठी खोकी काढली आणि ती विजू–मोनांच्या हाती देत म्हटले, "अक्कांनी तुमच्यासाठी हे बक्षीस ठेवलंय !"

"थ्री चीअर्स फॉर चंद्रूआत्या !" विजू ओरडला.

आणि त्याला लगेच प्रतिसाद मिळाला, "हिप्–हिप्–हुर्रे !"



"थडकलो आपण पुन्हा आपल्या ममईत येऊन !" बिपिन उद्‌गारला. "तीन-चार दिवस कसे चक्रावल्यासारखे गेले, नाही ?"

"हो ना !" विजू म्हणाला. "आता वाटतं की आपण एखादं स्वप्न तर पाहात नव्हतो ?"

"स्वप्न कसं ?" मोना म्हणाली. "सगळं खरं होतं. पण एक मात्र अजून स्वप्नच उरलंय, बिपिनबाबू. चंद्रूआत्याने तुझं भलं केलंय की तुला भुलवलंय हे उद्या मध्यरात्री कळेल आपल्याला."

"आपल्याला ?– म्हणजे तुम्ही पण येणार का माझ्याबरोबर ?"

"हे वघ–" मोना जरा घुश्शात म्हणाली, "पुन्हा पुन्हा तो 'यत्र यत्र 'चा मंत्र म्हणायला लावू नकोस आम्हाला."

"एकदा सांगितलं ना– आम्ही डोंगळे आहोत !"

"डोंगळे कसले ? जळवा आहात तुम्ही." बिपिन पुटपुटला. आणि मग मोठ्याने म्हणाला, "तसं नाही. पण रात्री–अपरात्रीची वेळ. तुमचे बाबा तुम्हाला परवानगी देतील का ? समुद्रकाठी–

वरसोव्याला–"

"मग काय झालं." वरसोवा झाला तरी मुंबईतच आहे ना?"

"आणि बिपिनबाबू बरोबर आहे ना, मग खुशाल जा, असं म्हणतील बाबा." विजू.

"ते म्हणतील– तो अंधारात वाटबीट चुकेल, तर नजर ठेवा त्याच्यावर !" मोना.

"बरं-बरं ! फार वाहवू नका !"

एस्टी-कम-रेल्वेचा प्रवास करून त्रयी नुकतीच मुंबईला परतली होती. सिंदुर्णीहून तिघे बाबासाहेबांच्या बरोबरच निघाली आणि एक दिवस त्यांनी यवतमाळला घालवला. बिपिनच्या आईला त्यामुळे फार बरे वाटले. इतकेच नाही तर एका दिवसात विजू-मोनांनी देखील तिचे मन जिंकून घेतले. तिथून त्यांना निरोप देताना बाळासाहेब काडी शिलगावीत म्हणाले होते, "ये बाबा बिपिन !– आता मुंबईत आल्याने काय काडचा घातल्या आहेत ते बघून कळव आम्हाला !" या यवतमाळ प्रकरणामुळे बिचाऱ्या प्रफुल्लाला मात्र यांची सोबत गमवावी लागली. कारण तिला घाईने मुंबईला पोचणे भाग होते आणि आता एकदा आजची रात्र उलटली की– उद्या यांना जायलाच हवं वरसोव्याला. आत्याची तशी शर्तच आहे मुळी !"

आणि ती रात्र हां हां म्हणता उलटली. कारण तिघेही जणं इतकी थकली होती की बिछान्यावर पडता क्षणी त्यांना झोपा लागल्या. सिंदुर्णीचे मजेदार अनुभव विजू-मोना आपल्या आई–बाबांना मारे खुलवून सांगत होती खरी, पण एकीकडे त्यांचे डोळे अगदी मिटायला आले होते.

दुसरा दिवसही असाच संपला. बिपिन कॉलेजात अन् विजू–

मोना शाळेत जाऊन आली. रात्रीच्या जेवणानंतर बिपिन जेव्हा वरसोव्याच्या मोहिमेवर बाहेर पडला तेव्हा त्याचे छोटे बालमित्र पण त्याच्याबरोबर होते. वडिलांनी त्यांना परवानगी दिली होती. मात्र बिपिनला त्यांनी एक सूचना दिली होती– "तू वरसोव्याला मध्यरात्री जाणार. जाशील. पण तिथून परत कसा येणार आहेस ? वाहन ?"

आणि ही अडचण लक्षात येताच बिपिनही क्षणभर बावरला होता. खरंच, परत येताना फार उशीर होईल आणि बरोबर ही दोन पिल्लं असणार. काय करावं बरं ?

आणि त्याला एकदम एक युक्ती सुचली होती. असं केलं तर ? कुणाची तरी स्कूटर किंवा मोटारसायकल नेली तर ? आणि त्याला एकदम आठवण झाली अशोक देसाईची.

अशोक देसाईशी अलीकडे त्याची बरीच मैत्री जडली होती. मुळात अशोक त्याचा मित्र नव्हता. बिपिनचा प्रतिस्पर्धी जो अतुल शहा, त्याचा हा मित्र. पण अठरा तासांत मुंबईला चक्कर मारण्याचे बिपिनला आव्हान देऊन अतुलने स्वतःच जेव्हा त्याला पुन्हा पुन्हा खड्डयात घालण्याचा खटाटोप केला, तेव्हापासून अतुलच्या दोस्तीला अशोक विटलेला होता.

"माहीमला अशोकचा बंगला आहे." बिपिन म्हणाला, "तिथपर्यंत आम्ही बसने जाऊ. मग त्याची मोटारसायकल घेऊन वरसोव्याला जाऊ."

"उत्तम." विजू-मोनांचे वडील म्हणाले, "आणि रात्रीचा मुक्कामही त्याच्याकडेच करा– होईल ना तेवढी सोय ?"

"सोय ?" बिपिन हसला. "अशोक सारखाच बोलवत असतो मला. त्याची काळजी नको."

त्याप्रमाणे हे त्रिकूट अशोकच्या 'महिकावती' बंगल्यावर जाऊन पोचले तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. अशोक घरी होता. त्याला जेव्हा बिपिनने आपल्या मोहिमेची कल्पना दिली, तेव्हा तो लगेच म्हणाला, "मग मी पण येतो. गाडीच काढू या."

"नाही." बिपिनने ही सूचना एकदम फेटाळली. "ही चिल्लं-पिल्लं घेतलेली चालतील, पण बाकी कुणी मोठं बरोबर असता कामा नये, अशी आत्याची शर्त आहे."

रात्री अकरा वाजता स्वाऱ्या मोटरसायकलवर बसून निघाल्या.

"आपल्याला बंगला शोधायला वेळबीळ लागेल. तेव्हा आपण आताच निघालेलं बरं."

"गृहप्रवेश बरोबर बाराच्या मुहूर्तावर करू म्हणजे झालं." मोनाने पोक्तपणे सांगितले.

दिवसभराचा उकाडा संपून आता मंदशीतल वारा वाहात होता. बिपिनबाबूच्या मागे विजू नि मोना पक्की धरून बसली होती. दहाची वेळ म्हणजे मुंबईकरांना काहीच नाही. लेडी जमशेटजी रोडवर अजूनही वाहनांची जोरदार वर्दळ होती. वांद्रा गाठायलाच त्यांना बारा मिनिटे लागली आणि मग मशिदीपुढे पोचताहेत तो वाहतुकीचा ओघ अकस्मात थबकला. सारीच वाहने हॉर्न वाजवून कानठळ्या बसवीत होती. पण तुंबलेला प्रवाह हलायला तयार नव्हता.

"काय झालं असेल रे ?– अपघात ?"

"कुणास ठाऊक ! इथून दिसतंय का काहीतरी ? पुढे दोन फर्लांगभर नुस्ती वाहनं पडली आहेत खच्चून !"

"आपल्या फटफटीला कितीशी जागा लागतेय ? आपण सटकू या डावीकडून." विजू म्हणाला.

पण हे भलते धाडस बिपिनला करवेना. एकतर वाटेत बघ्या लोकांची गर्दी उसळलेली होती अन् पुढे थोडयाच अंतरावर एक पोलिस दिसत होता.

शेवटी मार्गही विजूनेच सुचवला. "या डावीकडच्या गल्लीतून जाऊ या ना आपण ? कुठेतरी पुन्हा मोठचा रस्त्याला मिळू."

"दॅट्स् ॲन आयडीआ !" बिपिन म्हणाला आणि त्याने मोटरसायकल गल्लीत वळवली.

"हे बरं झालं." तो म्हणाला. "काही झालं तरी बाराचा ठोका चुकवता कामा नये !"

"आपण किती वाजता पोचतोय हे बघायला आहे कोण म्हणा तिथे ?" मोना म्हणाली, "पण तू म्हणतोस ते बरोबर आहे, बिपिनबाबू. आत्याची इच्छा आपण मानलीच पाहिजे. कुणी साक्षीदार असो वा नसो."

गल्ली अरुंद होती आणि विजेचे दिवे असले तरी त्यांचा प्रकाश जरा अंधुकच होता. सुदैवाने वर्दळ विशेष नव्हती. चार-पाच मिनिटांनंतर त्यांना पुन्हा एक उजवीकडचे वळण सापडले. लवकरच त्यांनी मुख्य रस्ता– विवेकानंद रोड– गाठला.

बिपिनने घडयाळाकडे पाहिले, "किती ?"

"अकरा सदतीस. आता मात्र झपाटचाने गेलं पाहिजे." बिपिन म्हणाला. "सांभाळून बसा."

मनातून आता तो भ्याला होता. अजून अंधेरी गाठायची होती आणि मग वरसोवा. अंतर आटोक्यातले होते आणि फटफटी ते वेळेवर तोडीलही, पण पुढे घर शोधून काढणार आहोत आपण. फटफटी नाही !

शिवाय वाटेत एखादा पोलिस भेटला तर पंचायत व्हायची.

"तिघं तिघं बसून चाललात." म्हणून तो आडवायचाही. त्याचा काही नेम नाही. सगळं त्याच्या लहरीवर अवलंबून असतं.

अंधेरीचा बाजार गाठायला त्यांना दहा मिनिटे लागली. मग डावीकडच्या पाटचा न्याहाळीत त्याने सटकन एका रस्त्याला मोटारसायकल वळवली. इथेही त्याला साथ देणारी वाहने होतीच. पण पुढे पुढे वाहतूक निवळत चालली.

"ती ताडामाडाची झाडं दिसतात ना, तोच वरसोव्याचाबीच." बिपिनने सांगितले." अकरा त्रेपन्न. सात मिनिटं आहेत अजून."

"आपल्याला बीच रोडवरचं सहा नंबरचं घर हवंय."

पण बीचवर येऊनसुद्धा त्यांना बीच रोड सापडायला वेळ लागला. वाटेत दोन-तीन माणसे काहीतरी बडबडत अन् एकमेकांवर आपटत चालली होती. त्यांना त्यांनी विचारले तेव्हा एकाने दक्षिणेकडे बोट दाखवीत स्वत:भोवती गिरकी घेतली; तर दुसऱ्याने उत्तरेकडे बोट करीत उलट गिरकी घेतली.

विजू-मोना हसत सुटले, तसा बिपिन दटावून म्हणाला, "विनोद मग करा, आत्ता आपल्याला वेळ नाहीये. काटा पुढे सरकतोय."

वाळूने भरलेल्या रस्त्यावरून माडांच्या वाडीतून त्याने मोटरसायकल पुढे रेटली. डावीकडे झावळ्यांनी आच्छादलेल्या एका झोपडीत बाकावर बसून काही तरुण बाळे बाटल्या पीत होती.

"हेच त्या मघाच्या लोकांचं माहेर." बिपिन म्हणाला. "इथे विचारण्यात अर्थच नाही."

आणखी पुढे गेल्यावर त्याने एकदम ब्रेक दाबला. खिशातला टॉर्च काढून त्याचा झोत डाव्या बाजूला फेकीत तो म्हणाला, "पाटी वाच, विजू !"

"बीच रोड !" विजू ओरडला. लगेच मोटरसायकलने वळण

घेतले. एकीकडे घड्याळाकडे पाहात पाहात बिपिनने गाडी पुढे रेटली. रस्त्याच्या दुतर्फा अंतराअंतरावर तुरळक घरे होती. बंगले कसले, खोपटीच होती ती. लवकरच त्यांनी गल्लीचा शेवट गाठला. "नंबर ६ !" विजू-मोना एकसाथ ओरडली. समोर समुद्राच्या लाटा उसळत होत्या आणि त्यांत आपला पायथा बुचकळून एक छोटासा बंगला उभा होता.

"जोतं ढासळायला आलं असणार." बिपिन विजेरीचा प्रकाश फेकीत म्हणाला, "ते बघ ना, सीमेंटचं नवीन लिंपण केलेलं दिसतंय."

"पण इकडची बाजू पक्की वाटते." मोना म्हणाली.

"चला लवकर !" बिपिन घाईघाईने म्हणाला. "आपल्याला बंगल्याची बाहेरची बाजू नकोय. आत शिरायला हवं लवकर.–" त्याची नजर मनगटाकडे गेली. "बाप रे !" तो उद्‌गारला. "दीडच मिनिट राह्यलंय– चला. चला लवकर !"

"तुझं घड्याळ पुढे असू शकेल." –विजू.

"किंवा मागेही."–मोना.

तारेचे कुंपण होते, आणि त्याला एक लाकडी फाटक. ते लोटून बिपिन आत धावला. सभोवार नारळ-सुपारीची सात-आठ झाडे अन् पायाखाली भुसभुशीत वाळू याखेरीज आवारात दोन तीन लाकडी पिंपे नि बागेला पाणी घालण्याच्या प्लॅस्टिकच्या नळच्या पडलेल्या होत्या. बंगला बैठा नि अगदी छोटा होता. चौकीदार गडी वगैरे कोणी दिसत नव्हते. बंगल्यात शिरण्याचा दरवाजा उजव्या कडेला होता. अन् त्याच्या कमानीवर गारवेल चढवलेली होती.

बिपिन पायऱ्या चढून गेला. खिशात हात घालून त्याने लॅचकी काढली. दार उघडताना कर्रकन आवाज झाला.

वेळेवर पोचलो आपण." तो म्हणाला. "माझा मिनिटकाटा बरोबर बारावर चालला आहे, पण आत्याचं घड्याळ–"

"ते केव्हाच बंद पडलं." मोना पुटपुटली. आणि त्याच वेळी त्यांच्या कानांवर ठोके पडू लागले.

"ठण्–ठण्–ठण्–"

आवाज आतून येत होता.

"आत कुणी नाही आणि घड्याळ चालू ?"

"त्यात काय मोठंसं ? भिंतीवरची घड्याळं आठ-आठ दिवसांच्या चावीची असतात."

"शिवाय विजेवर चालणारी असतातच की."

बाराचा ठोका पडला आणि बिपिनने दार उघडले. आत अर्थातच अंधार होता. पण टॉर्चच्या प्रकाशात त्यांना असे दिसले की हा एक लहानसा व्हरांडा आहे. वेताच्या चार खुर्च्या नि एक छोटे टीपॉय तिथे मांडलेले होते. त्यावर काही मासिके नि वर्तमानपत्रे पडलेली होती. कोपऱ्यात पुस्तकांनी भरलेले कपाट होते.

भिंतीवर विजेच्या बटनांची रांग दिसत होती. तिकडे बिपिन हात नेतो आहे तोच आतल्या खोलीतून घोगऱ्या आवाजात हाक आली–

"बिपिन !"

बिपिन चपापला. त्याच्या हातातून विजेरी गळून पडली. तिचे भिंग फुटले. विजू नि मोना तर इतकी घाबरली की दोघांनी दोन बाजूंनी त्याला घट्ट कवटाळले.

"बिपिन ! ओळखलास का माझा आवाज ? कुठून ओळखणार म्हणा ! तू पूर्वीसुद्धा ऐकलेला नाहीस. कसं वनवलं तुम्हाला सगळ्यांना ! – बिपिन, या क्षणी मी जिवंत आहे– तुझी चंद्रू आत्या."

तो धक्का जबरदस्त होता. विजू नि मोना भयभीत झाली होती. त्यांच्या छातीतली धडधड बिपिनला स्पष्ट ऐकू येत होती. पण– पण त्याचे स्वतःचे काय ? की त्याचे काळीज बंद पडले होते ?

चंद्रूआत्या जिवंत ? सिंदुर्णीत आमच्या फिरक्या घेणारी, आम्हाला चकरा खायला लावणारी चंद्रूआत्या मेलेली नाही ? इथे मुंबईत वसली आहे ठिय्या देऊन ? इतक्या थराला जाऊन पोचलाय तिचा नटखटपणा ?

...अशक्य नाही. पण– पण...अंकल तर तिच्या अस्थी टाकायला निघाले होते ना गंगेत ? की ते सगळं नाटक ?... बाकी अंकलही आत्याला सामील आहेतच–

काही क्षण तिघेही जमिनीला खिळल्यासारखी उभी होती. मग पहिल्याने सावरला बिपिन. एकाएकी त्याला काय वाटले कुणास ठाऊक, पण त्याने घामाघूम झालेल्या त्या दोघांही पोरांना हातांनी बाजूला सारले आणि झटदिशी हात वर नेऊन त्याने बटन दाबले.

खोलीत लख्ख प्रकाश पडला, तशी त्याने आतल्या दाराकडे धाव घेतली.

"नको– नको ! बिपिनबाबू, नको !" विजूने त्याला मागे ओढले. पण त्याला ढकलून देऊन बिपिन दरवाज्याकडे धावला.

दार अर्धवट उघडे होते. ते पुरते उघडून त्याने आत पाऊल टाकले, अन् तो थबकला. त्याच्या तोंडून एक अस्फुट उद्गार निघाल्याचे विजू–मोनांनी ऐकले अन् ती दोघे भांबावल्यासारखी उभी राहिली.

"टिक् !" आतून आवाज आला. बिपिनने दिव्याचे बटन दाबले होते.

बिपिनने आपल्या मागे दरवाजा लोटला. तो खट्कन् मिटला तशी विजूने किंकाळी फोडली, "बिपिनबाबू !'

मोनाने विजूला मिठी मारली. घुसमटलेल्या आवाजात ती म्हणाली,

"भिऊ नकोस, विजू."

"मी भीत नाहीये ग!" विजू पुटपुटला. "पण त्याने दार का लावलन् ? मला काही तरी भयंकर वाटतंय."

एकाएकी दरवाजा उघडून बिपिन बाहेर आला होता. उघड्या दारातून प्रकाश आला होता. विजू– मोनांचे पांढरेफटक पडलेले चेहरे त्याला दिसले. तो एकदम म्हणाला, "सॉरी हं, मी दार लावायला नको होतं. तुम्हाला भीती वाटू नये म्हणून मी दार लोटलं, तर तुम्ही जास्तीच घ्यालात."

"आत काय आहे, बिपिनबाबू ?" मोनाने चाचरत विचारले. ती नि विजू एकमेकांना घट्ट धरून उभे होते.

"आत्या आहे ?" विजू.


BVBK-0401592